## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५


| अनुक्रमांक | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २ | व्याख्या | १ |
| | **भाग ए : सर्वसाधारण** | |
| ३ | विनियमांची व्याप्ती व लागू असण्याची मर्यादा | १० |
| ४ | मार्गदर्शक तत्त्वे | ११ |
| ५ | पर्यायी अटी व शर्ती | ११ |
| | **भाग- बीः वीज दर निश्चित करण्याची कार्यपध्दती** | |
| ६ | वीज दर निश्चित करण्यासाठी करावयाच्या अर्जासाठीची कार्यपध्दती | १२ |
| ७ | विद्युत निर्मितीवरील विजेचा दर | १२ |
| ८ | पारेषण, वहन आणि विजेच्या किरकोळ विक्रीसाठी विजेचे दर निश्चित करणे | १४ |
| ९ | वीज दराच्या निश्चितीकरणासाठी करावयाच्या अर्जासाठीची काल-मर्यादा | १६ |
| १० | वीज दराचा आदेश | १६ |
| ११ | वीज दराचे पालन | १७ |
| | **भाग-सीः बहु-वर्षीय वीज दर** | |
| १२ | बहु-वर्षीय वीज दराची रचना | १७ |
| १३ | विनियम कोणाला लागू असतील | १८ |
| १४ | नियंत्रण कालावधी | १९ |
| १५ | पूर्व-अनुमान | १९ |
| १६ | काही घटकांसाठी विशिष्ट मार्गदर्शिका | २१ |
| १७ | कामगिरीचा वार्षिक आढावा | २२ |
| १८ | नियंत्राणाखाली नसलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांना लागू करण्याचे सूत्र | २५ |
| १९ | नियंत्रणाखाली असलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा हिस्से करुन वाटून घेण्याबाबत | २५ |
| २० | वाीज दराचे वार्षिक निश्चितीकरण | २६ |

| | | |
|---|---|---|
| | **भाग- डीः वीज खरेदी आणि प्राप्त करुन घेणे** | |
| २१ | विनियम कोणाला लागू असतील | २६ |
| २२ | वीज प्राप्त करुन घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना | २७ |
| २३ | दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीची योजना | २७ |
| २४ | वीज खरेदी करारास/ व्यवस्थेस मान्यता | २९ |
| २५ | अल्प-कालीन वीज प्राप्ती | ३० |
| | **भाग-ईः विद्युत निर्मिती** | |
| २६ | विनियम कोणास लागू असतील | ३२ |
| २७ | वीज दराचे निश्चितीकरण | ३३ |
| २८ | वीज दराचे भाग | ३३ |
| २९ | बहु-वर्षीय वीज दर | ३४ |
| ३० | भांडवली खर्च | ३४ |
| ३१ | कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तर | ३७ |
| ३२ | कर्ज परतफेडीचे वेळापत्रक | ३८ |
| ३३ | कामकाजाचे निकष | ३९ |
| ३४ | वार्षिक स्थिर आकारांची परिगणना | ४३ |
| ३५ | ऊर्जा आकार | ४८ |
| ३६ | अ-निर्धारित आंतरबदलांसाठी आकार | ४९ |
| ३७ | प्रोत्साहन-अधिदान | ५० |
| ३८ | सूट/ उशीरा अदायगीसाठी अधिभार | ५० |
| ३९ | देयके तयार करणे आणि आकारांची अदायगी | ५० |
| ४० | घोषित क्षमता सिध्द करुन दाखविणे | ५१ |
| ४१ | मानीव वीज निर्मिती | ५१ |
| | **भाग- एफः पारेषण** | |
| ४२ | विनियम कोणास लागू असतील | ५१ |
| ४३ | वीज दराचे भाग | ५२ |
| ४४ | बहु-वर्षीय वीज दर | ५४ |
| ४५ | गुंतवणूक योजना | ५४ |
| ४६ | भांडवली खर्च | ५५ |

| | | |
|---|---|---|
| ४७ | कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर | ५७ |
| ४८ | कर्ज परतफेडीचे वेळापत्रक | ५८ |
| ४९ | कामकाजाचे निकष | ५९ |
| ५० | एकूण महसुल गरजेची परिगणना | ६० |
| ५१ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | ६५ |
| ५२ | इतर उद्योगापासूनचे उत्पन्न | ६५ |
| ५३ | वार्षिक पारेषण आकारांचे वाटप | ६६ |
| ५४ | पारेषण तोटे | ६६ |
| | **भाग-जीः वहन** | |
| ५५ | लेख्यांचे विभक्तीकरण | ६७ |
| ५६ | विनियम कोणास लागू असतील | ६७ |
| ५७ | वीज दराचे भाग | ६७ |
| ५८ | बहु-वर्षीय वीज दर | ६८ |
| ५९ | गुंतवणूक योजना | ६८ |
| ६० | भांडवली खर्च | ६९ |
| ६१ | कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर | ७१ |
| ६२ | कर्ज परतफेडीचे वेळापत्रक | ७१ |
| ६३ | एकूण महसुल गरजेची परिगणना | ७३ |
| ६४ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | ७८ |
| ६५ | इतर उद्योगापासूनचे उत्पन्न | ७८ |
| ६६ | वहन आकारांचे वाटप | ७९ |
| ६७ | वितरण तोटे | ७९ |
| | **भाग-एच : विजेची किरकोळ विक्री** | |
| ६८ | विनियम कोणास लागू असतील | ७९ |
| ६९ | वीज दराचे भाग | ८० |
| ७० | बहु-वर्षीय वीज दर | ८० |
| ७१ | गुंतवणूक योजना | ८१ |
| ७२ | भांडवली खर्च | ८१ |
| ७३ | कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर | ८३ |

| | | |
|---|---|---|
| ७४ | कर्ज परतफेडीचे वेळापत्रक | ८४ |
| ७५ | विक्रीबाबत पूर्व-अनुमान | ८५ |
| ७६ | एकूण महसुल गरजेची परिगणना | ८६ |
| ७७ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | ९२ |
| ७८ | वहन आकारांपासूनचे उत्पन्न | ९२ |
| ७९ | इतर उद्योगापासूनचे उत्पन्न | ९२ |
| ८० | वहन आकारासाठीच्या क्रॉस-सबसिडीवरील अधिभार व अतिरिक्त अधिभारापासूनची प्राप्ती | ९३ |
| ८१ | वितरण तोटे | ९४ |
| ८२ | इंधन अधिभार समायोजन | ९४ |
| | **भाग-आयः राज्य शासनाने सबसिडी देणेबाबत** | |
| ८३ | राज्य शासनाने सबसिडीसाठी तरतूद करण्याची पध्दत | ९७ |
| | **भाग-जेः संकीर्ण** | |
| ८४ | दुरुस्ती करण्याचे अधिकार | ९७ |
| ८५ | अडचणी दूर करण्याचे अधिकार | ९७ |
| | **परिशिष्ट-१** | |
| | घसारा अनुसूची | ९८ |
| | **परिशिष्ट-२** | |
| | पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची परिगणना करण्याची कार्यपध्दती<br>**जोडपत्र-१** | १०१ |
| | पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठीची सूत्रे | १०४ |
| | **जोडपत्र-२** | |
| | एसी वाहिन्यांचे सर्ज इम्पिडन्स लोडींग (एसायएल) | १०५ |

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५

### विद्युत अधिनियम २००३

क्रमांक [मविनिआ/ लिगल/१३२/२००५/१७७१८] - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) कलम १८१ च्या उप-कलम (२) मधील खंड (एच), (आय), (जे), (एल), (एम), (ओ), (वाय), (झेडडी), (झेडइ), (झेडएफ), (झेडजी), (झेडएच) आणि (झेडपी) सह कलम ३६ चे परंतुक, कलम ३९ च्या उप-कलम (२) मधील खंड (डी)चा उप-खंड (२), कलम ३९ च्या उप-कलम (२) मधील खंड (डी) च्या उप-खंड (२) चा दुसरा परंतुक, कलम ४०च्या खंड (सी) चा उप-खंड(२), कलम ४०च्या खंड (सी) च्या उप-खंड(२) चा दुसरा परंतुक, कलम ४१ चा पहिला परंतुक, कलम ५१चा पहिला परंतुक, कलम ६१, कलम ६२चे उप-कलम (२) आणि (५), कलम (६४) चे उप-कलम (१) आणि (३), कलम ६५, आणि कलम ८६ च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग खालीलप्रमाणे विनियम करीत आहे. हे विनियम "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्रशुल्काच्या अटी व शर्ती) विनियम, २००४" ला अधिक्रमित करतील.

**१. संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ**

१.१ या विनियमांस "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम,२००५" असे म्हणावे.

१.२ हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यांत व आयोगाच्या कार्यकक्षेखाली येणा-या सर्व बाबींना लागू राहतील.

१.३ हे विनियम ते ज्या तारखेस शासकीय राजपत्रांत प्रसिध्द करण्यांत येतील त्या तारखेपासून अंमलांत येतील.

**२. व्याख्या**

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तरः -

(ए) **"लेखा विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता, खालील विवरणपत्रे म्हणजेच -

(१) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६ च्या भाग १ मधील नमुन्याप्रमाणे तयार केलेला ताळे-बंद;

(२) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६ च्या भाग २ मधील गरजांची पुर्तता करुन तयार केलेले नफा-तोटा पत्रक;

(३) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या रोकड आवक (कॅश फ्लो) विवरणपत्रासाठी असलेल्या लेखा मानकांवर (एएस-३) आधारित तयार केलेले रोकड आवक विवरणपत्र;

(४) वैधानिक लेखापरिक्षकांचा अहवाल;

(५) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २०९ (१) (डी) खाली केंद्र शासनाने विहीत केलेले खर्चाचे अभिलेखे.

यांसह त्यासंबधीच्या टिपण्या व आयोग वेळोवळी निदेश देईल त्यानुसार इतर सहाय्यक विवरणपत्रे व माहिती.

परंतु असे की, वीज वितरणाचा उद्योग जर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणातर्फे करण्यांत येत असेल तर, लेखा विवरणपत्रे यांचा अर्थ अशा स्थानिक प्राधिकरणाने, त्यास लागू असलेल्या संबंधित अधिनियम किंवा संविधीनुसार, वर उल्लेखलेल्या बाबींच्या संदर्भात तयार केलेली व ठेवलेली माहिती.

(बी) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६), त्यांत करण्यांत आलेल्या सुधारणांसह;

(सी) **"वाटप विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षासाठी परवानाधारकाच्या प्रत्येक स्वतंत्र उद्योगासाठी तयार करण्यांत आलेले एक विवरणपत्र ज्यांत, दाखविण्यांत आलेला महसूल, खर्च, मालमत्ता, दायित्वे, राखीव निधी किंवा तरतूद जी-

(१) अशा प्रत्येक इतर स्वतंत्र उद्योगांना किंवा उद्योगांकडून खर्ची टाकण्यांत आली आहे व ज्या आधारे ती खर्ची टाकण्यांत आली त्याचा तपशील, किंवा

(२) परवानाप्राप्त उद्योग व परवानाधारकाचा प्रत्येक इतर उद्योग यांमध्ये विभाजनाने किंवा वाटप करुन ठरविण्यांत आली आहे व असे विभाजन किंवा वाटप ज्या आधारे करण्यांत आले त्याचा तपशील, देण्यांत आला आहे.

परंतु असे की, विद्युत निर्मिती केंद्रांची वाटप विवरण-पत्रे अशा रितीने ठेवण्यांत येतील की त्यामुळे या विनियमांच्या विनियम २७ नुसार टप्पा-वार, युनिट-वार किंवा सबंध विद्युत निर्मिती केंद्राकरिता वीज दर ठरविणे शक्य होईल.

(डी) **"अर्जदार"** म्हणजे परवानाधारक किंवा विद्युत निर्मिती कंपनी जिने वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज केला आहे किंवा अधिनियम आणि त्याखाली करण्यांत आलेल्या विनियमांनुसार वार्षिक कामगिरीचा आढावा घेण्यात यावा म्हणून अर्ज केला आहे व त्यांत परवानाधारक किंवा विद्युत निर्मिती कंपनी, यांचाही समावेश असेल ज्यांच्या वीज दराचे, आयोगाकडून स्वतःहून किंवा स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तींनी केलेल्या अर्जांमुळे किंवा वार्षिक कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून करण्यांत येणारे, पुर्नविलोकन हा आयोगापुढील एक विषय आहे.

(इ) **"एकूण महसूलाची गरज"** म्हणजे या विनियमांतील तरतूदींनुसार परवानाधारकाच्या परवानाप्राप्त उद्योगाशी संबंधित अनुज्ञेय खर्चांची आणि भांडवलावरील परतावा मिळून होणारी रक्कम जी वीज दरांतून वसूल होऊ शकेल.

(एफ) **"सहाय्यकारी वापर"** एका ठराविक कालावधीसाठी म्हणजे विद्युत निर्मिती केंद्राच्या सहाय्यकारी उपकरणांनी ठराविक कालावधीत वापरलेले ऊर्जेचे परिमाण आणि जे विद्युत निर्मिती केंद्राच्या सर्व युनीटसच्या जनरेटर टर्मिनल्सनी निर्मिती केलेल्या एकूण ऊर्जेच्या बेरजेच्या टक्केवारीत व्यक्त करण्यांत येईल.

आणि, या विनियमांच्या प्रयोजनार्थ, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या सहाय्यकारी वापरांत निर्मिती केंद्रामध्ये झालेल्या ट्रान्सफॉर्मर गळतीच्या युनिटसचा देखील समावेश असेल;

(जी) **"उपलब्धता"** - औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भात कोणत्याही कालावधीकरिता उपलब्धता म्हणजे त्या कालावधीतील सर्व दिवसांकरिता दैनंदिन घोषित सरासरी क्षमतेची सरासरी जी, विद्युत निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेमधून, या विनियमांत विहीत केल्यानुसार, MW मधील प्रमाणकानुसारी (normative) सहाय्यकारी वापर वजा केल्यावर येणा-या वजाबाकीच्या टककेवारीत, दाखविण्यांत येईल व तिची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यांत येईलः

$$\text{उपलब्धता} = 10000 \times \sum_{i=1}^{N} DC_i \,/\, \{ N \times IC \times (100 - AUX_n) \} \,\%$$

जेथे -

N = ठराविक कालावधीतील वेळेच्या गटांची संख्या

DC = अशा कालावधीतील त्या वेळेतील गटांची घोषित सरासरी क्षमता

IC = विद्युत निर्मिती केंद्राची MW मधील स्थापित क्षमता

AUX = MW मधील प्रमाणकानुसारी सहाय्यकारी वापर, जो एकूण वीज निर्मितीच्या टक्केवारीत दाखविण्यांत येतो

**(एच)** "उपलब्धता" पारेषण यंत्रणेच्या संदर्भात एका ठराविक कालावधीसाठी म्हणजे अशा कालावधीतील तासांतील वेळ ज्यामध्ये पारेषण यंत्रणा तिच्या प्रमाणित दाबाने विजेचे पारेषण करु शकते, जी त्या वेळेतील एकूण तासांच्या टक्केवारीत व्यक्त करण्यांत येईल व जिची परिगणना या विनियमांतील परिशिष्ट- २मध्ये करण्यांत आलेल्या तरतूदीनुसार करण्यांत येईल.

(आय) **"Balancing and Settlement Code"** म्हणजे आयोगाने ठरवून दिलेली किंवा राज्य भार प्रेषण केंद्राने प्रसिध्द केलेली आणि आयोगाने मान्यता दिलेली अशी संहिता जिच्यानुसार महाराष्ट्र राज्यांतील ग्रीडचा वापर करणा-यांच्या ऊर्जेच्या लेख्यांमध्ये आवश्यक अशी देवाण-घेवाण करण्यांत येईल व त्यांच्या निर्धारित ऊर्जा व प्रत्यक्ष वापरलेली ऊर्जा यांच्यातील फरकाचा हिशोब पूर्ण करण्यांत येईल;

(जे) **"ब्लॉक"** कम्बाइन्ड सायकल औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भात गट म्हणजे ज्यामध्ये Combustion turbine- generators, associated waste heat recovery boilers , connected steam turbine-generators and auxiliaries, यांचा समावेश होतो.

(के) **"ठोक वीज पारेषण करार"** म्हणजे असा करार ज्यांतील अटी व शर्तीमुळे पारेषण यंत्रणेच्या उपयोगकर्त्यास, पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश करण्याचा, हक्क प्राप्त होतो;

(एल) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(एम) **"कामकाज प्रचालन विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (झेडएल) सह कलम ९२ च्या उप-कलम (१) खाली विहीत करण्यांत येतील असे विनियम;

(एन) **"नियंत्रण कालावधी"** म्हणजे या विनियमांच्या भाग 'सी' खाली पूर्व-अनुमान सादर करण्यासाठी आयोग विहीत करेल त्याप्रमाणे एक किंवा अधिक आर्थिक वर्षांचा कालावधी;

(ओ) **"मर्यादा - दिनांक (कट-ऑफ डेट)"** म्हणजे विद्युत निर्मिती केंद्राची सुरुवात झाल्याच्या तारखेपासून तिनशे पासष्ट (३६५) दिवस झाल्यावर पहिल्या आर्थिक वर्षाचा शेवट झाल्याची तारीख;

(पी) **"दैनिक क्षमता निर्देशांक"** म्हणजे एका दिवसासाठी उपलब्ध असलेल्या कमाल क्षमतेच्या टक्केवारीत व्यक्त करण्यांत आलेली घोषित क्षमता जिची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यांत येईलः

दैनिक क्षमता निर्देशांक = घोषित क्षमता (MW) x १०० / कमाल उपलब्ध क्षमता (MW)

आणि कोणत्याही कालावधीकरिता **"क्षमतेचा निर्देशांक"** हा अशा कालावधीकरिता वरीलप्रमाणे काढण्यांत आलेल्या दैनिक क्षमता निर्देशांकांची सरासरी असेल;

(क्यु) **"सुरुवात केल्याची तारीख"** म्हणजे -

(१) विद्युत निर्मिती केंद्राच्या युनिटच्या संदर्भात, कमाल वीज निर्मिती निदान ठराविक कालावधीसाठी दाखविल्यावर किंवा स्थापित क्षमता यशस्वी चांचणीत सिध्द केल्यानंतर विद्युत निर्मिती कंपनीने घोषित केलेली तारीख;

(२) विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भात, वरील खंड (१) नुसार, विद्युत निर्मिती केंद्राचे शेवटचे युनिट किंवा गट सुरु झाल्याची तारीख; आणि

(३) परवानाधारकाच्या पारेषण उद्योग, वितरण उद्योग, किंवा किरकोळ विद्युत पुरवठा उद्योगातील भांडवली खर्चाच्या प्रकल्पाच्या संदर्भात, प्रकल्प ज्या दिवशी व्यापारी तत्त्वावर वापरास तयार असेल ती तारीख.

(आर) **"घोषित क्षमता"** म्हणजे -

(१) औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राकरिता, दिवसाच्या कोणत्याही कालावधीसाठी किंवा सबंध दिवसाकरिता, विद्युत निर्मिती केंद्राने, इंधनाची उपलब्धता लक्षांत घेऊन, एक्स-बस येथे MW मध्ये वीज पुरविण्याची घोषित केलेली सिध्दता;

परंतु असे की, गॅस टर्बाइन विद्युत निर्मिती केंद किंवा कम्बाइन्ड सायकल विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, विद्युत निर्मिती केंद्र वायू इंधन व द्रव इंधनावरील युनिटस व मॉड्युलची क्षमता वेगवेगळी घोषित करेल व त्याचे निर्धारण स्वतंत्रपणे करण्यांत येईल. उपलब्धता आणि प्लँट लोड फॅक्टर यांची प्रत्येकी परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, विद्युत निर्मिती केंद्राची एकूण घोषित क्षमता व एकूण निर्धारित विद्युत निर्मिती ही, वायू इंधन व द्रवरुप इंधनांची मिळून झालेली एकूण घोषित क्षमता आणि एकूण निर्धारित विद्युत निर्मिती, इतकी असेल.

(२) नदीच्या पाण्यावर चालणरे जलाशय व साठवणूकीच्या पध्दतीच्या जल विद्युत निर्मिती केंद्राकरिता, पाण्याची उपलब्धता, पाण्याचा कमाल वापर आणि मशिन्सची उपलब्धता विचारांत घेऊन, चोवीस (२४) तासांच्या कालावधीतील तीन (३) तासापेक्षा कमी नसणा-या कमाल-मागणीच्या तासांसाठी, पुढील दिवसाच्या कमाल-मागणीच्या तासांकरिता विद्युत निर्मिती केंद्राकडून एक्स-बस येथे उपलब्ध होऊ शकणा-या विजेची MW मधील, विद्युत निर्मिती केंद्राने घोषित केलेली क्षमता;

(३) पूर्णतः नदीच्या पाण्यावर चालणा-या जल विद्युत निर्मिती केंद्राकरिता, पाण्याची उपलब्धता, पाण्याचा कमाल वापर आणि मशिन्सची उपलब्धता विचारांत घेऊन, पुढील दिवसाकरिता विद्युत निर्मिती केंद्राकडून एक्स-बस येथे उपलब्ध होऊ शकणा-या विजेची MW मधील, विद्युत निर्मिती केंद्राने घोषित केलेली क्षमता;

(एस) **"मानीव वीज निर्मिती"** म्हणजे जी ऊर्जा जल विद्युत निर्मिती केंद्र निर्मिती करु शकण्यास समर्थ होते परंतु, विद्युत निर्मिती केंद्राच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे किंवा पारेषण परवानाधारकाच्या पारेषण वाहिन्या उपलब्ध न झाल्यामुळे किंवा राज्य भार प्रेषण केंद्राकडून वीज निर्मिती कमी करण्याच्या सूचना प्राप्त झाल्याने पाणी फुकट गेल्यामुळे, निर्मिती करू शकले नाही अशी ऊर्जा.

(टी) **"डिझाइन उर्जा"** म्हणजे जल विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भांत, ऊर्जेचे परिमाण जे, ९० टक्के भरवशाच्या वर्षांत ९५ टक्के स्थापित क्षमता असलेल्या विद्युत निर्मिती केंद्राकडून, निर्मिती होऊ शकेल.

(यु) **"वितरण उद्योग"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रांत विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण यंत्रणा उभी करण्याचा व चालू ठेवण्याचा उद्योग;

(व्ही) **"वितरण खुला प्रवेश विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम २ च्या उप-कलम (४७) सह कलम ४२ च्या उप-कलम (२), (३) व (४) खाली आयोग विहीत करेल असे विनियम;

(डब्ल्यु) **"अस्तित्वांत असलेले विद्युत निर्मिती केंद्र"** म्हणजे या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेच्या पूर्वी सुरु झाल्याची तारीख असलेले विद्युत निर्मिती केंद्र;

(एक्स) **"वीज दरांतून व आकारांतून अपेक्षित महसूल"** म्हणजे प्रचलित वीज दरातून परवानाप्राप्त उद्योगापासून परवानाधारकाला मिळू शकणारा अंदाजित महसूल;

(वाय) **"शुल्क व आकार विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ खालील उप-कलम (२) च्या खंड (झेड्पी) सह कलम ८६ च्या उप-कलम (१) मधील खंड (जी) खाली विहीत करण्यांत येतील असे विनियम;

(झेड) **"दैवी आपत्तीच्या घटना"** कोणत्याही व्यक्तीच्या संदर्भात दैवी आपत्तीची घटना म्हणजे, कोणतीही घटना किंवा परिस्थिती जी त्या व्यक्तीच्या वाजवी नियंत्रणाखाली नसते किंवा त्या व्यक्तीने एखादी कृती केल्यामुळे किंवा न केल्यामुळे होत नाही आणि जी, त्या व्यक्तीला योग्य काळजी घेऊन किंवा तत्परता दाखवूनही टाळता येणे शक्य होत नाही व जी उपरिनिर्दिष्ट बाबींपुरती मर्यादित न राहता त्यांत खालील बाबींचाही समावेश असेलः-

(१) दैवी प्रकोप ज्यांत पुढील बाबींचा, परंतु केवळ त्यांचाच नव्हे, समावेश असेल- वीज, वादळ, पंच-महाभूतांपैकी कोणाचाही प्रकोप, भूकंप, पूर, दुष्काळ, आणि नैसर्गिक अनर्थ;

(२) संप, टाळेबंदी, आस्ते-कदम काम करणे, बंद किंवा इतर औद्योगिक अशांतता ;

(३) जनतेच्या शत्रूंच्या कारवाया, युध्द (घोषित किंवा अघोषित), नाकेबंदी, बंडाळी, दंगल, क्रांती, घातपात, गुंडगिरी आणि नागरी अशांतता;

(४) टाळता न येण्याजोगा अपघात ज्यांत पुढील बाबींचा, परंतु केवळ त्यांचाच नव्हे, समावेश असेल- आग, स्फोट, किरणोत्सर्जित प्रदूषण आणि धोकादायक विषारी रासायनिक प्रदूषण;

(५) ग्रीडमध्ये कोणताही बंद किंवा व्यत्यय, जो राज्य किंवा केंद्र शासनास, किंवा आयोगास किंवा स्टेट लोड डिस्पॅच सेंटरला पाहिजे असेल किंवा त्यांनी निदेशित केला असेल; आणि

(६) कोणताही बंद किंवा व्यत्यय, जो संच (प्लँट) किंवा साधनांमध्ये होऊ घातलेल्या महत्वपूर्ण बिघाडाचा गंभीर व तांतडीचा धोका टाळण्यासाठी आवश्यक असेल.

(झेडए) **"वीज निर्मिती उद्योग"** म्हणजे कोणत्याही जागेस विजेचा पुरवठा करण्यासाठी किंवा पुरवठा करणे शक्य व्हावे म्हणून विद्युत निर्मिती केंद्रामधून वीज निर्मिती करण्याचा उद्योग;

(झेडबी) **"एकूण कॅलरीतील मूल्य"** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भात संदर्भात "एकूण कॅलरीतील मूल्य" म्हणजे एक किलोग्रॅम घन इंधनाच्या किंवा एक लिटर द्रवरुप इंधनाच्या किंवा एक स्टँडर्ड घन मिटर वायुरुप इंधनाच्या, जसे असेल तसे, प्रज्वलनाने निर्माण झालेली kCal मधील उष्णता;

(झेडसी)**"केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण"** म्हणजे जनरेटर टर्मिनल्समधून एक kWh विद्युत ऊर्जा निर्माण करण्यासाठी पुरवावी लागणारी kCal मधील उष्णता ऊर्जा

(झेडडी)**"स्थापित क्षमता"** म्हणजे विद्युत निर्मिती केंद्राच्या सर्व युनिटसच्या नेम प्लेट क्षमतांची बेरीज किंवा विद्युत निर्मिती केंद्राची आयोगाने वेळोवेळी मान्यता दिलेली क्षमता (जिची जनरेटर टर्मिनल्समध्ये दखल घेतली जाते);

(झेडई)**"कमाल उपलब्ध क्षमता"** म्हणजे जल विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भात-

(१) नदीच्या पाण्यावर चालणा-या जलाशय व साठवणूकीच्या पध्दतीच्या जल विद्युत निर्मिती केंद्राकरिता, वापराकरिता उपलब्ध असललेल्या पाण्याच्या प्रचलित पातळीवर सर्व युनीटस चालवून विद्युत निर्मिती केंद्र निर्मिती करु शकणारी MW मधील कमाल क्षमता आणि जी पुढील दिवशीदेखील कमाल मागणीच्या तासांत उपलब्ध असते आणि येथे चोवीस (२४) तासांच्या कालावधीत कमाल-मागणीचे तास तीन (३) तासापेक्षा कमी नसतील;

(२) पूर्णतः नदीच्या पाण्यावर चालणा-या जल विद्युत निर्मितीकेंद्रा करिता, वापराकरिता उपलब्ध असललेल्या पाण्याच्या प्रचलित पातळीवर सर्व युनीटस चालवून विद्युत निर्मिती केंद्र निर्मिती करु शकणारी MW मधील कमाल क्षमता आणि जी पुढील दिवशीदेखील कमाल मागणीच्या तासांत उपलब्ध असते;

(झेडएफ)**“नवीन विद्युत निर्मिती केंद्र”** म्हणजे या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेच्या दिवशी किंवा त्यानंतर ज्याची सुरुवात झाली आहे असे विद्युत निर्मिती केंद्र;

(झेडजी )**“वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न”** म्हणजे वीज दरापासूनच्या उत्पन्ना व्यतिरिक्त परवानाप्राप्त उद्योगापासून मिळालेले उत्पन्न, ज्यांत इतर उद्योगापासूनच्या उत्पन्नाचा समावेश नसेल आणि वितरण परवानाधारकाच्या किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायाच्या संदर्भात, वहनापासून मिळणा-या उत्पन्नाचा व वहन आकारावरील परस्पर-अनुदानावरील (क्रॉस-सबसिडी) अधिभार आणि अतिरिक्त अधिभारापासून होणा-या प्राप्तीचा समावेश नसेल;

(झेडएच) **“अधिकारी”** म्हणजे आयोगाचा अधिकारी;

(झेडआय)**“इतर उद्योग”** म्हणजे पारेषण परवानाधारकाच्या किंवा वितरण परवानाधारकाच्या मत्तांचा कमाल विनियोग व्हावा म्हणून अशा पारेषण परवानाधारकाने अधिनियमाच्या कलम ४१ खाली आणि वितरण परवानाधारकाने अधिनियमाच्या कलम ५१ खाली चालविलेला कोणताही उद्योग;

(झेडजे)**“प्लँट लोड फॅक्टर”** ठराविक कालावधीकरिता म्हणजे, त्या कालावधीतील निर्धारित विद्युत निर्मितीस अनुरुप बाहेर पाठविलेली एकूण उर्जा, जी त्या कालावधीतील स्थापित क्षमतेस अनुरुप बाहेर पाठविलेल्या उर्जेच्या टक्केवारीत दाखविण्यांत येते व जिची गणना खालील सूत्रानुसार करण्यांत येईलः

$$\text{प्लँट लोड फॅक्टर } (\%) = 10000 \times \sum_{i=1}^{N} SG_i \ / \ \{ N \times IC \times (100\text{-}AUX_n) \} \ \%$$

जेथे-

N = ठराविक कालावधीतील वेळेच्या गटांची संख्या

SG = अशा कालावधीतील त्या वेळेतील गटांची MW मधील निर्धारित विद्युत निर्मिती

IC = विद्युत निर्मिती केंद्राची MW मधील स्थापित क्षमता

AUX = MW मधील प्रमाणकानुसारी सहाय्यकारी वापर, जो एकूण वीज निर्मितीच्या टक्केवारीत दाखविण्यांत येतो.

(झेडके) “प्रमाणित दाब” म्हणजे पारेषण यंत्रणा ज्या दाबावर चालते असा उत्पादकांनी डिझाइन केलेला दाब किंवा त्याखालील कमी दाब ज्याने वाहिनी तात्पुरती, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांशी विचार-विनियमय करून, भारीत केली जाते.

(झेडएल)**“किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसाय”** म्हणजे वितरण परवानाधारकाने त्याच्या परवान्यातील अटींना अनुसरून त्याच्या ग्राहकांना विजेची विक्री करण्याचा उद्योग;

(झेडएम )**“नदीच्या पाण्यावर चालणारे जल विद्युत निर्मिती केंद्र”** म्हणजे विद्युत निर्मिती केंद्राच्या आधी जलाशयासह किंवा जलाशयाशिवाय असलेले नदीच्या पाण्यावर चालणारे जल विद्युत निर्मिती केंद्र;

(झेडएन )**“निर्धारित विद्युत निर्मिती”** कोणत्याही वेळी किंवा कोणत्याही ठराविक ‘ ालावधीत किंवा वेळेच्या गटांत म्हणजे, एक्स-बस येथे ग़ मध्ये मिळू शकणा-या विद्युत निर्मितीचे स्टेट लोड डिस्पॅच सेंटरने दिलेले वेळापत्रक;

(झेडओ)**“सचिव”** म्हणजे आयोगाचा सचिव;

(झेडपी)**“कृतीच्या मानकांचे विनियम”** म्हणजे अधिनियमाच्या कलम ५७ आणि कलम ५९ खाली आयोग विहीत करेल ते विनियम;

(झेडक्यु)**“साठवणूकीच्या पध्दतीचे विद्युत निर्मिती केंद्र”** म्हणजे मोठ्या प्रमाणावर साठवणूकीची व्यवस्था असलेले जल विद्युत निर्मिती केंद्र जेथे विजेच्या मागणीतील बदलांना अनुरुप असे बदल विद्युत निर्मितीमध्ये करणे शक्य होते;

(झेडआर)**“पारेषण उद्योग”** म्हणजे पारेषण वाहिन्या उभारण्याचा किंवा चालू ठेवण्याचा उद्योग;

(झेडएस)**“पारेषण खुला प्रवेश विनियम”** म्हणजे अधिनियमाच्या कलम २ च्या उप-कलम (४७) सह कलम ३० खाली आयोग विहीत करेल ते विनियम;

(झेडटी)**“पारेषण व्यवस्थेचा उपयोगकर्ता”** म्हणजे पारेषण खुला प्रवेश विनियमांत करण्यांत आलेल्या तरतूदी वगळता, ठोक विद्युत पारेषण करारास अनुसरून आंतर-राज्य पारेषण व्यवस्थेत प्रवेश करण्यासाठी पारेषण क्षमतेचे हक्क देण्यांत आले आहेत, अशी व्यक्ती;

(झेडयु)**“युनिट”** औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भांत म्हणजे, वाफेवर चालणारे जनरेटर, वाफेवर चालणारे टर्बाइन, आणि सहाय्यकारी साधने आणि कम्बाइन्ड सायकलवर चालणा-या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भांत म्हणजे गॅसवर चालणारे टर्बाइन, जनरेटर आणि सहाय्यकारी साधने.

२.२ येथे उपयोजिलेले शब्द आणि व्याख्या न दिलेल्या शब्दांचा किंवा शब्द समुच्चयांचा अर्थ, अधिनियमांत किंवा त्याखाली करण्यांत आलेल्या नियम व विनियमांत नमूद केल्यानुसार असेल.

**भाग ए : सर्वसाधारण**

## ३. विनियमांची व्याप्ती व लागू असण्याची मर्यादा

३.१ अधिनिमाखाली ज्या बाबींसंदर्भात आयोगास अधिकार आहेत त्या सर्व बाबींचे विजेचे दर, त्याबाबतच्या अटी व शर्तीसह, आयोग निश्चित करेल व त्यामध्ये खालील बाबींचाही समावेश असेलः-

(१) विद्युत निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकास करावयाचा विद्युत पुरवठाः

परंतु असे की, विद्युत पुरवठ्याचा तुटवडा असल्याची आयोगाची खात्री पटल्यास, विद्युत निर्मिती कंपनी आणि परवानाधारक किंवा परवानेधारकांत आप-आपसांत करार झालेला असल्यास आयोग, एक वर्षाच्या कालावधीकरिता, विजेच्या विक्रीसाठी किंवा खरेदीसाठी वीज दराच्या किमान व कमाल मर्यादा, निश्चित करेल;

(२) विजेचे आंतर-राज्य पारेषण;

(३) जर परवानेधारकांत आप-आपसांत समझोता होऊ शकत नसेल तर, मधली पारेषण सुविधा वापरण्यासाठीचे दर व आकार;

(४) विजेचे वहन;

(५) विजेची किरकोळ विक्री;

परंतु असे की, जर दोन किंवा अधिक वितरण परवानेधारक एकाच क्षेत्रांत विद्युत पुरवठा करीत असतील, तर वितरण परवानेधारकांमध्ये स्पर्धेस वाव मिळत रहावा म्हणून आयोग विजेच्या किरकोळ विक्रीच्या दराच्या फक्त कमाल मर्यादा निश्चित करेल;

परंतु असे की, जर आयोगाने कलम ४२ खाली, काही ग्राहकांना खुल्या प्रवेशाची परववानगी दिली असेल तर, असे ग्राहक, कलम ६२च्या उप-कलम (१) मधील खंड (डी) खाली तरतूद असली तरी, कोणत्याही व्यक्तीबरोबर त्यांच्यांत समझोता होईल त्या अटी व शर्तीवर (वीज दरासह) विजेच्या पुरवठ्यासाठी किंवा खरेदीसाठी क रार करु शकतील;

(६) वितरण खुला प्रवेश विनियमांनुसार, अधिनियमाच्या कलम ४२च्या उप-कलम (२) च्या पहिल्या परंतुकाखाली विजेच्या वहनासाठीचा आकार व त्यावरील अधिभारः

(७) वितरण खुला प्रवेश विनियमांनुसार, अधिनियमाच्या कलम ४२च्या उप-कलम (४) खाली विजेच्या वहनासाठीच्या आकारावर अतिरिक्त अधिभार.

३.२ आयोगाने जर अधिनियमाच्या कलम ४२ खाली कोणत्याही ग्राहकास किंवा ग्राहकांच्या गटास खुल्या प्रवेशाची परवानगी दिली असेल तर आयोग अशा ग्राहकांसाठी किंवा ग्राहकांच्या गटासाठी, ज्यांनी वितरण यंत्रणेत खुला प्रवेश घेतला आहे, या विनियमांतील भाग-जी नुसार फक्त विजेच्या वहनावरील आकार, आणि वितरण खुला प्रवेश विनियमांनुसार अधिभार, निश्चित करेल,

३.३ आधिनियमाच्या भाग-१० खाली कोणतीही तरतूद असली तरी, विजेच्या कोणत्याही आंतर-राज्य पुरवठा, पारेषण किंवा वहनासाठी विजेचा दर, जसे असेल तसे, या दोन राज्यांच्या प्रदेशांतील असा विजेचा पुरवठा, पारेषण किंवा वहन करु इच्छिणा-या पक्षांनी आयोगाकडे अर्ज केल्यास, विजेचा

वितरण  करणारा तसेच त्याची रक्कम अदा करणारा परवानाधारक जर आयोगाच्या कार्यकक्षेखाली येत असेल तर, आयोग निश्चित करेल;

परंतु असे की, या विनियमाखाली विजेच्या पारेषण, वहन आणि पुरवठ्यासाठी करण्यांत आलेल्या अर्जाच्या संदर्भात, या विनियमांच्या अनुक्रमे भाग-एफ, भाग-जी आणि भाग-एच खाली असलेल्या अटी व शर्तींचा विचार करुनच आयोग अशा वीज दराची निश्चिती करेल;

परंतु आणखी असे की, या विनियमाखाली अर्ज करण्यांत आल्यानंतर वीज दराची निश्चिती करताना आयोग, अशा व्यवहारांतील कोणताही पक्षकार जर तो इतर राज्य आयोगांच्या किंवा केंद्रीय आयोगाच्या कक्षेखाली येत असेल तर अशा इतर राज्यांच्या राज्य आयोगाने वीज दरासाठी विहीत केलेल्या अटी व शर्तींचा आणि/ किंवा केंद्रीय आयोगाने वीज दरासाठी विहीत केलेल्या अटी व शर्तींचा, विचार करेल;

३.४ या विनियमांत कोणतीही तरतूद असली तरी, जर केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लिलावाच्या पारदर्शक प्रक्रियेतून वीज दराची निश्चिती करण्यांत आली असेल तर, आयोग असा वीज दर स्वीकारेल.

## ४. मार्गदर्शक तत्त्वे

४.१ अधिनियमाच्या कलम ६१ खाली नमूद करण्यांत आलेल्या तत्त्वांच्या मार्गदर्शनानुसार आयोग, वीज दराची निश्चिती करताना अटी व शर्ती विहीत करेल.

४.२ अधिनियमाखाली वीज दराची निश्चिती करताना आयोग कोणत्याही ग्राहकास अयोग्य प्राधान्य देणार नाही परंतु ग्राहकाचा लोड फॅक्टर, पॉवर फॅक्टर, विद्युत दाब, कोणत्याही विहीत कालावधीतील विजेचा एकूण वापर किंवा दिवसाच्या कोणत्या वेळेत वीज पुरवठ्याची गरज असते किंवा कोणत्याही क्षेत्राची भौगोलिक स्थिती, वीज पुरवठ्याचे स्वरुप आणि पुरवठ्याचे कारण लक्षांत घेऊन आयोग ग्राहकांमध्ये फरक करु शकेल.

## ५ पर्यायी अटी व शर्ती

५.१ या विनियमांतील नमूद करण्यांत आलेल्या अटी व शर्तीपेक्षा वेगळ्या असतील अशा कोणत्याही अटी व शर्तींना विद्युत निर्मिती कंपनी किंवा पररवनाधारक, जसे असेल तसे, मान्यता देऊ शकतील जर अशा वेगळ्या अटी व शर्तीमुळे,  या अटी व शर्ती ज्या कराराचा भाग आहेत त्या कराराच्या संपूर्ण कालावधीत राज्यातील ग्राहकांना विद्युत पुरवठा एकूण कमी किंमतीत होणार असेल तर;

परंतु असे की, जेथे अशा करारास, अधिनियम किंवा या विनियमांनुसार, आयोगच्या संमतीची विशेषत्वाने गरज नसेल अशा बाबी वगळून, असा करार आयोगाच्या फक्त पूर्व संमतीनेच अंमलांत येईल.

## भाग- बीः  वीज दर निश्चित करण्याची कार्यपध्दती

### ६.	वीज दर निश्चित करण्यासाठी करावयाच्या अर्जासाठीची कार्यपध्दती

६.१	वीज दर निश्चित करण्यासाठीचा कोणताही अर्ज या विनियमांत विहीत करण्यांत आलेल्या नमून्यामध्ये व पध्दतीनुसार तसेच त्यासोबत शुल्क आणि आकार विनियमांखाली विहीत करण्यांत आलेल्या शुल्कासह करण्यांत येईल.

६.२	वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगातर्फे करण्यांत येणारी कार्यवाही कामकाज प्रचालन विनियमांनुसार करण्यांत येईल.

६.३	या विनियमांत काहीही असले तरी, आयोगास कोणत्याही वेळी, स्वतःहून किंवा स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तिने केलेल्या अर्जामुळे, कोणत्याही परवानाधारकाचा किंवा विद्युत निर्मिती कंपनीचा, वीज दर त्यासंबंधीच्या अटी व शर्तीसह निश्चित करण्याचा अधिकार असेल;

परंतु असे की, वीज दराचे अशा रितीने निश्चितीकरण हे, एखाद्या कराराच्या, व्यवस्थेच्या किंवा इतर कारणाच्या अनुषंगाने, त्यास आयोगाने पूर्वी संमती दिलेली असो किंवा नसो अथवा असा करार किंवा व्यवस्था हा अधिनियम अंमलांत येण्यापूर्वी किंवा नंतर कोणत्याही वेळी केलेली असली तरी, करण्यांत येईल;

### ७.	विद्युत निर्मितीवरील विजेचा दर

७.१	अस्तित्वांत असेलेले विद्युत निर्मिती केंद्र

७.१.१ या विनियमांच्या अधिसूचनेच्या अगोदर कोणत्याही वेळी, जर विद्युत निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस आयोगाने मान्यता दिलेली असेल किंवा अस्तित्वांत असलेल्या विद्युत निर्मिती केंद्राकडून वितरण परवानाधारकास करावयाच्या विद्युत पुरवठ्याबाबतचा त्यांतील विजेचा दर आयोगाने जर स्वीकारला असेल तर, विद्युत निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकास पुरवावयाच्या विजेचा दर, हा अशा वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस अनुसरुन, आयोगाने मान्य केलेल्या किंवा स्वीकारलेल्या कालावधीकरिता राहील.

७.१.२ या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेपर्यंत जर अस्तित्वांत असलेल्या विद्युत निर्मिती कंपनीकडून वितरण परवानाधारकास करावयाच्या विद्युत पुरवठ्याबाबत विद्युत निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यातील वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस आयोगाने मान्यता दिलेली नसेल किंवा त्यांत असलेला विजेचा दर जर आयोगाने स्वीकारलेला नसेल तर किंवा जर असा कोणताही वीज खरेदी करार किंवा व्यवस्था करण्यांत आलेली नसेल तर, अशा विद्युत निर्मिती कंपनीने अशा वितरण परवानाधारकास, या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेनंतर, करावयाचा  विद्यत पुरवठा हा, आयोगाने या विनियमांच्या **भाग-डी** अन्वये मान्यता दिलेल्या वीज खरेदी करारानुसार राहील;

परंतु असे की, अशा वीज खरेदी करारास किंवा व्यवस्थेस मान्यता देण्यासाठीचा अर्ज आयोगाकडे, विद्युत निर्मिती कंपनी किंवा वितरण परवानाधारकाकडून या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेपासून तीन (३) महिन्यांच्या कालावधीच्या आंत, करण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, जोपर्यंत आयोग वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेस मान्यता देत नाही तोपर्यंत सध्याच्या करार किंवा व्यवस्थेनुसार, जसे असेल तसे, विद्युत पुरवठा चालू राहील आणि जर आयोगाने, लेखी नमूद केलेल्या कारणांसाठी त्यास नामंजूरी दिली तर वीज पुरवठा ताबडतोब खंडित करण्यांत येईल.

७.२ नवीन विद्युत निर्मिती केंद्रे

७.२.१ या विनियमांच्या **भाग-डी** नुसार जर वीज खरेदी करारास आयोगाची मान्यता घेण्यापासून सूट देण्यांत आलेली असेल तर ती वगळून इतर प्रकरणी, विद्युत निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकास नवीन विद्युत निर्मिती केंद्रामधून करावयाच्या विद्युत पुरवठ्याचा दर हा आयोगाने मान्यता दिलेल्या वीज खरेदी करारानुसार राहील.

७.३ स्वतःची विद्युत निर्मिती केंद्रे

७.३.१ जर वितरण परवानाधारक विद्युत निर्मितीचाही उद्योग करीत असेल तर, वितरण परवानाधारकाच्या विद्युत निर्मिती उद्योगाकडून त्याच्या किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायास विद्युत पुरवठा ज्या हस्तांतरण किंमतीने करण्यात येत असेल ती किंमत आयोगाकडून निश्चित करण्यांत येईल;

परंतु असे की, अशा विद्युत पुरवठ्याची हस्तांतरण किंमत निश्चित करताना या विनियमांच्या भाग-ई मध्ये विहीत करण्यांत आलेल्या अटी व शर्तींचा आयोग विचार करेल.

७.३.२ वितरण परवानाधारक त्याच्या विद्युत निर्मिती उद्योगासाठी स्वतंत्र अभिलेखे ठेवेल आणि वाटप विवरणपत्रही ठेवेल ज्यामुळे आयोगास या उद्योगावर झालेला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च व या उद्योगाच्या भाग भांडवलावर मिळणारा परतावा ठरविणे शक्य होईल.

७.३.३ वितरण परवानाधारक, या विनियमांच्या **भाग-ई** मध्ये विद्युत निर्मिती उद्योगाबाबत मागितलेली माहिती, विजेच्या किरकोळ विक्रीचा दर ठरविण्यासाठीचा अर्ज सादर करताना, त्यासोबत पाठवेल, ज्यामुळे या भागांत नमूद करण्यांत आलेल्या अटी व शर्तीनुसार किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायास करण्यांत आलेल्या पुरवठ्याची हस्तांतरण किंमत निश्चित करणे आयोगास शक्य होईल.

७.४ या विनियम ७ मध्ये कोणतीही तरतूद असली तरी, विद्युत निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकास पुरवठा करावयाच्या विजेचा दर जर केंद्र शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लिलावाच्या पारदर्शक प्रक्रियेतून निश्चित करण्यांत आलेला असेल तर, आयोग असा वीज दर स्वीकारेल;

परंतु असे की, केंद्र शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे यथोचित पालन करण्यांत आले आहे, याबाबत आयोगाची खात्री पटावी म्हणून, आयोग मागेल ती माहिती आयोगास अर्जदाराकडून पुरविण्यांत येईल.

## ८. पारेषण, वहन आणि विजेच्या किरकोळ विक्रीसाठी विजेचे दर निश्चित करणे

८.१ या विनियम ८ खाली नमूद करण्यांत आलेल्या पध्दतीनुसार परवानाधारकाने केलेल्या अर्जाच्या संदर्भांत आयोग पारेषण, वहन आणि विजेच्या किरकोळ विक्रीसाठी विजेचे दर निश्चित करेल.

८.२ आयोग खालील बाबींसाठी विजेचे दर निश्चित करेलः-

(ए) या विनियमांच्या **भाग-एफ** मध्ये नमूद करण्यांत आलेल्या अटी व शर्तींनुसार, विजेच्या पारेषणासाठी;

(बी) या विनियमांच्या **भाग-जी** मध्ये नमूद करण्यांत आलेल्या अटी व शर्तींनुसार, विजेच्या वहनासाठी;

(सी) या विनियमांच्या **भाग-एच** मध्ये नमूद करण्यांत आलेल्या अटी व शर्तींनुसार, विजेच्या किरकोळ विक्रीसाठी.

८.३ आयोगास करावयाच्या अर्जाचा एक भाग म्हणून, आयोग वेळोवेळी ठरवेल त्या नमून्यांत, अर्जदार, त्याच्या परवान्याच्या अटींच्या संदर्भांत त्याची एकूण महसूलाची गरज, वीज दर व आकारांपासून मिळणारा अपेक्षित महसूल यांची परिगणना केल्याचा संपूर्ण तपशील देईल आणि त्यानंतर या परिगणना पडताळून पाहण्यासाठी आयोग, सचिव किंवा आयोगाने यासाठी निर्देशीत केलेल्या अधिका-याने वाजवीरित्या आवश्यक असलेली जादा माहिती, तपशील किंवा कागदपत्रे मागितल्यास ती , सादर करेल;

परंतु असे की, एकूण महसूलाची गरज जर उत्पन्नापेक्षा जास्त असेल तर हा फरक, असल्यास तो, कशा रितीने भरुन काढण्यांत येईल ते दाखविणारा वीज दरास मंजरीसाठीचा सविस्तर सुधारित प्रस्ताव, जेथे आवश्यक असेल तेथे, अर्जासोबत पाठविण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, एकूण महसूलाच्या गरज अजमावण्यासठी आणि वीज दराची निश्चिती करण्यासाठी, जसे असेल तसे, आयोग, त्यास वाजवीरित्या योग्य वाटेल असा तपशील अर्जदाराने सादर करण्याकरिता वेळोवेळी अतिरिक्त/ पर्यायी नमूने विहीत करु शकेल.

८.४ या विनियमांमध्ये विहीत करण्यांत आलेल्या बाबींच्या संदर्भात आवश्यक असलेली सर्व माहिती, तपशील व कागदपत्रे यांच्यासह परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतरच, अर्ज प्राप्त झाला आहे असे मानण्यांत येईल आणि आयोग, सचिव किंवा आयोगाने यासाठी निर्देशीत केलेला अधिकारी अर्जदारास अर्ज प्रसिध्दीसाठी तयार असल्याचे कळवेल.

८.५ वरील विनियम ८.४ प्रमाणे सूचित करण्यांत आल्यानंतर तीन (३) दिवसांच्या आंत, अर्जदार, त्याच्या भागांत मोठा खप असणा-या किमान दोन (२) इंग्रजी आणि दोन (२) मराठी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रांत, प्रस्तावित वीज दर आणि आयोग ठरवून देईल अशा इतर बाबी नमूद करून जनतेकडून हरकती मागविण्यासाठी, एक नोटीस प्रसिध्द करेल;

परंतु असे की आयोग ठरवून देईल त्या दराने व त्या ठिकाणी अर्जाची प्रत स्वारस्य असणा-या व्यक्तीस अर्जदार उपलब्ध करुन देईल.

परंतु आणखी असे की, अर्जदार त्याच्या इंटरनेटवरील वेब-साइटवरही, उतरवून घेता येईल अशा मोठ्या (सुपरशीट) नमून्यांत, सविस्तर आकडेवारी, आयोगास सादर केलेला अर्ज त्यासोबतच्या नियमानुसार दाखल करावी लागणारी सर्व (रेगलेटरी) माहिती, तपशील आणि कागपत्रांसह प्रसिध्द करेल;

परंतु आणखी असे की विनियम ८.५ मधील दुस-या परंतुकामध्ये नमूद करण्यांत आलेली माहिती असलेल्या वेब-साईटला प्रवेश सुलभरित्या मिळू शकणारा असेल व ही माहिती त्याच्या इंटरनेटवरील साईटवर ठळकपणे प्रदर्शीत करण्यांत आलेली असेल.

परंतु तथापि असे की, अर्जदार गोपनीय स्वरुपाची असलेली माहिती, तपशील किंवा कागदपत्रे, आयोगाच्या पूर्व-परवानगीने, प्रदर्शीत करेल किंवा करणार नाही;

स्पष्टीकरणः- या विनियमाच्या प्रयोजनाकरिता, 'उतरवून घेता येईल अशा मोठ्या (सुपरशीट) नमून्यांत' म्हणजे एक ( किंवा बहुविध, जोडलेल्या) मोठ्या आकाराच्या सॉफ्टवेअरमधील फाइल्स ज्यामध्ये सर्व गृहिते, सूत्रे, परिगणनेचे व सॉफ्टवेअरचे मॅक्रोज व आउटपुटचे तपशील, ज्याच्या आधारे अर्ज तयार करण्यांत आला आहे त्या सर्व बाबी असतील.

८.६ आयोगाच्या आवश्यकतेनुसार अर्जदार, सर्व पुस्तके व अभिलेखे (किंवा त्यांच्या प्रमाणित सत्य प्रती) लेखा विवरणपत्रे आणि कामकाज व खर्चासंबधीच्या माहितीसह, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी, आयोगास सादर करेल.

८.७ आयोग, त्यास आवश्यक वाटल्यास, अर्जदाराने आयोगास पुरविलेली माहिती- पुस्तके व अभिलेखे (किंवा त्याच्या प्रमाणित सत्य प्रती) यांच्या गोषवा-यासह, कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वेळी, कामकाज प्रचालनाच्या विनियमांत विहीत करण्यांत आलेल्या अटी व शर्तींवर, उपलब्ध करुन देईल किंवा उपलदब्ध करुन देण्याची व्यवस्था करेल;

परंतु असे की, आयोगाजवळ असलेली कोणतीही माहिती, दस्तऐवज, कागदपत्रे ही गोपनीय व विशेष स्वरुपाची राहतील आणि ती तपासणीसाठी किंवा त्याच्या प्रमाणित प्रती पुरवठ्यासाठी उपलब्ध होऊ शकणार नाही, याबाबत आयोग आदेश काढून निदेश देऊ शकेल आणि असे दस्तऐवज, कागदपत्रे यांचा वापर आयोग विशेषत्वाने परवाानगी देईल त्या कारणांशिवाय अन्य कोणत्याही प्रकारे करता येणार नाही, असेही निदेश आयोग देऊ शकेल.

८.८ या विनियम ८ मध्ये उल्लेखलेल्या अर्जासंबंधीच्या कार्यपध्दतीच्या बाबी, प्रत्येक वैयक्तिक प्रकरणांतील परिस्थिती लक्षांत घेतल्यावर आयोगास पाहिजे असतील तितक्या मर्यादेपर्यंतच, खालील प्रकरणी लागू राहतीलः-

(ए) अधिनियमाच्या कलम ३६च्या उप-कलम (१) च्या परंतुकाखाली परवानाधारकाने केलेल्या अर्जास;

(बी) अधिनियमाच्या कलम ६४च्या उप-कलम (५) खाली वितरण परवानाधारकाने केलेल्या अर्जास.

## ९. वीज दराच्या निश्चितीकरणासाठी करावयाच्या अर्जासाठीची काल-मर्यादा

९.१ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी करावयाचा अर्ज, ज्या तारखेस असा वीज दर अंमलांत आणावयाचा असेल त्या उद्देशित तारखेच्या एकशे वीस (१२०) दिवस आधी, करण्यांत येईलः

परंतु असे की, या विनियमाच्या प्रयोजनासाठी, अर्ज प्राप्त झाल्याची तारीख ज्या दिवशी, विनियम ८.४ नुसार, पूर्ण अर्ज प्राप्त झाला ती राहील.

परंतु आणखी असे की, बहु-वर्षीय वीज दराच्या रचनेखाली-

(१) कोणत्याही आर्थिक वर्षासाठीच्या वीज दराच्या निश्चितीकरणाचा अर्ज, ते आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या एकशे वीस (१२०) दिवस आधी, करण्यांत येईल;

(२) वार्षिक कामगिरीच्या आढाव्यासाठीचा अर्ज, नियंत्रण कालावधीच्या कोणत्याही आर्थिक वर्षात, असे आर्थिक वर्ष संपण्यापूर्वी एकशे वीस (१२०) दिवस आधी, करण्यांत येईल.

## १०. वीज दराचा आदेश

१०.१ पूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर एकशे वीस (१२०) दिवसांच्या आंत आणि जनतेकडून आलेल्या सर्व सूचना व हरकती विचारांत घेतल्यानंतर आयोग-

(ए) अर्जाचा स्वीकार करून वीज दराचा आदेश, बदलांसह किंवा आदेशांत नमूद केलेल्या अटींसह, निर्गमित करेल; किंवा

(बी) जर असा अर्ज अधिनियम किंवा त्याखाली करण्यांत आलेल्या नियम आणि विनियमांतील किंवा सध्या अंमलांत असणा-या कोणत्याही कायद्यातील तरतदींनुसार नसेल तर, तशी कारणे लेखी नमूद करुन, आयोग सदर अर्ज नामंजूर करेलः

परंतु असे की, अर्ज नामंजूर करण्यापूर्वी अर्जदारास त्याची बाजू मांडण्यासाठी वाजवी संधी देण्यांत येईल.

१०.२ आयोगाने मंजूर केलेला किंवा केलेले वीज दर/वीज दरांची अनुसूची अर्जदार त्याच्या परवान्याच्या क्षेत्रांतील खप असणा-या किमान दोन (२) इंग्रजी आणि दोन (२) मराठी भाषेतील दैनिक वर्तमानपत्रांत प्रसिध्द करेल आणि त्याच्या इंटरनेटवरील वेब-साइटवरही प्रदर्शीत करेल आणि असा किंवा असे वीज दर, जसे असेल तसे, असणारी एक पुस्तिका, जो मागेल त्या कोणाही व्यक्तीस, तिच्यावर पुनर्निमितीसाठी झालेल्या वाजवी खर्चाचा भरणा केल्यावर, उपलब्ध करुन देईल;

परंतु असे की, अर्जदार जर विद्युत निर्मिती कंपनी असेल तर, वीज दराच्या आदेशांतील अटींनुसार ज्या वितरण परवानाधारकास विद्युत पुरवठा करावयाचा आहे त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रांत मोठा खप असणा-या वर्तमानपत्रांमध्ये वीज दराच्या आदेशास प्रसिध्दी देण्यांत येईल व तसेच तो वितरण परवानाधारकाच्या इंटरनेटवरील वेब-साइटवरही प्रदर्शीत करण्यांत येईल.

१०.३ अशा रितीने प्रसिध्द करण्यांत आलेला वीज दर हा आदेशांत नमूद करण्यांत आलेल्या तारखेपासून अंमलांत येईल आणि जर त्यांत दुरुस्ती किंवा त्याची मंजूरी रद्द करण्यांत आली नाही तर तो त्यांत ठरवून देण्यांत आलेल्या कालावधीकरिता अंमलांत राहील.

## ११. वीज दराचे पालन

११.१ सर्वसाधारणपणे कोणताही वीज दर किंवा त्याचा भाग यांत कोणत्याही आर्थिक वर्षातून एकापेक्षा अधिक वेळा बदल करण्यांत येणार नाही; यास फक्त विनियमाच्या कलम ८२ खाली विहीत करण्यांत आलेल्या कोणत्याही इंधन अधिभाराच्या सूत्राच्या संदर्भांत कोणत्याही बदलांना स्पष्टपणे परवानगी देण्यांत आली असेल तर त्यांचा अपवाद राहील.

११.२ आयोग, ज्या कारणांमळे त्याची खात्री पटली असेल ती कारणे लेखी नोंदवून, वीज दरांत सुधारणा करण्यास मुभा देईल.

११.३ अधिनियमाच्या कलम ६२ खाली आणि या विनियमांना अनुसरुन निश्चित करण्यांत आलेल्या वीज दराहून अधिक किंमत किंवा आकार जर एखाद्या परवानाधारकाने किंवा विद्युत निर्मिती कंपनीने वसूल केला तर ज्या व्यक्तीने अशा किंमतीचा किंवा आकारांचा भरणा केलेला आहे ती व्यक्ती, अशी जादा भरणा केलेली रक्कम अधिक भारतीय रिझर्व्ह बँकेच्या बँक दराने त्या रकमेवर होणारे व्याज, अशा परवानाधारक किंवा विद्युत निर्मिती कंपनीकडून वसूल करेल. मात्र अशी वसूली करताना तो परवानाधारक किंवा ती विद्युत निर्मिती कंपनी इतर कोणत्याही दायित्वास जबाबदार ठरत असल्यास ते दायित्व वसूल करण्याचा आपला हक्क अशी व्यक्ती अबाधित ठेवेल.

११.४ आयोग मागेल त्याप्रमाणे परवानाधारक, कामकाजाबाबतच्या आणि खर्चाच्या माहितीबाबतचे नियत-कालिक विवरण-पत्र, सादर करेल ज्यामुळे आयोगास त्याच्या आदेशाच्या अंमलबजावणीवर संनियंत्रण ठेवणे तसेच ज्या आधारावर वीज दरास मान्यता देण्यांत आली होती त्याची फेर-पडताळणी करणे शक्य होईल.

**भाग-सी : बहु-वर्षीय वीज दर**

## १२. बहु-वर्षीय वीज दराची रचना

१२.१ वरील विनियम ३.१च्या खंड (१), (२), (४) व (५) मधील बाबींसंदर्भात आयोग बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीत वीज दराचे निश्चितीकरण १ एप्रिल, २००६ पासून करेलः

परंतु असे की, अर्जदाराने आयोगाकडे अर्ज केल्यास आयोग परवानाधारकास किंवा परवानोधारकांच्या समुहास अशा बहु-वर्षीय वीज दराच्या चौकटीत वीज दराचे निश्चितीकरण करण्यापासून सूट, अशा सूटीबाबतच्या आदेशांत नमूद केलेल्या कालावधीकरिता, देऊ शकेल.

१२.२ एकूण महसूलाची गरज आणि वीज दर व आकार यांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाची परिगणना करण्यासाठी, बहु-वर्षीय वीज दराची रचना खालील घटकांवर आधारित राहील-

(१) नियंत्रण कालावधी, ज्याच्या सुरुवातीला एकूण महसूलाची गरज आणि वीज दर व आकार यांपासून मिळणारा अपेक्षित महसूल याबाबतचे पूर्व-अनुमान अर्जदार आयोगास सादर करेल व आयोग त्यास मान्यता देईल;

(२) नियंत्रण कालावधीतील एकूण महसूलाची गरज आणि वीज दर व आकार यांपासून मिळणारा अपेक्षित महसूल याबाबतचे अर्जदाराचे पूर्व-अनुमान हे आर्थिक व कामकाजांतील सुप्त बदलांच्या अपेक्षित परिणामांबाबत त्याने केलेल्या वाजवी गृहितांवर आधारित असतील;

(३) अर्जदाराच्या कामगिरीत प्रोत्साहन-अधिदान देऊन किंवा न देऊन सुधारणा घडवून आणावयाची असल्यास विशिष्ट घटकांच्याबाबत आयोगातर्फे एक मार्गदर्शिका (ट्रॅजेक्टरी) विहीत करण्यांत येईल ;

(४) मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानाच्या संदर्भात वार्षिक कामगिरीचा आढावा आणि कामगिरीतील तफावतीच्या कारणांची, अर्जदाराच्या नियंत्रणाखाली असलेल्या बाबींमुळे (नियंत्रणाधीन असलेल्या) व नियंत्रणाखली नसलेल्या बाबींमुळे (नियंत्रणाधीन नसलेल्या) बाबीमुळे उदभवलेली, अशी वर्गवारी करणे;

(५) नियंत्रणाधीन नसलेल्या बाबीमुळे झालेला मान्यताप्राप्त नफा किंवा तोटा गाहकांना लागू करण्यासंबंधीचे सूत्र;

(६) नियंत्रणाधीन असलेल्या बाबीमुळे झालेला मान्यताप्राप्त नफा किंवा तोटा हिस्से पाडून वाटून घेण्यासाठीचे सूत्र;

(७) मान्यताप्राप्त पूर्व-अनुमान आणि वार्षिक कामगिरीच्या आढाव्याच्या निष्कर्षावर आधारित, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता वीज दराचे निश्चितीकरण.

## १३ विनियम कोणाला लागू असतील

१३.१ बहु-वर्षीय वीज दराची रचना विजेच्या पारेषणासाठी, वहनाकरिता आणि राज्यांत विजेची किरकोळ विक्री करण्याकरिता विजेच्या दर निश्चितीकरणासाठी करण्यांत आलेल्या अर्जांना लागू असेल.

१३.२ विनियम १२.२च्या खंड (३) मध्ये नमूद केलेल्या स्वरुपाची मार्गदर्शिका, आयोग खालील प्रकरणी वीज दराची निश्चिती करताना, विहीत करेल-

(१) विद्युत निर्मिती केंद्र;

(२) विद्युत निर्मिती कंपनी; आणि/ किंवा

(३) परवानाधारक त्याच्या विद्युत निर्मिती उद्योगाकरिता;

परंतु असे की, अशी मार्गदर्शिका विहीत करताना आयोग कोणत्याही मान्यताप्राप्त वीज खरेदी करारातील अटी व शर्ती विचारांत घेईल.

## १४. नियंत्रण कालावधी

१४.१ पांच (५) आर्थिक वर्षाच्या नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता अर्जदार त्याची एकूण महसूलाची गरज आणि वीज दर व आकार यांपासून मिळणारा अपेक्षित महसूल याबाबतचे त्याचे पूर्व-अनुमान आयोगाकडे मान्यतेसाठी सादर करेल;

परंतु असे की, या भागाखाली आयोगाकडे करण्यांत आलेल्या पहिल्या अर्जाकरिता नियंत्रण कालावधी हा तीन (३) आर्थिक वर्षांचा, म्हणजे १ एप्रिल, २००६ ते ३१ मार्च, २००९ असा राहील;

परंतु आणखी असे की, राज्यांत बहु-वर्षीय वीज दराची रचना अंमलांत आणतांना मिळालेल्या अनुभवाच्या आधारे आयोग, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, पुढील नियंत्रण कालावधीचा अवधि, वाढवू किंवा कमी करु शकेल;

परंतु असेही की, अशा रितीने पुढील नियंत्रण कालावधीचा अवधी, बाधित व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय आयोग वाढविणार किंवा कमी करणार नाही;

परंतु असेही की, कोणत्याही नियंत्रण कालावधीचा अवधि हा अशा नियंत्रण कालावधीच्या अवधीत आयोग वाढविणार किंवा कमी करणार नाही.

## १५. पूर्व-अनुमान

१५.१ अर्जदार त्याची एकूण महसूलाची गरज आणि वीज दर व आकारांासून मिळणारा अपेक्षित महसूल याबाबतचे त्याचे पूर्व-अनुमान, या विनियमाच्या **भाग-बी** मध्ये केलेल्या तरतूदींनुसार, आवश्यक शुल्कासोबत आणि काल-मर्यादित, आयोगास सादर करेल.

१५.२ <u>एकूण महसूलाच्या गरजेचे पूर्व-अनुमान</u>

१५.२.१ अर्जदार त्याच्या एकूण महसूलाच्या गरजेचे पूर्व-अनुमान खालील दोनपैकी कोणत्याही एका पध्दतीचा अवलंब करुन विकसित करु शकेलः-

- (ए) एकूण महसूलाची गरज ज्या घटकांवर अवलंबून असते त्यातील प्रत्येक घटकाच्या नियंत्रण कालावधीत होणा-या परिणामासंबधीची गृहिते; किंवा
- (बी) खालील बाबींसंबंधीचे गृहिते-
  - (१) सुयोग्य मॅक्रो-इकॉनॉमिक किंवा बाजारपेठेतील निर्देशांक, किंवा यांचा संयोग, यांच्यात होणारा टक्केवारीतील वार्षिक बदल, ज्याच्याशी अर्जदाराची एकूण महसूलाची गरज निगडीत असेल; आणि
  - (२) नियंत्रण कालावधीत कार्यक्षमतेत किंवा उत्पादकतेत अर्जदाराने प्रस्तावित केलेले साध्य करावयाचे लाभ ज्यामुळे एकूण महसूलाच्या गरजेत होणारी टक्केवारीतील वार्षिक कपात;

परंतु असे की, १ एप्रिल, २००६ पासून सुरू होणा-या नियंत्रण कालावधीत या विनियमाखाली करण्यांत येणा-या अर्जासोबत जोडण्यांत येणारे पूर्व-अनुमान हे वरील खंड (ए) येथे नमूद केलेल्या पध्दतीचा उपयोग करून विकसित करण्यांत आलेले असतील.

१५.२.२कोणत्याही नियंत्रण कालावधीत जर अर्जदारास एकूण महसूलाच्या गरजेचे पूर्व-अनुमान करण्याच्या पध्दतीत बदल करावयाचा असेल म्हणजे-

(ए) विनियम १५.२.१ मधील खंड (ए) पासून खंड (बी) मध्ये; किंवा

(बी) विनियम १५.२.१ मधील खंड (बी) पासून खंड (ए) मध्ये;

तर तो पध्दतीतील बदलास आयोगाची मान्यता मिळण्यासाठी आयोगाकडे असा नियंत्रण कालावधी सुरु होण्याच्या किमान नऊ (९) महिने आधी अर्ज त्यासोबत या बदलासाठीची सयुक्तिक कारणमिमांसा व आयोग मागेल त्या इतर माहितीसह सादर करेल.

१५.२.३अशा अर्जाची छाननी केल्यानंतर आणि बाधित व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, आयोग-

(ए) अशा पध्दतीतील बदलास मान्यता देऊन त्यासंबंधीचा आदेश, त्यांत विहीत केलेल्या अटींना अधीन राहून काढेल; किंवा

(बी) जर अधिनियमाच्या कलम ६१ मधील तत्त्वांना किंवा या विनियमांना अनुसरून अर्ज नसेल तर त्यासंबंधीची कारणे लेखी नोंदवून आयोग सदर अर्ज नामंजूर करेल.

## १५.३ <u>वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाबाबतचे पूर्व-अनुमान</u>

१५.३.१अर्जदार त्याला वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाचे पूर्व-अनुमान खालील आधारे विकसित करु शकेल-

(ए) पारेषण परवानाधारकाच्या प्रकरणी, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षांत पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना वाटप केलेल्या पारेषण क्षमतेबाबतचे अंदाज;

(बी) वितरण परवानाधारकाच्या प्रकरणी, नियंत्रण कालावधीतील प्रत्येक आर्थिक वर्षांत वितरण यंत्रणा उपयोगकर्त्यांच्या वतीने ग्राहकांना पुरविलेल्या विजेच्या आणि वहन केलेल्या विजेच्या परिमाणांचे अंदाज;

(सी) अर्ज करण्याच्या तारखेस असलेले प्रचलित वीज दर.

१५.४ पूर्व-अनुमानाच्या समर्थनार्थ अर्जदार पुढील बाबींसंदर्भातील, परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित न राहता संपूर्ण तपशील म्हणजे, मागील कामगिरी, कार्यक्षमता किंवा उत्पादकतेतील वाढीचे लाभ मिळविण्यासाठी करण्यांत येत असलेली उपाय-योजना, तांत्रिक अभ्यास, करारबध्द व्यवस्था आणि/ किंवा दुय्यम संशोधन, आयोगास पुरवेल ज्यामुळे आयोगास त्याच्या पूर्व-अनुमानाचा वाजवीपणा पडताळून पाहणे शक्य होईल.

१५.५ अर्जाचा अभ्यास केल्यानंतर, आयोग-

(ए) अर्जदाराच्या नियंत्रण कालावधीतील एकूण महसल गरजेच्या आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाच्या पूर्व-अनुमानास मान्यता देऊन ,

त्याबाबतचा आदेश, त्यांत विहित केलेल्या बदलांना व शर्तींना अधिन राहून, काढेल; किंवा

(बी) जर अधिनियमाच्या कलम ६१ मधील तत्त्वांना किंवा या विनियमांना अनुसरून अर्ज नसेल तर त्यासंबंधीची कारणे लेखी नोंदवून आयोग सदर अर्ज नामंजूर करेल आणि आयोगास उचित वाटतील असे घटक लक्षांत घेऊन सुधारित पूर्व-अनुमान सादर करण्याचे निदेश आयोग अर्जदारास देईल.

१५.६ अर्जदाराच्या एकूण महसल गरजेच्या व वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलातील ज्या घटकांचा, विनियम १७ला अनुसरून वार्षिक कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून आयोगास आढावा घ्यावयाचा असेल ते घटक, वरील विनियम १५.५ मधील आपल्या आदेशांत आयोग विहीत करेल;

परंतु असे की, हे घटक अर्जदाराच्या प्रमुख़ खर्च व उत्पन्नाच्या बाबींपुरतेच मर्यादित राहतील, ज्यांचा, आयोगाच्या मते, नियंत्रण कालावधीत राज्यांतील ग्राहकांना पुरवावयाच्या विजेच्या खर्चावर मोठा परिणाम होऊ शकतो.

परंतु आणखी असे की, खालील विनियम १६ नुसार आयोग विहीत करेल ते घटक, जर आयोगाने आपल्या आदेशांत अशा आढाव्यातून त्यांना सूट दिलेली नसेल तर ते, वार्षिक कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग बनतील,

## १६. काही घटकांसाठी विशिष्ट मार्गदर्शिका

१६.१ राज्यांतील वीज उद्योगाचे पुनर्गठन, पुनर्रचना आणि विकास लक्षांत घेऊन आयोग काही घटकांकरिता, एक किंवा अधिक नियंत्रण कालावधींकरिता, मार्गदर्शिका विहीत करेल;

परंतु असे की, ज्या घटकांकरिता मार्गदर्शिका विहीत करण्यांत येईल त्यांत पुढील बाबींचा, परंतु केवळ त्यांच्यापुरतेच मर्यादित न राहता, समावेश असेल - विद्युत निर्मिती केंद्रांची उपलब्धता, केंद्रातील उष्णतेचे प्रमाण, पारेषण तोटे, वितरण तोटे आणि वसूलीतील कार्यक्षमता.

१६.२ जर आयोगाने या विनियम १६ खाली काही घटकांसाठी मार्गदर्शिका विहीत केली असेल तर, या विनियमांच्या **भाग-ई, भाग-एफ, भाग-जी** किंवा **भाग-एच** मध्ये विहीत करण्यांत आलेले निकष, जसे असेल तसे, अशा घटकांना अशी मार्गदर्शिका विहीत करण्यांत आलेल्या कालावधीत लागू राहणार नाहीत.

१६.३ या विनियम १६ नुसार आयोगाने विहीत केलेल्या मार्गदर्शिकेचा समावेश, अर्जदार विनियम १५ खालील त्याच्या एकूण महसल गरजेच्या आणि/ किंवा वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाच्या पूर्व-अनुमानात करेल.

## १७ कामगिरीचा वार्षिक आढावा

१७.१ जर एखाद्या विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाची एकूण महसल गरज आणि वीज दर व आकारांपासून मिळणारा अपेक्षित महसूल बहु-वर्षीय वीज दर रचनेखाली येत असेल तर, अशा विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाचा, जसे असेल तसे, या विनियमास अनुसरून नियंत्रण कालावधीत कामगिरीचा वार्षिक आढावा घेण्यांत येईल.

१७.२ परवानाधारक किंवा विद्युत निर्मिती कंपनी विनियम ९ खाली विहीत करण्यांत आलेल्या काल-मर्यादेत कामगिरीचा वार्षिक आढावा घेण्यासाठी अर्ज करेल;

परंतु असे की, एकूण महसूल गरजेचा आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाचे मान्यताप्राप्त पूर्व-अनुमान व आर्थिक कामगिरीतील तफावत व तिची कारणे व व्याप्ती तपासणे आयोगास शक्य व्हावे म्हणून, परवानाधारक किंवा विद्युत निर्मिती कंपनी, जसे असेल तसे, आयोग वेळोवेळी विहीत करेल त्या नमून्यांत आयोग मागेल त्या माहितीसह लेखा विवरणपत्रे, लेखा पुस्तकांचे उतारे, आणि इतर तपशील सादर करेल;

परंतु आणखी असे की, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर करण्यासाठी व तो हाताळण्यासाठी व तो सादर करण्याच्या काल-मर्यादेबाबत, या विनियमाच्या **भाग-बी**मध्ये विहीत करण्यांत आलेल्या पध्दतीनुसार, कामगिरीचा वार्षिक आढावा घेण्यासाठीचा अर्ज आयोगाकडे सादर करण्यात येईल व त्या पध्दतीनुसार आयोगाकडून तो हाताळण्यांत येईल.

१७.३ कामगिरीच्या वार्षिक आढाव्याची व्याप्ती ही विद्युत निर्मिती कंपनी किंवा वितरण परवानाधारकाच्या कामगिरीची तुलना एकूण महसूल गरजेच्या आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाच्या मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानाशी करण्या संदर्भात राहील व त्यांत खालील बाबींचाही समावेश असेल-

(ए) मागील आर्थिक वर्षाच्या मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानाशी अर्जदाराच्या मागील आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षीत कामगिरीची तुलना करणे; आणि

(बी) चालू आर्थिक वर्षाच्या मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानाशी अर्जदाराच्या चालू आर्थिक वर्षाच्या अर्ध्या भागांतील कामगिरीची तुलना करणे.

१७.४ कामगिरीचा वार्षिक आढावा घेण्यासाठी आयोगास वेळोवेळी जी माहिती लागेल ती माहिती, आयोग विहीत करेल त्या नमुन्यांत, अर्जदार सादर करेल.

१७.५ आयोगाने विनियम १५.६ खाली जे घटक विहीत केले असतील त्यांच्या बाबतीत, मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानाच्या संदर्भात अर्जदाराच्या कामगिरीचा आयोगाकडून सविस्तर आढावा, कामगिरीच्या वार्षिक आढाव्याचा एक भाग म्हणून घेण्यांत येईल.

१७.६ वरील विनियम १७.५ नुसार आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोगाने विनियम १५.६ खाली विहीत केलेल्या घटकांसाठी कोणत्याही तफावती किंवा अपेक्षित तफावती आढळल्यास त्यांचा संबंध,

अर्जदाराच्या नियंत्रणाखाली असलेल्या बाबींशी (नियंत्रणाधीन असलेल्या) किंवा नियंत्रणाखाली नसलेल्या बाबींशी (नियंत्रणाधीन नसलेल्या) बाबींशी, आयोग जोडेल;

परंतु असे की, वरील विनियम १५.६ मध्ये उल्लेखलेल्या घटकांशिवाय अन्य घटकांमुळे जर कामगिरीत कोणत्याही तफावती किंवा अपेक्षित तफावती आढळल्या तर, नियंत्रण कालावधीत आयोग त्याचा आढावा घेणार नाही व या तफावतींचा संबंध पूर्णतः नियंत्रणाधिन असणा-या बाबींशी जोडण्यांत येईल;

परंतु तथापि असे की, जर अर्जदार किंवा स्वारस्य असलेली व्यक्ती किवा बाधित व्यक्तीची अशी खात्री असेल की, वरील विनियम १५.६ खाली न उल्लेखलेल्या घटकांत, कोणत्याही आर्थिक वर्षांत, महत्वाची तफावत किंवा अपेक्षित तफावत नियंत्राणधिन नसलेल्या बाबीमुळे झाली आहे तर, असा अर्जदार किंवा स्वारस्य असलेली व्यक्ति किंवा बाधित व्यक्ति अशा घटकाचा समावेश अशा आर्थिक वर्षात, आयोगास योग्य वाटल्यास, वरील विनियम १७.५ खालील आढाव्यामध्ये करण्यासाठी आयोगाकडे अर्ज करेल.

स्पष्टीकरण- या विनियोगाच्या प्रयोजनाकरिता, 'नियंत्राणधिन नसलेल्या घटकां' मध्ये आयोगाने निश्चित केलेल्या खालील घटकांचा समावेश असेल , जे अर्जदाराच्या नियंत्रणाबाहेरील असतील व ज्यांच्यावर अर्जदार मात करू शकणार नाही-

(ए) दैवी आपत्तीच्या घटना;

(बी) कायद्यांत बदल, न्यायालयीन निर्णय आणि केंद्र शासन, राज्य शासन किंवा आयोगाचे आदेश;

(सी) आर्थिक परिणाम करणारे पुढील अकल्पित बदल - चलनवाढीचा दर, बाजारातील व्याज दर, कर आणि वैधानिक लेव्ही.

१७.६.१ अर्जदाराच्या कामगिरीतील ज्या तफावती किंवा अपेक्षित तफावतींचा संबंध आयोगाकडून नियंत्राणाधीन नसलेल्या बाबींशी जोडण्यांत येईल त्यापैकी काही नमूना तफावती, परंतु फक्त तेवढ्याच नव्हे, उदाहरणार्थ खालीलप्रमाणे असतील-

(ए) विनियम २५ मध्ये विहीत केलेल्या परिस्थितीमुळे वीज निर्मितीच्या आणि/ किंवा विजेच्या खरेदीच्या खर्चातील तफावत;

(बी) ग्राहकांच्या संख्येत किंवा रचनेत किंवा ग्राहकांना पुरविलेल्या विजेच्या परिमाणांत झालेल्या तफावती;

परंतु असे की, जर अर्जदाराच्या क्षेत्रांत एकाहून अधिक वितरण परवानेधारक असतील तर दोन किंवा अधिक वितरण परवानेधारक असलेल्या एकाच क्षेत्रांतील ग्राहकांच्या संख्येत किंवा रचनेत किंवा ग्राहकांना पुरविलेल्या विजेच्या परिमाणांत झालेली तफावत नियंत्रणाधिन असणा-या बाबींशी जोडण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, कोणीही ग्राहक किंवा ग्राहकांची वर्गवारी जर अधिनियमाच्या कलम ४२ उप-कलम (३) नुसार खुल्या प्रवेशासाठी पात्र असेल

तर खुल्या प्रवेशासठी पात्र असणा-या ग्राहकांच्या संख्येत किंवा रचनेत किंवा ग्राहकांना पुरविलेल्या विजेच्या परिमाणांत झालेली तफावत नियंत्रणाधिन असणा-या बाबींशी जोडण्यांत येईल.

१७.६.२ अर्जदाराच्या कामगिरीतील तफावतीपैकी ज्या तफावतींचा किंवा अपेक्षित तफावतींचा संबंध आयोगाकडून नियंत्राणाधीन असलेल्या बाबींशी जोडण्यांत येईल त्यामध्ये खालील काही नमुना तफावतींचा , परंतु फक्त तेवढ्याच नव्हे, समावेश असेल-

(ए) भांडवली खर्चाचे प्रकल्प राबविताना झालेल्या विलंबामुळे किंवा वस्तूंच्या वाढलेल्या किंमतीमुळे/ अकार्यक्षमतेमुळे उद्‌भवलेल्या तफावती, ज्या प्रकल्पाच्या व्याप्तीत मान्यता देण्यांत आलेल्या बदलांशी, वैधानिक लेव्हीतील बदल किंवा दैवी आपत्तीच्या घटनांशी जोडता येत नाहीत;

(बी) बुडित कर्जासह तांत्रिक आणि व्यापारी तोट्यांतील तफावती;

(सी) विनियम १७.६.१ च्या खंड (बी) मधील पहिल्या व दुस-या परंतुकामध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्राहकांच्या संख्येत किंवा रचनेत किंवा ग्राहकांना पुरविलेल्या विजेच्या परिमाणांत झालेल्या तफावती;

(डी) खेळते भांडवलाच्या गरजेत झालेल्या तफावती;

(इ) या विनियमांनुसार सूट देण्यांत आलेली नसल्यास, कृतीच्या मानकांच्या विनियमांत विहीत करण्यांत आलेली मानके साध्य करण्यांत आलेले अपयश;

(एफ) कामगारांच्या उत्पादकतेत आलेली तफावत;

(जी) आयोगाने वरील विनियम १५.६ मध्ये विहीत केलेल्या घटकांशिवाय अन्य कोणत्याही घटाकांत आलेली तफावत मात्र जर अशा घटकांचा आढावा विनियम १७.६च्या दुस-या परंतुकानुसार आयोगाने घेताला असेल तर अशा घटकांतील तफावत वगळून.

१७.७ विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला, जर विनियम १५ प्रमाणे पूर्व-अनुमान विकसित केला त्यावेळी अतिरिक्त माहिती माहित नसेल किंवा ती उपलब्ध नसेल तर तो, नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता, कामगिरीच्या वार्षिक आढाव्याचा एक भाग म्हणून, एकूण महसूल गरजेच्या आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाच्या मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानांत दुरुस्ती करण्यासाठी आयोगाकडे अर्ज करु शकेल;

परंतु असे की, विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला, या विनियमांखाली प्रत्येक नियंत्रण कालावधीच्या मुदतीत एकाहून अधिक वेळा मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानांत अशी दुरुस्ती करु देण्यांत येणार नाही.

१७.८ जर विनियम १५ प्रमाणे पूर्व-अनुमान विकसित केला त्यावेळी आयोगाला अतिरिक्त माहिती माहित नसेल किंवा ती उपलब्ध नसेल तर व जर त्यास उचित वाटले तर, आयोग स्वतःहून, किंवा

स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीने केलेल्या अर्जाच्या संदर्भात, एकूण महसूल गरजेच्या आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाच्या मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानांत,नियंत्रण कालावधीच्या उरलेल्य मुदतीकरिता, वार्षिक कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून, दुरुस्ती करेल;

परंतु असे की, आयोग प्रत्येक नियंत्रण कालावधीत फक्त एकदाव मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानांत दुरुस्ती करेल.

१७.९ आयोग त्याच्याकडे विनियम १७.७ आण्णि १७.८ खाली करण्यात आलेल्या अर्जाचा आढावा, विज दर निश्चितीकरणासाठीच्या मूळ अर्जाप्रमाणे घेईल व असा आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोगास उचित वाटेल अशा बदलांसह प्रस्तावित दुरुस्तीस मान्यता देईल किंवा लेखी कारणे नोंदवून अर्ज नामंजूर करेल.

१७.१० कामगिरीचा वार्षिक आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोग खालील बाबींकरिता आदेश देईल-

(ए) विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला, नियंत्रणाखाली नसलेल्या घटकांमुळे झालेला एकूण मान्यताप्राप्त फायदा किंवा तोटा आणि विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक विनियम १८ प्रमाणे असा फायदा किंवा तोटा ज्याद्वारे ग्राहकांना देऊ शकतील किंवा त्यांच्याकडून वसूल करु शकतील असे सूत्र;

(बी) विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला, नियंत्रणाखाली असलेल्या घटकांमुळे झालेला एकूण मान्यताप्राप्त फायदा किंवा तोटा आणि विनियम १९ प्रमाणे अशा फायदा किंवा तोट्यापैकी हिस्से करुन वाटून घ्यावयाची रक्कम;

(सी) वरील विनियम १७.९ नुसार नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या पूर्व-अनुमानांत, असल्यास काही मान्यताप्राप्त दुरुस्त्या.

## १८ नियंत्रणाखाली नसलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांना लागू करण्याचे सूत्र

१८.१ विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला, नियंत्रणाखाली नसलेल्या घटकांमुळे झालेला एकूण मान्यताप्राप्त फायदा किंवा तोट्याचे, विनियम १७.१० खालील आयोगाच्या आदेशांत विहीत करण्यांत आलेल्या कालावधीकरिता, विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाच्या वीज दरांतील समायोजनाद्वारे ग्राहकांना लागू करण्यांत येईल.

१८.२ या विनियम १८ मधील काहीही, इंधनाच्या किंमतीतील तफावतीमुळे झालेल्या फायद्यास किंवा तोट्यास लागू होणार नाही व याचा विचार विनियम ८२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यांत येईल.

## १९ नियंत्रणाखाली असलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा हिस्से करुन वाटून घेण्याबाबत

१९.१ विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला नियंत्रणाखाली असलेल्या घटकांमुळे झालेल्या एकूण मान्यताप्राप्त फायद्याचे बाबतीत पुढीलप्रमाणे कारवाई करण्यांत येईल-

(ए) विनियम १७.१० खालील आयोगाच्या आदेशांत विहीत करण्यांत आलेल्या कालावधीत, अशा फायद्याच्या रकमेपैकी एक-तृतियांश रक्कम वीज दरांत सूट देण्याकरिता वापरण्यात येईल.

(बी) परवानाधारकाच्या प्रकरणी, अशा फायद्याच्या रक्कमेपैकी एक-तृतियांश रक्कम, विनियम १९.२ च्या खंड (बी) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नियंत्रणाखाली असलेल्या बाबीमळे झालेल्या तोटा भरुन काढण्यासाठी, विशेष राखीव निधी म्हणून वेगळी ठेवण्यत येईल.

(सी) फायद्याच्या उरलेल्या रकमेचा विनियोग विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक, त्यांना योग्य वाटेल तसा करतील.

१९.२ विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारकाला नियंत्राणाखाली असलेल्या घटकांमुळे झालेल्या एकूण मान्यताप्राप्त तोट्याचे बाबतीत पुढीलप्रमाणे कारवाई करण्यांत येईल-

(ए) विनियम १७.१० खालील आयोगाच्या आदेशांत विहीत करण्यांत आलेल्या कालावधीकरिता, अशा तोट्यापैकी एक-तृतियांश रक्कम वीज दरांत अतिरिक्त आकार म्हणून आकारता येऊशकेल.

(बी) उरलेली रक्कम विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक यांना सहन करावी लागेल.

## २० वीज दराचे वार्षिक निश्चितीकरण

२०.१ बहु-वर्षीय वीज़-दर रचनेखाली, नियंत्रण कालावधीच्या मुदतीत प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता, अशा आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला, विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक यांचेकरिता, आयोग, खालील बाबींचा विचार करुन वीज दराची निश्चिती करेल-

(ए) एकूण महसूल गरजेचा आणि वीज दर व आकारांपासून मिळणा-या अपेक्षित महसूलाबाबत मान्यताप्राप्त पूर्व-अनुमान, त्यांत करण्यांत आलेल्या मान्यताप्राप्त दुरुस्त्यांसह;

(बी) कामगिरीच्या वार्षिक आढाव्यानंतर, ग्राहकांना लागू करावयाचे मान्यताप्राप्त फायदे किंवा तोटे.

# भाग- डीः वीज खरेदी आणि प्राप्त करुन घेणे

## २१ विनियम कोणाला लागू असतील

२१.१ या भागांत असलेले विनियम, वितरण परवानाधारकाने विद्युत निर्मिती कंपनीकडून किंवा परवानाधारकाकडून किंवा अन्य कोणत्याही स्त्रोताकडून राज्यांत विजेचे वितरण आणि पुरवठा करण्यासाठी वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेद्वारे विजेची खरेदी करण्यासाठी आणि वीज प्राप्त करुन घेण्यासाठी हे विनियम, लागू असतील.

## २२. वीज प्राप्त करुन घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना

२२.१ वितरण परवानाधारक खालील बाबींसाठी या भागांत असलेल्या मार्गदर्शक सूचना अनुसरेलः-

(ए) एक वर्षापेक्षा अधिक मुदतीच्या कोणत्याही करार किंवा व्यवस्थेद्वारे वीज प्राप्त करुन घेणे (दीर्घ-मुदतीची वीज प्राप्ती); आणि

(बी) एक वर्षाइतक्या किंवा त्याहून कमी मुदतीच्या कोणत्याही करार किंवा व्यवस्थेद्वारे वीज प्राप्त करुन घेणे (अल्प-मुदतीची वीज प्राप्ती).

## २३ दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीची योजना

२३.१ वितरण परवानाधारक त्याच्या क्षेत्रांतील विजेची मागणी पुरविण्यासाठी वीज प्राप्त करून घेण्याची एक पंच-वार्षिक योजना तयार करेल व ती आयोगास मंजूरीसाठी सादर करेल;

परंतु असे की, अशी दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीची योजना ही वार्षिक बदलती योजना असेल आणि पहिल्या योजनेचा कालावधी १ एप्रिल, २००६ पासून सुरु होईल;

परंतु आणखी असे की, या विनियमांच्या भाग-बी नुसार, वीज दर निश्चितीकरणासाठीच्या अर्जाबरोबर दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीची योजना, सादर करण्यांत येईल.

२३.२ वितरण परवानाधारकाच्या दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेमध्ये खालील बाबी असतीलः-

(ए) योजनेच्या कालावधीसाठी, त्याच्या पुरवठ्याच्या क्षेत्रांतील प्रत्येक वर्गवारीतील ग्राहकांच्या विजेच्या अनिर्बंध मागणीबाबत संख्यात्मक पूर्व-अनुमान;

(बी) मान्यताप्राप्त विद्युत निर्मितीच्या स्त्रोतांकडून आणि वीज खरेदीतून मिळणा-या वीज पुरवठ्याच्या परिमाणांचा अंदाज;

(सी) कृतीच्या मानकांच्या विनियमांनुसार विजेची गुणवत्ता आणि भरवशाच्या पुरवठ्यासाठी पालन करावयाची मानके;

(डी) उर्जेची बचत करण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी अंमलांत आणावयाच्या प्रस्तावित उपाय-योजना;

(इ) वरील (ए) ते (डी)वर आधारित, विद्युत निर्मितीसाठी आणि/ किंवा प्राप्तीसाठी नवीन स्त्रोतांची गरज, निर्मिती क्षमतेत करावयाची वाढ आणि वीज पुरवठ्यासाठी शोधून काढलेल्या नवीन स्त्रोतांच्या माहितीसह;

(एफ) वीज प्राप्त करुन घेण्यासाठीची योजना- परिमाण व खर्चाच्या अंदाजासह.

परंतु असे की, दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेमध्ये, कमाल मागणीच्या आणि कमाल मागणी नसलेल्या कालावधीकरिता पूर्व-अनुमान/ अंदाज हे, प्राप्त करुन घेतलेली वीज (विजेच्या दशलक्ष युनिट्समध्ये) आणि कमाल मागणी (MW/ MVA मध्ये) याप्रमाणे, वेगवेगळे दाखविण्यांत येतील;

परंतु आणखी असे की, पूर्व-अनुमान/ अंदाज हे योजनेच्या काळातील प्रत्येक तीन महिन्याच्या कालावधीकरिता तयार करण्यांत येतील.

परंतु असेही की, दीर्घ-मुदतीची वीज प्राप्तीची योजना, विविध स्त्रोतांच्या पुरवठ्याच्या खर्चाच्या माहितीवर आधारित, किमान खर्चाची योजना असेल.

स्पष्टीकरणः- या विनियमांच्या प्रयोजनार्थ, "कमाल मागणीचा कालावधी" म्हणजे चोवीस २४ तासाच्या कालावधीतील वितरण परवानाधारकाची विजेसाठी कमाल मागणी असलेला सततचा तीन (३) तासांच्या गटाचा कालावधी.

२३.३ पूर्व-अनुमान / अंदाज हे मागील कालावधीतील माहिती व भावी काळाबद्दलच्या वाजवी गृहितांवर आधारित पूर्व-अनुमान काढण्याच्या पध्दतीचा उपयोग करुन, तयार करण्यांत येतील;

परंतु असे की, पूर्व-अनुमान / अंदाज तयार करताना एकूण आर्थिक प्रगती, प्रामुख्याने विजेचा वापर करणा-या क्षेत्रांत विजेच्या वापरांतील वाढ, विद्युत उद्योगांत स्पर्धेस सुरुवात, स्व-वापरासाठीच्या वीज निर्मितीतील बदल, तोटा कमी करण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांचा होणारा परिणाम, विद्युत निर्मिती केंद्रातील प्लँट लोड फॅक्टरमध्ये सुधारणा आणि इतर संबंधित घटकांचा विचार करण्यांत येईल.

२३.४ दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेचा एक भाग म्हणून आयोगास सादर करण्यांत आलेले पूर्व-अनुमान / अंदाज हे विनियम-१५ खाली तयार केलेल्या व सादर केलेल्या वीज निर्मिती, वीज खरेदी आणि विजेची मागणीच्या पूर्व-अनुमानांशी सुसंगत असतील.

२३.५ वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रांतील विजेच्या एकूण वापरापैकी स्व-वापराच्या वीज निर्मिती प्रकल्पांकडून व नूतनशील उर्जा स्त्रोतांकडून खरेदी करावयाच्या विजेचे प्रमाण जर आयोगाने विहीत केले असेल तर, वितरण परवनाधारकाच्या दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेत त्याने अशा स्त्रोतांकडून **निदान** विहीत करण्यांत आलेल्या पातळीपर्यंत करावयाच्या विजेच्या खरेदीची योजना समाविष्ट करण्यांत आलेली असेल.

२३.६ पारेषण खुला प्रवेश विनियमांना अनुसरुन तयार करण्यांत आलेल्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेसाठीच्या पारेषण यंत्रणा आराखड्याशी, वितरण परवानाधारकाने सादर केलेली दीर्घ-मुदतीची वीज प्राप्तीची योजना सुसंगत आहे किंवा नाही हे पडताळण्यासाठी आयोग योजनेची एक प्रत राज्य पारेषण कंपनीकडे पाठवेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक, त्याची दीर्घ-मुदतीची वीज प्राप्तीची योजना तयार करताना त्याची योजना पारेषण यंत्रणा आराखड्याशी सुसंगत राहण्यासाठी राज्य पारेषण कंपनीशी संपर्क साधून, तिचा सल्ला स्वतंत्रपणे घेऊ शकेल.

२३.७ वितरण परवानाधारकास त्याची दीर्घ-मुदतीची वीज प्राप्तीची योजना विनियम २३.१ नुसार सादर करताना अतिरिक्त माहिती माहित नसल्यास किंवा ती उपलब्ध नसल्यास, तो, विनियम १७ खालील कामगिरीच्या वार्षिक आढाव्याचा एक भाग म्हणून, नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता, त्याच्या दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेत बदल करण्यासाठी आयोगाकडे अर्ज सादर करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारकास त्याच्या दीर्घ - मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेत या विनियमांनुसार प्रत्येक नियंत्रण कालावधीत एकाहून अधिक वेळा बदल करण्यास मुभा देण्यांत येणार नाही.

२३.८ वितरण परवानाधारकास त्याची दीर्घ-मुदतीची वीज प्राप्तीची योजना विनियम २३.१ नुसार सादर करताना अतिरिक्त माहिती माहित नसल्यास किंवा ती उपलब्ध नसल्यास, आयोग, त्यास तसे उचित वाटल्यास, स्वतःहून किंवा स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीने अर्ज केल्यास, कामगिरीच्या वार्षिक आढाव्याचा एक भाग म्हणून, नियंत्रण कालावधीच्या उरलेल्या मुदतीकरिता, वितरण परवानाधारकाच्या दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेत बदल करेल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेत आयोग या विनियमाखाली प्रत्येक नियंत्रण कालावधीत एकाहून अधिक वेळा बदल करु शकणार नाही.

२३.९ वितरण परवानाधारकाच्या दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेचा किंवा त्यांत करण्यात आलेल्या प्रस्तावित बदलांचा, आयोग आढावा घेईल, आणि असा आढावा पूर्ण झाल्यानंतर, आयोग-

(ए) दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजनेस किंवा त्यांतील बदलास, आयोगास उचित वाटेल अशा बदलांसह व अटींसह, आयोग मंजूरीचा आदेश काढेल; किंवा

(बी) दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीच्या योजना किंवा त्यांत बदल करण्यासाठीचा अर्ज, जर ते या भागांत असणा-या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून नसतील तर आयोग, त्यासंबंधीची कारणे लेखी नोंदवून, नामंजूर करेल आणि आयोग विहीत करेल त्या बाबींचा विचार करून सुधारित योजना सादर करण्यास आयोग वितरण परवानाधारकास निदेश देईल.

परंतु असे की, दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीची योजना नामंजूर करण्यापूर्वी आयोग वितरण परवानाधारकास त्याचे म्हणणे मांडाण्याची वाजवी संधी देईल.

## २४. वीज खरेदी करारास/ व्यवस्थेस मान्यता

२४.१ या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेनंतर वितरण परवानाधारकाने विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधरकाबरोबर किंवा अन्य स्त्रोताबरोबर दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीसाठी केलेला करार किंवा व्यवस्था, फक्त आयोगाच्या पूर्व-मान्यतेनेच अंमलांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकाने विद्युत निर्मिती कंपनी किंवा परवानाधारक किंवा कोणत्याही इतर स्त्रोताकडून स्टँड-बाय तत्त्वावर वीज प्राप्त करुन घेण्यासाठी केलेल्या करारास किंवा व्यवस्थेस विनियम २४ नुसार आयोगाची पूर्व मान्यता लागेल;

परंतु आणखी असे की, जरी अस्तित्वांत असणा-या करारांस/व्यवस्थेस आयोगाने मान्यता दिलेली असली किंवा नसली तरीदेखील दीर्घ- मुदतीच्या वीज प्राप्तीसाठी केलेल्या अस्तित्वांत असलेल्या करारांत/व्यवस्थेत केलेल्या कोणत्याही बदलास देखील, विनियम २४ खाली, आयोगाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

२४.२ वितरण परवानाधारकाने वीज खरेदी करारास/ व्यवस्थेस मान्यता देण्यासासठी केलेल्या अर्जाचा विचार आयोग, वितरण परवानाधारकाची मान्यताप्राप्त दीर्घ- मुदतीच्या वीज प्राप्तीसाठीची योजना आणि खालील घटक लक्षांत घेऊन करेलः-

(ए) मान्यताप्राप्त दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीसाठीच्या योजनेखाली वीज प्राप्त करुन घेण्याची असलेली गरज;

(बी) केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार लिलावासाठी पारदर्शक कार्यपध्दतीचे पालन;

(सी) जर वरील (बी) येथे उल्लेखलेली कार्य-पधती स्वीकारण्यांत आलेली नसेल तर, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी या विनियमांच्या भाग-ई मधील अटी व शर्तीचे पालन;

(डी) करार/ व्यवस्थेखाली प्राप्त केलेल्या विजेच्या वहनासाठी आणि पुरवठ्यासाठी आंतर-राज्य पारेषण व्यवस्थेखाली क्षमतेची असलेली उपलब्धता (किंवा अपेक्षित उपलब्धता);

(इ) स्व-वापरासाठीच्या विद्युत निर्मितीस आणि नुतनशील ऊर्जा स्त्रोतांवर आधारित विद्युत निर्मितीस प्रोत्साहन देण्याची गरज.

२४.३ जर या विनियमांच्या भाग-ई मधील अटी स्वीकारण्याचे प्रस्तावित करण्यांत आले असेल तर, नवीन विद्युत निर्मिती केंद्राकडून वीज पुवठ्याबाबतचा विद्युत निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यामधील वीज खरेदी करारास मान्यता , अर्जदाराच्या इच्छेनुसार, खालील दोन टप्प्यांत देता येईल-

(ए) खालील खंड (बी) अनुसार अर्ज करण्यापूर्वी आयोगास कधीही केलेल्या अर्जाच्या आधारे , तात्पुरत्या वीज दरास मान्यता;

(बी) मर्यादा दिनांकापासून तीन (३) महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीत केलेल्या अर्जाच्या आधारे, अंतिम वीज दरास मान्यता.

## २५. अल्प-कालीन वीज प्राप्ती

२५.१ खालील विनियम ७६.५ नुसार त्या वर्षाच्या वीज प्राप्तीच्या योजनेस आयोगाने दिलेल्या मान्यतेनुसार वितरण परवानाधारक वर्षभरांत वीज प्राप्त करुन घेईल.

२५.२ या विनियम २५ मध्ये असलेल्या अपवादांना अधीन राहून, वितरण परवानाधारकाच्या वीज प्राप्त करुन घेण्याच्या योजनेत आयोगाने दिलेल्या मान्यतेनुसार आर्थिक वर्षाच्या कोणत्याही तिमाहीत प्राप्त करून घेतलेल्या वीज प्राप्तीच्या परिमाण किंवा किंमतीत, आणि पूर्वी मान्यता देण्यात आलेल्या स्त्रोताऐवजी अन्य स्त्रोताकडून केलेल्या वीज प्राप्तीत, जसे असेल तसे, जर आयोगाने मान्यता दिलेल्या परिमाण किंवा किंमतीच्या ५% हून अधिक तफावत आली तर, अशा तिमाहीतील अशी वीज प्राप्ती फक्त आयोगाच्या पूर्व मान्यतेनेच करण्यांत येईल.

परंतु असे की, जर तफावत, विनियम ८२ नुसार परिगणना केलेल्या इंधनाच्या किंमतीत झालेल्या बदलामूळे आलेली असेल तर, या तफावतीचा समावेश, या विनियम २५.२ प्रमाणे आयोगाच्या पूर्व-मान्यतेसाठीची आवश्यकता ठरविताना त्यांत करण्यांत येणार नाही.

२५.३ मान्याताप्राप्त स्त्रोताकडून वीज प्राप्त करुन घेण्यात वर्षभरांत तुटवडा किंवा अपयश आल्यास, वितरण परवानाधारक, आयोगाची पूर्व मान्यता न घेता, वीज प्राप्तीसाठी तात्पुरता करार किंवा

व्यवस्था करेल जर अशा करारांतून किंवा व्यवस्थेतून प्राप्त करण्यांत आलेल्या विजेचा दर हा खालील बाबींना असुसरुन निश्चित करण्यांत आला असेलः-

(ए) केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार लिलावासाठी पारदर्शक कार्यपध्दती; किंवा
(बी) या विनियमांच्या **भाग-ई** मधील अटी व शर्ती .

२५.४ विनियम २५.२ मध्ये काहीही असले तरी, आयोगाने जर वीज पुरवठ्यात तुटवडा असल्याचे अधिसूचित केले असेल आणि जर विद्युत निर्मिती कंपनी आणि परवानाधारक किंवा परवानाधारकांनी आप-आपसांत, एक वर्षापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी करार केला असल्यास आणि त्यानुसार आयोगाने विजेच्या विक्री किंवा खरेदीसाठी वीज दराची किमान व कमाल मर्यादा निश्चित केली असल्यास, वितरण परवानाधारक वीज दराच्या या किमान आणि कमाल मर्यादांमध्ये, आयोगाच्या पूर्व-मान्यतेशिवाय, वीज प्राप्त करुन घेऊ शकेल.

२५.५ विनियम ७६.५ खाली आयोगाने मान्यता दिलेल्या वीज प्राप्ती योजनेपेक्षा जास्त परिमाणांची वीज, वितरण परवानाधारक प्राप्त करुन घेऊ इच्छित असेल व तसेच तो ग्राहकांना या अतिरिक्त विजेची विक्री खर्चापेक्षा अधिक वीज दराने करु इच्छित असेल तर, वितरण परवानाधारक अशी अतिरिक्त वीज प्राप्त करुन घेण्यासाठी, आयोगाच्या मान्यतेशिवाय, अल्प-कालीन करार किंवा व्यवस्था करु शकेल.

२५.६ जर वितरण परवानाधारकाने वीज पुरवठ्यासाठी नविन स्त्रोत शोधला असेल की ज्याच्याकडून वीज खरेदी केल्यास त्या वीज दरामुळे त्याच्या वीज प्राप्तीवरील मान्याताप्राप्त खर्चात कपात होणार असेल तर तो अशा पुरवठादाराबरोबर अल्प-कालीन वीज प्राप्ती करार किंवा व्यवस्था वितरण परवानाधारक, आयोगाच्या पूर्व-मान्यतेशिवाय, करु शकेल.

२५.७ जर वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेच्या स्थैर्यास धोका निर्माण होण्यासारखी आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली असेल किंवा त्यास जर स्टेट लोड डिस्पॅच सेंटरने ग्रीडमधील बिघाड टाळण्यासठी तसे करण्याचे निदेश दिले असतील तर, वितरण परवानाधारक अल्प-कालीन वीज प्राप्ती व्यवस्था किंवा करार, आयोगाच्या पूर्व मान्यतेशिवाय, करु शकेल.

२५.८ या विनियम २५ मधील अटींची पुर्तता झाली आहे किंवा नाही हे पडताळाण्यासाठी, आयोगाच्या मान्यतेची आवश्यकता नसलेला करार किंवा व्यवस्था केल्याच्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आंत, वितरण परवानाधारक आयोगास अशा कराराचा किंवा व्यवस्थेचा संपूर्ण तपशील म्हणजेच, परिमाण, वीज दराची परिगणना, कालावधी, पुरवठादारांचा तपशील, पुरवठादाराच्या निवडीची पध्दत,आणि अशा करार/ व्यवस्थेसंदर्भात आयोग मागेल ती इतर सर्व माहिती सादर करेल;

परंतु असे की, वरील विनियम २५.३ ते २५.७ मधे विहीत करण्यांत आलेल्या मानकांची पूर्तता झालेली नाही असा विश्वास बाळगण्यास जर आयोगाकडे वाजवी आधार असेल तर त्यामुळे मान्याताप्राप्त पातळीपेक्षा वीज प्राप्तीवरील खर्चात झालेली कोणतीही वाढ (अतिरिक्त उत्पन्नाच्या

निव्वळ ) किंवा वितरण परवानाधारकास आलेला कोणताही तोटा, वीज दरांतील समायोजनाद्वारे ग्राहकांकडून वसूलू करण्यास आयोग मुभा देणार नाही.

२५.९ वरील विनियम २५.३ ते २५.७ मध्ये विहीत करण्यांत आलेल्या प्रकरणांस अधीन राहून, जेथे वितरण परवानाधारक आयोगाच्या मान्यतेशिवाय, अल्प-कालीन वीज पुरवठ्यासाठी करार किंवा व्यवस्था करेल की ज्यामुळे, मान्यता देण्यांत आलेल्या पातळीपेक्षा वीज प्राप्तीसाठीच्या खर्चात वाढ झाली असल्यास या वाढीचा (अतिरिक्त उत्पन्नाच्या निव्वळ ) संबंध नियंत्रणाधीन असलेल्या ह घटकांच्या झालेल्या कामगिरीतील तफावतीशी असल्याचे मानण्यांत येईल.

## भाग-ई: विद्युत निर्मिती

### २६ विनियम कोणास लागू असतील

२६.१ **भाग-ई** मध्ये विहित करण्यांत आलेले विनियम, वितरण परवानधारकास विद्युत निर्मितीच्या पारंपरिक स्त्रोताकडून होणा-या वीज पुरवठ्याच्या वीज दराच्या निश्चितिकरणास लागू असतील.

परंतु असे की, वितरण परवानाधारकाला अ-पारंपरिक स्त्रोतातून विद्युत पुरवठ्याच्या वीज दराचे निश्चितीकरण आयोगाच्या आदेशांत नमूद करण्यांत आलेल्या अटी व शर्तीप्रमाणे करण्यांत येईल.

२६.२ विद्युत निर्मिती कंपनीने वितरण परवानाधारकास करावयाच्या वीज पुरवठ्यासाठीच्या वीज दराचे निश्चितीकरण आयोग, खालील प्रकरणी, या भागामध्ये असलेल्या अटी व शर्तीच्या मार्गदर्शनानुसार करेलः-

(ए) जेथे या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेनंतर करण्यांत आलेल्या वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेच्या संदर्भात असा वीज दर असेल; किंवा

(बी) जेथे या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेपूर्वी करण्यांत आलेल्या वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेच्या संदर्भात असा वीज दर असेल आणि आयोगाने अशा करारास/ व्यवस्थेस पूर्वी मान्यता दिलेली नसेल किंवा त्यांतील वीज दर स्वीकरलेला नसेल; किंवा

(सी) जेथे असा वीज दर हा वरील विनियम ६.२ खाली आयोगाच्या आढाव्याचा विषय असलेल्या करार किंवा व्यवस्थेच्या संदर्भात असेल; किंवा

(डी) जेथे वितरण परवानाधारक हा विद्युत निर्मितीचा उद्योग करीत असेल तेथे वितरण परवानाधारकाच्या विद्युत निर्मिती उद्योगाकडून त्याच्या किरकोळ पुरवठा उद्योगास पुरवठा करण्यांत आलेल्या विजेची हस्तांतरण किंमत निश्चित करण्यासाठी.

परंतु असे की, जेथे उचित वाटेल अशा प्रकरणी, त्या प्रकरणांतील परिस्थितीचा विचार करून, आयोग या विनियमांत असलेल्या निकषांपेक्षा वेगळे निकष स्वीकारेल किंवा विशिष्ट प्रकरणांसाठी पर्यायी निकष विहीत करेल;

परंतु असे की, वेगळे निकष स्वीकारल्यास त्याबाबतची कारणे लेखी नोंदविण्यांत येतील;

परंतु आणखी असे की, अस्तित्वात असलेल्या विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, आयोग अशा विद्युत निर्मिती केंद्राची मागील कालावधीतील कामगिरी लक्षांत घेऊन आणि कामगिरीत सुधारणा करण्यासाठी, लागल्यास, वाजवी संधी देऊन, वीज दराचे निश्चितीकरण करेल.

२६.३ या भा-ई मधील विनियमांत काहीही असले तरी, जर केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे पारदर्शक पध्दतीच्या लिलावाने वीज दर निश्चित करण्यांत आला असेल तर आयोग असा वीज दर स्वीकारेल.

## २७. वीज दराचे निश्चितीकरण

२७.१ या विनियमांनुसर विद्युत निर्मिती केंद्रासाठी वीज दर हा प्रत्येक टप्प्याकरिता, युनिटकरिता किंवा पूर्ण विद्युत निर्मिती केंद्रासाठी निश्चित करण्यांत येईल. या भागांत विद्युत निर्मिति केंद्रासाठी विहीत करण्यात आलेल्या अटी व शर्ती, या टप्प्याला किंवा युनिटला देखील, जसे असेल तसे, त्याच रितीने, लागू असतील.

२७.२ जर वीज दर हा टप्प्यासाठी किंवा युनिटसाठी ठरविण्यात येत असेल तर, विद्युत निर्मित कंपनी समाईक सुविधांमधील भांडवली खर्चाचे वाटप करताना आणि संयुक्त आणि समाईक खर्चाचे सर्व टप्प्यांध्ये किंवा युनिटसमध्ये, जसे असेल तसे, वाटप करताना, वाजवी आधार स्वीकारेल.

परंतु असे की, विद्युत निर्मिती कंपनी अशा खर्चाचे वाटप कोणत्या आधारे केले ते दाखवणारे एक वाटप विवरणपत्र ठेवेल व ते आयोगास या विनियमांच्या भाग- बी नुसार वीज दर निश्चितीकरणाचा अर्ज सादर करताना त्यासह पाठवेल.

२७.३ बहु-उद्देशीय जल-विद्युत प्रकल्पांच्या संदर्भात, ज्यांत पाट-बंधारे, पूर-नियंत्रण आणि विद्युत भागही असतील, अशा प्रकरणी भांडवली खर्चाचा जो भाग विद्युत भागाशी संबंधित असेल फक्त त्याचाच विचार वीज दराच्या निश्चितीकरणासाठी करण्यांत येईल.

## २८. वीज दराचे भाग

२८.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील विजेच्या विक्रीसाठीचा दर हा दोन भागांत म्हणजेच वार्षिक स्थिर आकारांची व उर्जेच्या आकारांची वसूली, असा असेल.

२८.२ जल विद्युत निर्मिती केंद्रातील विजेच्या विक्रीसाठीचा दर हा दोन भागांत म्हणजेच वार्षिक क्षमता आकारांची व उर्जेच्या आकारांची वसूली, असा असेल.

परंतु असे की, जल विद्युत निर्मिती केंद्राच्या वार्षिक क्षमता आकारांची परिगणना खालील सुत्रानुसार करण्यांत येईलः

वार्षिक क्षमता आकार = (वार्षिक स्थिर आकार- उर्जा आकार)

परंतु असे की, या विनियमांखाली उर्जा आकार हा वार्षिक स्थिर आकारांपेक्षा जास्त नसेल.

२८.३ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या किंवा जल विद्युत निर्मिती केंद्राच्या वार्षिक स्थिर आकारांत खालील बाबींच्या वसूलीचा समावेश असेलः-

(ए) भाग भांडवलावरील परतावा;

(बी) आय-कर;

(सी) कर्ज भांडवलावरील व्याज;

(डी) घसा-या पोटीचा अग्रिम आणि आणि अमूर्त मालमत्ता निवारण निधीसह घसारा;

(इ) कामकाज व देखभाल खर्च; आणि

(एफ) खेळते भांडवलावरील व्याज

२८.४ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राच्या संदर्भात उर्जा आकारामध्ये इंधनावरील खर्चाचा समावेश असेल व त्याची परिगणना विनियम ३५.१ मध्ये विहीत केल्याप्रमाणे करण्यांत येईल.

२८.५ जल विद्युत निर्मिती केंद्राच्या उर्जा आकरांची परिगणना विनियम ३५.२ मध्ये विहित केल्याप्रमाणे करण्यांत येईल.

## २९ बहु-वर्षीय वीज दर

२९.१ आयोग, विनियम १६ खाली, विद्युत निर्मिती केंद्र, विद्युत निर्मिती कंपनी आणि/ किंवा परवानाधारकाच्या संदर्भात त्याच्या विद्युत निर्मिती उद्योगाकरिता कामकाजाच्या निकषांची एक मार्गदर्शिका विहीत करेल.

परंतु असे की, कोणत्याही वीज खरेदी करार किंवा व्यवस्थेचा विचार करुनच आयोग अशी मार्गदर्शिका विहीत करेल;

परंतु आणखी असे की, जेथे आयोगाने विनियम १६ खाली मार्गदर्शिका विहीत केली असेल तेथे अशा मार्गदर्शिकेमध्ये असलेल्या घटकांना अशा मार्गदर्शिकेमध्ये विहीत केलेल्या कालावधीकरिता, या भागांत नमूद करण्यांत आलेले निकष लागू राहणार नाहीत.

## ३०. भांडवली खर्च

३०.१ आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून, प्रक्ल्प पूर्ण करण्यासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या आधारे प्रक्ल्पाची मूळ किंमत ठरविण्यात येईल. विद्युत निर्मिती केंद्र सुरू होण्याच्या तारखेपर्यंत मंजूरी देण्यांत आलेल्या प्रत्यक्ष भांडवली खर्चाच्या आधारे प्रकल्पाची मूळ किंमत ठरविण्यांत येईल, ज्यांत मर्यादा दिनांकापर्यंत मूळ खर्चाच्या टक्केवारीत खाली नमूद केलेल्या मर्यादेत सुट्या-भागांच्या केलेल्या भांडवलीकरणावरील खर्चाचाही समावेश असेलः-

| | | |
|---|---|---|
| (१) | कोळशावर आधारित/ लिग्नाइट प्रज्वलीत विद्युत निर्मिती केंद्रे | २.५% |
| (२) | गॅस टर्बाइन/ कम्बाइन्ड सायकलवर आधारित विद्युत निर्मिती केंद्रे | ४.०% |
| (३) | जल विद्युत निर्मिती केंद्रे | १.५% |

परंतु असे की, जेथे विद्युत निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक यांच्यामधील वीज खरेदी करारांत जर प्रत्यक्ष खर्चावर मर्यादा घालण्यांत आली असेल तर, या विनियमाच्या प्रयोजनार्थ, प्रकल्पाचा मूळ खर्च अशा मर्यादेपेक्षा जास्त नसेल;

परंतु आणखी असे की, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून, सध्या अस्तित्वांत असलेल्या विद्युत निर्मिती कंपनीच्या प्रकरणी विद्युत निर्मिती कंपनीच्या लेखा पुस्तकांत नोंदण्यांत आलेला प्रकल्पाचा मूळ खर्च, या विनियमाच्या प्रयोजनार्थ, प्रकल्पाची मूळ किंमत म्हणून समजण्यांत येईल.

३०.२ अतिरिक्त भांडवलीकरणः खालील बाबींवरील भांडवली खर्च, जो कामाच्या मूळ व्याप्तीत होता परंतु प्रत्यक्षांत जो प्रकल्पाची सुरुवात झाल्यानंतर मर्यादा दिनंकापर्यंत झाला असेल त्याचा प्रकल्पाच्या मूळ किंमतीत समावेश करण्यास, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून, आयोग मुभा देईलः-

(१) विलंबित दायित्वे;
(२) प्रत्यक्ष करावयाची स्थगित ठेवलेली कामे;
(३) विनियम ३०.१ मध्ये घालण्यांत आलेल्या मर्यादांना अधीन राहून कामाच्या मूळ व्याप्तीत असलेल्या भांडवली खर्चाच्या सुट्या भागांची खरेदी;
(४) लवादाचे निकाल, न्यायालयाचे आदेश किंवा न्यायालयाच्या डिक्रीच्या अंमलबजावणी बाबतची दायित्वे; आणि
(५) कायद्यांतील बदलांमुळे.

परंतु असे की, कामाची मूळ व्याप्ती खर्चाच्या अंदाजासह वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत सादर करण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, स्थगित दायित्वे आणि प्रत्यक्ष करावयाच्या स्थगित ठेवलेल्या कामांची यादी वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत, विद्युत निर्मिती केंद्र सुरु झाल्याच्या तारखेनंतर सादर करण्यांत येईल.

३०.३ मर्यादा दिनांकानंतर खालील भांडवली स्वरुपाचा केलेला प्रत्यक्ष खर्च प्रकल्पाच्या मूळ खर्चांत समाविष्ट करण्यास आयोग, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून, मुभा देईलः-

(१) कामाच्या मूळ व्याप्तीत असलेली स्थगित कामांच्या/सेवेच्या संबंधांतील दायित्वे;
(२) लवादाचे निकाल, न्यायालयाचे आदेश किंवा न्यायालयाच्या डिक्रीच्या अंमलबजावणी बाबतची दायित्वे;
(३) कायद्यांतील बदलांमुळे;
(४) विद्युत निर्मिती केंद्राच्या कार्यक्षम आणि यशस्वी कामकाजासाठी आवश्यक झालेली कोणतीही अतिरिक्त कामे/सेवा; परंतु ज्यांचा प्रकल्पाच्या मूळ खर्चांत समावेश नव्हता; आणि

(५) मूळ कामाच्या व्याप्तीतील राखमिश्रित तळे आणि राख हाताळण्याच्या यंत्रणे बाबतची स्थगित ठेवलेली कामे.

३०.४ विद्युत निर्मितीशी संबंधित मालमत्ता नसलेल्या इतर कोणत्याही वस्तू/ मालमत्तेवरील खर्च ज्यांत पुढील वस्तू, परंतु केवळ तेवढ्याच नव्हे, सर्वसामान्य हत्यारे व सामान, वैयक्तिक संगणक, फर्निचर, वातानूकुलित यंत्रे, व्होल्टेज स्टॅबिलाइझर्स, रेफ्रिजरेटर्स, कूलर्स, टि.व्ही., धुण्याचे मशिन, हिट-कन्व्हेक्टर्स इ., ज्या मर्यादा दिनांकानंतर खरेदी करण्यांत आल्या असतील, त्यांचे देखील भांडवलीकरण, आयोगाच्या पूर्व मान्यतेने, होऊ शकेल;

परंतु असे की, जर अशा मालमत्तेवरील कोणत्याही आर्थिक वर्षातील एकूण खर्च रुपये दहा (१०) कोटींहून अधिक नसेल तर त्यास, या विनियम ३०.४ खाली, आयोगाच्या मान्यता घेण्याची गरज राहणार नाही.

३०.५ अतिरिक्त भांडवलीकरणामुळे वीज दराच्या वाढीवर होणा-या परिणामाबाबत, मर्यादा दिनांकानंतरच्या वीज दरांतील वाढीसह, वीज दराच्या कालावधीत आयोग दोनदा विचार करु शकेल.

३०.६ जुन्या स्थावर मत्तेच्या बदली दुसरी घेण्यावर, नूतनीकरणावर आणि आधुनुकीकरणावर किंवा तिचा उपयोगिता काल वाढविण्यासाठीच्या कोणत्याही खर्चाबबत विचार, अशा बदली केलेल्या मत्तेचे एकूण मूल्य मूळ भांडवली खर्चातून निर्लेखीत केल्यावर, करण्यांत येईल.

स्पष्टीकरणः- या विनियमांच्या प्रयोजनार्थ, नूतनीकरण आणि आधुनुकीकरण या शब्दांना अर्थ, आय-कर अधिनियम, १९६१ च्या कलम ८० आयए नुसार असेल.

३०.७ स्थावर मालमत्तेचे लेखे, या संबंधातील भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या लेखा मानकांची विवरणपत्रे (एएस-१०) यांतील तरतूदी, त्या जेथपर्यंत या विनियमांशी विसंगत नसतील तेथे पर्यंत, प्रकल्पाचा मूळ खर्च काढण्यासाठी, लागू राहतील.

३०.८ परकीय चलन विनिमय दरातील बदलांच्या परिणामांचे लेखे या संबंधातील भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या लेखा मानकांची विवरणपत्रे (एएस-११) यांना अनुसरुन, प्रकल्पासाठी घेतलेल्या परकीय चलनांतील कर्जावर कोणत्याही परकीय चलनाच्या विनिमय दरांतील बदलाचे परिणाम हाताळण्यांत येतील.

परंतु असे की, या विनियमांच्या विनियम ३१ व विनियम ३२ प्रमाणे निश्चित करण्यांत आलेल्या प्रत्यक्ष किंवा प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलाचा समावेश वरील बाबीमध्ये करण्याचा विचार करण्यांत येईल.

३०.९ या विनियमांच्या प्रयोजनार्थ, मान्यताप्राप्त भांडवली खर्च अशा प्रकल्पाची मूळ किंमत म्हणून समजण्यांत येईल.

३०.१० या विनियमांच्या प्रयोजनार्थ, भांडवली खर्चाची रक्कम वर्षभरांत समानपणे खर्च झालेली आहे, असे मानण्यांत येईल.

## ३१.  कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तर

३१.१ अस्तित्वांत असलेली विद्युत निर्मिती केंद्रे

३१.१.१या विनियमांच्या प्रयोजनार्थ, कर्ज भांडवल आणि भाग भांडवल यांची परिगणना खालीलप्रमाणे करण्यांत येईलः-

(ए) ज्या आर्थिक वर्षाकरिता वीज दर निश्चितीकरणाच्या प्रस्तावावर विचार करण्यांत येत असेल त्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला विद्युत निर्मिती कंपनीच्या लेखा पुस्तकांत दिसणारी, विद्युत निर्मिती कंपनीच्या खरेदीच्या किंवा बांधकामासाठी घेतलेल्या सर्व दीर्घ-मुदतीच्या कर्जाची उरलेली बाकी इतके कर्ज भांडवल असेल .

(बी) भाग भांडवलाची रक्कम ही-

(१) आयोगाने खालील स्पष्टीकरणानुसार निश्चित केलेली तारीख १ एप्रिल, २००४ रोजी असलेल्या भाग भांडवलाची रक्कम; अधिक.

(२) ३१ मार्च, २००५ रोजी संपणा-या आर्थिक वर्षाच्या शेवटी मान्यताप्राप्त भांडवली खर्चापैकी भाग भांडवलाचा भाग असेल.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १३१ नुसार हस्तांतरण योजनेखाली निर्माण झालेल्या विद्युत निर्मिती कंपनीच्या प्रकरणी, १ एप्रिल, २००४ या तारखेऐवजी त्या हस्तांतरण योजनेची तारीख ही, वरील खंड (बी) नुसार भाग भांडवल निश्चित करणायासाठी प्रभावी तारीख मानण्यांत येईल.

स्पष्टीकरणः- या विनियमांच्या प्रयोजनार्थ, भरणा करण्यांत आलेले भाग भांडवल, अधिमान भाग भांडवल (प्रेफरन्स शेअर कॅपिटल), पूर्ण/ सक्तीची परिवर्तनीय ऋणपत्रे (कन्व्हर्टिबल डिबेंचर्स) (किंवा समान स्वरुपाची इतर वित्तीय पत्रे (इन्स्ट्रुमेंट्स)), परकीय चलनातील परिवर्तनीय बंधपत्रे (कन्व्हर्टिबल बाँड्स), लाभांश वाटपासाठी किंवा अधिलाभांश भाग(बोनस शेअर)च्या रुपांत भांडवलीकरणासाठी उपलब्ध असलेले भाग अधिमूल्य लेखा (शेअर प्रिमिअम अकाउंट) आणि इतर राखीव निधी, जे विद्युत निर्मिती उद्योगांत गुंतविले आहेत, यांच्या एकूण बेरजेइतके भाग भांडवल राहील. कोणतीही सबसिडीची रक्कम, पुनर्मूल्यन राखीव निधी, विकास राखीव निधी, आकस्मिकता राखीव निधी आणि ग्राहकांकडून आलेली वर्गणीची रक्कम, यांचा समावेश भाग भांडवलांत करण्यांत येणार नाही. लेखा पुस्तकांत विद्युत निर्मिती उद्योगाच्या दाखविण्यांत आलेल्या स्थगित कर दायित्वे किंवा स्थगित कर मालमत्तेच्या रकमा या भाग भांडवलांत मिळविण्यांत किंवा कमी करण्यांत, जसे असेल तसे, येतील.

३१.२ नवीन विद्युत निर्मिती केंद्रे

३१.२.१या विनियंमांच्या अधिसूचनेच्या तारखेला किंवा तारखेनंतर सुरु झालेल्या कोणत्याही विद्युत निर्मिती केंद्राने त्याची भांडवल उभारणी प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तरांत म्हणजे ७०:३० प्रमाणांत केलेली असेल, असे मानण्यांत येईल.

३१.२.२ जर विद्युत निर्मिति कंपनीने, या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेपूर्वी नवीन विद्युत केंद्राची, ज्याच्या भांडवलातील कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तर ७०:३० पेक्षा कमी असेल, आर्थिक समाप्ति मिळविली असेल तर ही कंपनी आयोगाकडे तिला वरील ३१.२.१ मधून सूट मिळण्यासाठी कारणमिमांसेसह अर्ज करु शकेल;

परंतु असे की, वरील विनियम ३१.२.१ लागू केल्यास त्यामुळे केंद्र सुरु करण्याच्या वेळा-पत्रकावर, ग्राहकांना पुरवावयाच्या विजेच्या खर्चावर आणि/ किंवा परिमाणावर विपरित परिणम होण्याची शक्यता आहे याबाबत जर आयोगाची खात्री पटली तर, आयोग अशा विद्युत निर्मिती केंद्रास प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तर लावण्यापासून सूट देऊ शकेल.

३१.३ <u>नूतनीकरण, आधुनुकीकरण व मत्ता बदली करणे</u>

३१.३.१ नूतनीकरण, आधुनुकीकरण व मत्ता बदली करण्यावर किंवा तिचा उपयोगिता काल वाढविण्यासाठी १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर झालेला कोणताही खर्च हा ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे, असे मानण्यांत येईल.

३१.४ <u>इतर स्थिर मत्ता</u>

३१.४.१इतर स्थिर मत्ता (जी विद्युत निर्मिती करणरी मत्ता नसेल) खरेदीवर झालेला कोणताही खर्च हा १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर झालेला असेल तर तो ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल:भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे, असे मानण्यांत येईल.

३१.५ जर अर्जदाराने तो, बाजारपेठेतील अडचणी, कॉर्पोरेट/ समूहास कर्ज देण्यासंबंधीच्या कर्जदाराच्या निकषांमुळे किंवा तत्सम कारणांमुळे, विहीत करण्यांत आलेल्या मर्यादेइतके कर्ज भांडवल उभे करु शकत नसल्याचे वाजवीरित्या सिध्द करु शकत असेल तर, आयोग या विनियम ३१ मधे विहीत करण्यांत आलेल्या कर्ज भांडवल:भाग भांडवल गुणोत्तराचा निकष त्यास लावण्यापासून सूट देऊ शकेल.

परंतु असे की, या विनियम ३१.५ खाली कर्ज भांडवल:भाग भांडवल गुणोत्तराचा निकष लावण्यापासून सूट देण्यापूर्वी आयोग कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देईल.

## ३२ कर्ज परतफेडीचे वेळापत्रक

३२.१ विनियम ३१.१ नुसार परिगणना केलेल्या अस्तित्वांत असलेल्या विद्युत निर्मिती केंद्रांच्या कर्ज भांडवलाच्या परतफेडीचे वेळापत्रक हे कर्जाच्या करारानुसार राहील.

३२.२ वरील विनियम ३१.२, विनियम ३१.३ आणि विनियम ३१.४ मधील प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तरानुसार काढलेल्या कर्ज भांडवलाची परतफेड ही प्रमाणकानुसारी परतफेडीच्या वेळापत्रकानुसार दर वर्षी करावयाची असल्याचे मानण्यांत येईल.

परंतु असे की, प्रमाणकानुसारी परतफेडीची वर्षांतील रक्कम ही ते कर्ज ज्या स्थिर मत्तेच्या संदर्भांत असेल, त्यावरील घसा-याच्या रकमेइतकी असेल.

परंतु आणखी असे की, प्रमाणकानुसारी कर्जाची शिल्लक रक्कम ही जर, वरीलप्रमाणे परिगणना करुन काढलेल्या, प्रमाणकानुसारी कर्जाच्या परतफेडीच्या रकमेपेक्षा कमी असेल तर, परतफेडीची रक्कम ही प्रमाणकानुसारी कर्जाच्या शिलक रकमेइतकी असल्याचे मानण्यांत येईल आणि या कर्ज खात्यावर परतफेडीची जादा रक्कम दाखविण्यास परवानगी दिली जाणार नाही.

परंतु असे की, सर्व प्रमाणकानुसारी परतफेडी या प्रत्येक आर्थिक वर्षात ३० सप्टेंबर रोजी करण्यांत येत असल्याचे मानण्यांत येईल.

३२.३ जर विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, प्रत्यक्ष कर्ज परतफेड केलेली रक्कम ही त्या वर्षात विनियम ३४.४.१ खाली अनुज्ञेय घसा-याच्या रकमेपेक्षा जास्त झाली असेल तर, अशा विद्युत निर्मिती केंद्राकरिता, सदर आर्थिक वर्षाकरिता, प्रत्यक्ष परतफेडीची रक्कम व अनुज्ञेय घसा-याच्या रकमेतील फरकाइतक्या रकमेचा अग्रिम, त्या विद्युत निर्मित कंपनीला घसा-यापोटी अनुज्ञेय येईल.

परंतु असेही की, घसा-यापोटीच्या अग्रिमाची रक्कम ही सदर कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेतून विनियम ३४.४.१ खालील अनुज्ञेय घसारा वजा केल्यावर उरलेल्या रकमेच्या १/१० इतकी मर्यादीत राहील.

परंतु असेही की, विनियम ३२.१ आणि ३२.२ नुसार परिगणना करुन काढलेली कर्जाच्या परफेडीची रक्कम ही, विद्युत निर्मिती कंपनीस मिळालेल्या घसा-यापोटीच्या अग्रिमाच्या रकमेने, वाढविण्यात आली असल्याचे मानण्यांत येईल.

परंतु असेही की, कर्जाच्या संपूर्ण रकमेची परतफेड झाल्यानंतर, स्थिर मत्तेची मूळ किंमत ही संचित घसा-याची एकूण रक्कम आणि विद्युत निर्मिती कंपनीला घसा-यापोटी मिळालेल्या अग्रिमाची रक्कम यांच्या बेरजेने, कमी करण्यांत येईल आणि त्या मत्तेचे उर्वरित घसारायोग्य मूल्य त्या मत्तेच्या राहिलेल्या उपयोगिता कालावधीत वापरण्यांत येईल.

## ३३ कामकाजाचे निकष

३३.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे

३३.१.१ उपलब्धता

(ए) वार्षिक स्थिर आकारांच्या पूर्ण वसूलीकरिता उप्लब्धता लक्ष्य ८० टक्के असेल

(बी) विनियम ३७ नुसार प्रोत्साहन-अधिदानाकरिता प्लँट लोड फॅक्टर लक्ष्य ८० टक्के असेल

३३.१.२सहाय्यकारी उर्जा वापर

(ए) कोळशावर आधारित विद्युत निर्मिती केंद्रे

| | कुलिंग टॉवरसह | कुलिंग टॉवरशिवाय |
|---|---|---|
| (१) २०० MW मालिका | ९.०% | ८.५% |

| (२) ५०० MW मालिका | | |
|---|---|---|
| वाफेवर चालणा-या बॉइलरला पाणी देणारा पंप | ७.५% | ७.०% |
| विजेवर चालणा-या बॉइलरला पाणी देणारा पंप | ९.०% | ८.५% |

(बी) गॅस टर्बाइन/ कम्बाइन्ड सायकलवरील विद्युत निर्मिती केंद्रे

(१) कम्बाइन्ड सायकल : ३.०%

(२) ओपन सायकल : १.०%

(सी) लिग्नाइटने प्रज्वलित औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे

सहाय्यकारी ऊर्जा वापराचे निकष हे ०.५ टक्के बिंदूनी वरील विनियम ३३.१.२ च्या खंड (ए) मधील कोळशावर आधारित विद्युत निर्मिती केंद्राच्या सहाय्यकारी ऊर्जा वापराच्या निकषांपेक्षा अधिक असतील.

टिपणीः

स्थिरता कालावधीत, प्रमाणकानुसारी सहाय्यकारी वापराचे निकष हे वरील (ए), (बी) आणि (सी) निकषांपेक्षा ०.५ टक्के बिंदूंनी अधिक असतील.

३३.१.३ केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण

(ए) कोळशावर आधारित विद्युत निर्मिती केंद्राकरिता

केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण

| | २०० /२१० /२५० MW सेट्स | ५०० MW आणि वरील सेट्स |
|---|---|---|
| स्थिरता कालावधीत | २६०० kCal/kWh | २५५० kCal/kWh |
| त्यानंतरचा कालावधी | २५०० kCal/kWh | २४५० kCal/kWh |

टिपणी-१:

५०० MW आणि वरील युनिट्स जेथे बॉइलरला पाणी देणारे पंप जर विजेवर चालणारे असतील, तेथे केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण वर दाखविलेल्या प्रमाणापेक्षा ४० kCal/kWh ने खाली राहील.

टिपणी-२:

ज्या विद्युत निर्मिती केंद्रांमध्ये २०० /२१० /२५० MW सेट्स व ५०० MW आणि वरील सेट्स एकत्रित असतील, तेथे प्रमाणकानुसारी केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण हे केंद्रातील व्हेटेड सरासरीने येणारे उष्णतेचे प्रमाण असेल.

(बी) लिग्नाइटने प्रज्वलित विद्युत निर्मिती केंद्रांकरिता, वर खंड (ए) मध्ये कोळशावर आधारित विद्युत निर्मिती केंद्रासाठी विहीत केलेले केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण खालील सुत्रानुसार बरोबर करण्यांत येईल-

(१) लिग्नाइट ५०% जलांशासह : गुणक १.१०
(२) लिग्नाइट ४०% जलांशासह : गुणक १.०७
(३) लिग्नाइट ३०% जलांशासह : गुणक १.०४
(४) जलांशाच्या इतर मूल्यांसाठी गुणक, जलांश ३०-४० आणि ४०-५० या दरम्यान असल्यास त्यासाठी गुणक, वरील उप-खंड (१) ते (३) मधील प्रत्येक टप्प्यासाठी (रेंज़) दिलेल्या गुणकाच्या निर्धारित मूल्यानुसार, यथाप्रमाण राहील.

(सी) गॅस टर्बाइनवर/ कम्बाइन्ड सायकलवर आधारित विद्युत निर्मिति केंद्राकरिता केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण

| | प्रगत वर्गातील मशिन्स | E/EA/EC/E2 वर्गातील मशिन्स |
|---|---|---|
| ओपन सायकल | २६८५ kCal/kWh | २८३० kCal/kWh |
| कम्बाइन्ड सायकल | १८५० kCal/kWh | १९५० kCal/kWh |

(डी) लहान गॅस टर्बाइनवर आधारित विद्युत निर्मिति केंद्राकरिता केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण

| | प्रगत वर्गातील मशिन्स | E/EA/EC/E2 वर्गातील मशिन्स |
|---|---|---|
| ओपन सायकल | ३१२५ kCal/ kWh | १.०२ x ३१२५ kCal/kWh |
| कम्बाइन्ड सायकल | २०३० kCal/ kWh | १.०२ x २०३० kCal/kWh |

३३.१.४ दुय्यम इंधन तेल वापर

(ए) कोळशावर आधारित विद्युत निर्मिती केंद्र

| स्थिरता कालावधीत | त्यानंतरचा कालावधी |
|---|---|
| ४.५ ml/kWh | २.० ml/kWh |

(बी) लिग्नाइटने प्रज्वलित विद्युत निर्मिती केंद्र

| स्थिरता कालावधीत | त्यानंतरचा कालावधी |
|---|---|
| ५.० ml/kWh | २.५ ml/kWh |

३३.१.५ स्थिरता कालावधी

स्थिरता कालावधी हा सुरुवात ज्या तारखे स झाली त्या तारखेपासून खालीलप्रमाणे काढण्यांत येईल-

(ए) कोळसा आणि लिग्नाइटवर आधारित
विद्युत निर्मिती केंद्रे - १८० दिवस

(बी) गॅस टर्बाइनवर/ कम्बाइन्ड सायकलवर आधारित
विद्युत निर्मिती केंद्रे - ९० दिवस

३३.१.६ प्रवासातील घट

(ए) कोळशावर आधारित विद्युत निर्मिती केंद्रांकरिता, कोळसा पुरवठा कंपनीने महिनाभरांत पाठविलेल्या कोळशाच्या परिमाणाच्या टक्केवारीत प्रवासातील घट खालीलप्रमाणे असेल-

(१) कोळसा मिळाणा-या ठिकाणी असलेली (पिट हेड)-विद्युत निर्मिती केंद्रे - ०.३%कोळसा मिळाणा-या

(२)कोळसा मिळण्याच्या ठिकाणापासून दूर असलेली (नॉन-पिट हेड) विद्युत निर्मिती केंद्रे - ०.८%

३३.२ <u>जल विद्युत निर्मिती केंद्रे</u>

३३.२.१ वार्षिक स्थिर आकारांच्या वसूलीसाठी प्रमाणकानुसारी क्षमता निर्देशांक

(ए) विद्युत निर्मिती केंद्र सुरु झाल्याच्या पहिल्या वर्षी

(१) पुर्णतः नदीच्या पाण्यावर चालणारी विद्युत निर्मिती केंद्रे - ८५%

(२) साठवणुकीच्या सोयीसह आणि नदीच्या पाण्यावर चालणारी जलाशयासह असलेली विद्युत निर्मिती केंद्रे - ८०%

(बी) विद्युत निर्मिती केंद्र सुरु झाल्याच्या पहिल्या वर्षानंतर

(१) पुर्णतः नदीच्या पाण्यावर चालणारी विद्युत निर्मिती केंद्रे - ९०%

(२) साठवणुकीच्या सोयीसह आणि नदीच्या पाण्यावर चालणारी जलाशयासह असलेली विद्युत निर्मिती केंद्रे - ८५%

टिपणीः

जर विद्युत निर्मिती कंपनीचा क्षमता निर्देशांक विहीत प्रमाणकानुसारी पातळीच्या खाली गेला तर वार्षिक स्थिर आकारांची वसूली यथाप्रमाणांत होईल. क्षमता निर्देशांक जर शून्य झाला तर विद्युत निर्मिती कंपनीला कोणतेही स्थिर आकार देय राहणार नाही.

३३.२.२ सहाय्यकारी ऊर्जा वापर

(ए) जमिनीवरील जल विद्युत निर्मिती केंद्रे जनरेटर शाफ्टवर बसविलेल्या चक्रानुक्रमाने फिरणाया एक्साइटर्ससह - ऊर्जा निर्मितीच्या ०.२%

(बी) जमिनीवरील जल विद्युत निर्मिती केंद्रे स्थिर एक्साइटेशन यंत्रणेसह- ऊर्जा निर्मितीच्या ०.५%

(सी) भूमिगत जल विद्युत निर्मिती केंद्रे जनरेटर शाफ्टवर बसविलेल्या चक्रानुक्रमाने फिरणा-या एक्साइटर्ससह - ऊर्जा निर्मितीच्या ०.४%

(डी) भूमिगत जल विद्युत निर्मिती केंद्रे स्थिर एक्साइटेशन यंत्रणेसह
- ऊर्जा निर्मितीच्या ०.७%

३३.३ ट्रान्स्फॉर्मेशन घट (जल विद्युत निर्मिती केंद्रे)
विद्युत निर्मिती दाबापासून पारेषण दाबाकडे-ऊर्जा निर्मितीच्या ०.५%

## ३४ वार्षिक स्थिर आकारांची परिगणना

३४.१ भाग भांडवलावरील परतावा

विनियम ३१ नुसार निश्चित करण्यांत आलेल्या भाग भांडवलावर दर वर्षी १४ टक्के दराने भारतीय रुपयांत भाग भांडवलावरील परताव्याची परिगणना करण्यांत येईल.

३४.२ आय-कर

३४.२.१ विद्युत निर्मिती कंपनीच्या विद्युत निर्मिती उद्योगाच्या उत्पन्नावरील आय-कराचा समावेश वार्षिक स्थिर आकारांत करण्यास अनुमती देण्यांत येईल;

परंतु असे की, आय-कर अधिनियम, १९६१ खालील निर्धारणामुळे आयकर दायित्वांत, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणित केल्याप्रमाणे, कांही बदल झाल्यास, त्यानुसार दर वर्षी वार्षिक स्थिर आकारांत समायोजन करण्यास अनुमती देण्यांत येईल.

परंतु आण्खी पुढे असे की, मान्यताप्राप्त पूर्वानुमानापेक्षा विद्युत निर्मिती कंपनीच्या विद्युत निर्मिती उद्योगाच्या उत्पन्नांत बदल झाल्यामूळे जर त्याच्या आय-कर दायित्वात बदल झाला तर अशा बदलांचा संबंध ज्या घटकांमुळे उत्पन्नांत बदल झाला त्याच नियंत्रणाधीन असलेल्या किंवा नसलेल्या घटकांशी लावण्यांत येईल व त्याप्रमाणे हाताळण्यांत येईल;

परंतु आणखी असे की, त्या आर्थिक वर्षातील विद्युत निर्मिती केंद्र-वार आगाऊ अंदाजित केलेला कर-पूर्व नफा हा आधारभूत मानून त्यानुसार काढलेल्या कॉर्पोरेट कर-दायित्वाची, विद्युत निर्मिती कंपनी सर्व विद्युत निर्मिती केंद्रांमध्ये विभागणी करेल.

३४.२.२ कर-सवलतीपासून मिळणारे लाभ, सामावून न घेतले गेलेले तोटे किंवा सामावून न घेतला गेलेला घसारा यांच्यासाठी जमा रकमा, विद्युत निर्मिती कंपनीच्या विद्युत निर्मिती केंद्राचे आयकर-दायित्व काढताना विचारांत घेण्यांत येईल;

परंतु असे की, जर अशा लाभांचा फायदा कोणत्या विद्युत निर्मिती केंद्राचा आहे हे निश्चित करता आले नाही तर अशा लाभांचा फायदा विद्युत निर्मिती कंपनीच्या सर्व विद्युत निर्मिती केंद्रांमध्ये, त्यांच्या केंद्र- वार कर-पूर्व नफ्याच्या प्रमाणांत विभागण्यांत येईल.

३४.३ कर्ज भांडवलावरील व्याज

३४.३.१अस्तित्वांत असलेल्या विद्युत निर्मिती केंद्राच्या मान्यताप्राप्त कर्ज भांडवलावरील वरीळ विनियम ३१.१ नुसार काढलेल्या व्याजास, जे मंजूर व्याज दर आणि अशा कर्जाच्या परत-फेडीच्या मंजूर वेळापत्रकाप्रमाणे असेल, अनुमती देण्यांत येईल.

३४.३.२प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलावरील व्याजास, ज्याची परिगणना विननियम ३२ नुसार मान्यताप्राप्त व्याज दर व प्रमाणकानुसारी परतफेडीचे वेळापत्रकानुसार विनियम ३१.२, विनियम ३१.३, आणि विनियम ३१.४ खाली करण्यांत आली आहे त्यास, अनुमती देण्यांत येईल;

३४.३.३कर्ज घेण्यासाठीचा खर्च यासंबधीच्या भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या लेखा मानक विवरणपत्र (एएस-१६) मधील तरतूदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, कर्ज भांडवलावरील व्याज काढताना, लागू राहतील.

३४.३.४व्याजावर कर, बांधिलकी (कमिटमेंट) आकार, वित्तीय आकार आणि परकीय चलनातील कर्जावर परकीय चलन विनिमयांतील कोणत्याही बदलामुळे होणारा फरक या बाबींना, विद्युत निर्मित्ती कंपनीच्या लेखा पुस्तकांत व्याजावरील खर्च म्हणून जितक्या प्रमाणांत संबोधण्यांत येत असेल त्या प्रमाणांत , आयोग या बाबींना अनुमती देईल.

३४.४ घसा-यापोटीच्या अग्रिमासह घसारा

३४.४.१घसारा

या विनियमांच्या प्रयोजनार्थ, घसा-याची परिगणना खालील पध्दतीने करण्यांत येईल-

(१) आयोगाने विनियम ३० खाली मान्यता दिलेला मत्तेचा मूळ खर्च हे घसारा निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ आधारभूत मूल्य असेल.

(२) या विनियमासोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दिलेल्या दराने घसा-याची परिगणना दर वर्षी स्थिर पध्दतीने (स्ट्रेट लाईन मेथड) करण्यांत येईल;

परंतु असे की, मत्तेच्या मूळ खर्चाच्या १० टक्के मत्तेचा उरलेला उपयोगिता काल म्हणून मानण्यात येईल आणि जास्तीत जास्त ९० टक्केपर्यंत घसारा मंजूर करण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, जमिन ही घसारा काढण्याची मत्ता नसल्यामुळे तिच्यावरील खर्च हा मूळ खर्चातून, घसा-याची परिगणना करण्यासाठी, वगळण्यांत येईल.

परंतु असेही की, घसा-याच्या लेख्याबाबतच्या भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या लेखा मानक विवरणपत्र (एएस-६) मधील तरतूदी, या विनियमांशी त्या विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, लागू राहतील.

३४.४.२घसा-यापोटी अग्रिम

घसा-याशिवाय, विद्युत निर्मिती कंपनीला, वरील विनियम ३२.३ नुसार परिगणना केलेला, घसा-यापोटी अग्रिम मिळण्याचा हक्क असेल.

३४.४.३ विद्युत निर्मिती कंपनीस आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपर्यंत अमूर्त मत्ता निवारण निधी वसूल करण्यास मुभा दिली जाईल.

स्पष्टीकरण - या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “अमूर्त मत्ता” म्हणजे रोखीत करण्यांत आलेला कामकाज-पूर्व आणि विकासाचा खर्च आणि जो विद्युत निर्मिती कंपनीच्या भांडवली लेख्यांत खर्ची टाकल्याची नोंद झालेली आहे व जो विद्युत निर्मिती उद्योग विकसित करित असताना योग्य खर्च म्हणून करावा लागला आहे व त्यांत ख्याती-मूल्य (गुड-विल) म्हणून अदा केलेल्या किंवा ताळेबंदांत दाखविलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश नसेल.

३४.५ <u>खेळते भांडवलावरील व्याज</u>

(ए) कोळशावर आधारित/ तेलावर आधारित/ लिग्नाइटवर प्रज्वलित विद्युत निर्मिती केंद्रांमधील खेळते भांडवलांत खालील बाबींचा समावेश असेलः-

(१) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन, कोळसा मिळण्याच्या ठिकाणी असलेल्या विद्युत निर्मिती केंद्रांकरिता दीड महिन्याचा कोळसा किंवा लिग्नाइटारील खर्च आणि कोळसा मिळण्याच्या ठिकाणापासून दूर असलेल्या विद्युत निर्मिती केंद्रांकरिता- दोन महिन्यांचा खर्च;

(२) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन, तेलावरील दोन महिन्यांचा खर्च;

(३) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन, दुय्यम इंधन तेलावरील दोन महिन्यांचा खर्च;

(४) कामकाज आणि देखभालीवरील एक महिन्याचा खर्च;

(५) देखभालीसाठी लागणा-या सुट्या भागांवरील खर्च- मागील कालावधीतील खर्चाच्या १ टक्का दराने; आणि

(६) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकारांच्या बेरजेच्या दोन महिने केलेल्या विजेच्या विक्रीची येणेबाकी इतकी रक्कम; वजा

(७) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या एक महिन्यासाठी लागणा-या इंधन खर्चावरील (तेल आणि दुय्यम इंधन तेलासह) देय रक्कम.

(बी) गॅस टर्बाइन/ कम्बाइन्ड सायकलवर आधारित विद्युत निर्मिती केंद्रांकरिता लागणा-या खेळते भांडवलात खालील बाबींचा समावेश असेल-

(१) विद्युत निर्मिती केंद्राचे कामकाज वायु इंधनावर आणि/ किंवा द्रव इंधनावर चालते त्यानुसार दैनिक उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन एक महिना लागणा-या इंधनाचा खर्च

(२) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन, द्रवरुप इंधनाचा सांठा पंधरा (१५) दिवसांकरिता

(३) कामकाज आणि देखभालीवरील एक महिन्याचा खर्च;

(४) देखभालीसाठी लागणा-या सुट्या भागांवरील खर्च- मागील कालावधीतील खर्चाच्या १ टक्का दराने; आणि

(५) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकार आणि उर्जा आकारांच्या बेरजेच्या दोन महिने केलेल्या विजेच्या विक्रीची येणेबाकी इतकी रक्कम; वजा

(६) उपलब्धता लक्ष्यास अनुसरुन परिगणना केलेल्या एक महिन्यासाठी लागणा-या इंधन खर्चावरील (द्रव इंधनाच्या साठ्यासह) देय रक्कम.

(सी) जल विद्युत निर्मिती केंद्रासाठी लागणा-या खेळते भांडवलांत खालील बाबी असतीलः-

(१) कामकाज आणि देखभालीवरील एक महिन्याचा खर्च;

(२) देखभालीसाठी लागणा-या सुट्या भागांवरील खर्च- मागील कालावधीतील खर्चाच्या १ टक्का दराने; आणि

(३) प्रमाणकानुसारी क्षमता निर्देशांकावर परिगणना केलेल्या वार्षिक स्थिर आकारांच्या दोन महिने केलेल्या विजेच्या विक्रीची येणेबाकी इतकी रक्कम.

(डी) स्वतःचे विद्युत निर्मिती केंद्र असल्यास, विद्युत निर्मिती उद्योगाकडून किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायला करण्यांत आलेल्या विद्युत पुरवठ्यासाठी, या विनियमांनुसार खेळते भांडवलालाच्या परिगणनेसाठी, येणेबाकीची कोणतीही रक्कम मान्य करण्यांत येणर नाही.

(इ) खेळते भांडवलावरील व्याज हे प्रमाणकानुसारी तत्त्वावर असेल आणि ते, वीज दराच्या निश्चितीकरणासाठी ज्या तारखेस अर्ज सादर करण्यांत येईल त्यादिवशी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अल्प-कालिन मूख्य व्याज दराइतके, असेल.

३४.६ <u>कामकाज आणि देखभाल खर्च</u>

३४.६.१ अस्तित्वांत असलेली विद्युत निर्मिती केंद्रे

(ए) आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून, विम्यासह कामकाज आणि देखभाल खर्च हा ३१ मार्च, २००४ रोजी संपणा-या पांच (५) वर्षांतील कामकाज आणि देखभालीकरिता, लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्रांवर आधारित, प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या सरासरीवर आधरित असेल. मात्र त्यांत, असल्यास कोणत्याही, असाधारण कामकाज आणि देखभालीवरील खर्चाचा, समावेश नसेल.

(बी) अशा कामकाज आणि देखभालीच्या खर्चाची सरासरी ही ३१ मार्च, २००२ रोजी संपणा-या आर्थिक वर्षासाठी कामकाज आणि देखभालीचा खर्च म्हणून समजण्यांत येईल आणि त्यांत दर वर्षी ४ टक्के दराने भर घालण्यांत येऊन येणारी रक्कम ही १ एप्रिल, २००५ रोजी सुरू होण-या आधारभूत वर्षासाठी कामकाज आणि देखभालीचा खर्च असेल.

(सी) पुढील प्रत्येक वर्षासाठी आधारभूत कामकाज आणि देखभालीचा खर्च हा दर वर्षी ४ टक्के दराने वाढविण्यांत येईल ज्यामुळे, अशा आर्थिक वर्षासाठीचा अनुज्ञेय कामकाज आणि देखभालीचा खर्च मिळू मळेल.

परंतु असे की, जर एखाद्या अस्तित्वांत असलेल्या विद्युत निर्मिती कंद्राचे कामकाज तारीख १ एप्रिल, २००४ रोजी पांच (५) वर्षाहून कमी कालावधीसाठी झालेले असेल, तर, ज्या कालावधीत हे केंद्र चालू होते अशा अल्प कालावधीकरिता त्याची, सरासरी काढण्यात येईल आणि अशा रितीने काढलेली सरासरी ही १ एप्रिल, २००४ रोजी सुरु होणा-या आधारभूत वर्षासाठी कामकाज आणि देखभालीचा खर्च म्हणून समजण्यांत येईल. पुढील आर्थिक वर्षासाठी कामकाज आणि देखभालीचा खर्च हा वरील खंड (सी) नुसार परिगणना करुन काढण्यांत येईल.

३४.६.२ नवीन विद्युत निर्मिती केंद्रे

(ए) औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे

(१) कोळशावर आधारित विद्युत निर्मित्ती केंद्रे

| | | |
|---|---|---|
| २००/२१०/२५० MW सेट्स | : | रु.१०.८२लाख / MW |
| ५०० MW आणि वरील सेट्स | : | रु. ९.७३ लाख /MW |

टिपणी

ज्या विद्युत निर्मिती केंद्रांमध्ये २००/२१०/२५० MW सेट्स आणि ५०० MW आणि वरील सेट्स एकत्रितपणे असतील तर कामकाज आणि देखभाल खर्चासाठी व्हेटेड सरासरी मूल्य स्वीकारण्यांत येईल.

(२) लहान गॅस टर्बाइनवर चालणा-या विद्युत निर्मिती केंद्रा व्यतिरिक्त इतर गॅस टर्बाइनवर/ कम्बाइन्ड सायकलवर चालणारी विद्युत निर्मिती केंद्रे

सुटे भाग १० वर्षाच्या वॉरंटीसह : रु.५.४१ लाख/MW

सुटे भाग वॉरंटीशिवाय : रु.८.११ लाख/MW

(३) लहान गॅस टर्बाइन विद्युत निर्मिती केंद्रे : रु.९.८४ लाख/MW

(४) लिग्नाइटवर प्रज्वलित विद्युत निर्मिती केंद्रे : रु.१०.८२लाख/MW

वरील कामकाज व देखभाल खर्चाचे निकष हे १ एप्रिल, २००५ पासून सुरू होणा-या आधारभूत वर्षासाठी आहेत, जे दर वर्षी ४ टक्के दराने वाढविल्यास वीज दराच्या कालावधीतील संबंधित वर्षाचे कामकाज व देखभालीचे अनुज्ञेय खर्च मिळतील.

(बी) जल विद्युत निर्मिती केंद्रे

प्रकल्पाच्या मान्यताप्राप्त मूळ खर्चाच्या १.५ टक्के इतका कामकाज व देखभाल खर्च, प्रकल्प सुरु होण्याच्या वर्षी आधरभूत खर्च म्हणून निश्चित करण्यांत येईल व त्यानंतर पुढील वर्षाकरिता दर वर्षी ४ टक्के दराने वाढविण्यांत येईल.

## ३५ ऊर्जा आकार

३५.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र

(ए) ऊर्जा आकारांत इंधन खर्चाचा समावेश असेल व तो निर्धारित विद्युत निर्मितीस अनुसरून बाहेर पाठविलेल्या एक्स-बस ऊर्जेच्या आधारे खालील सूत्राने काढता येईल-

ऊर्जा आकार (रु.) = ऊर्जा आकारांचा दर (रुपयांत)/ kWh x त्या महिन्यांतील निर्धारित विद्युत निर्मितीस अनुसरून बाहेर पाठविलेली kWh मधील एक्स-बस ऊर्जा,

जेथे,

ऊर्जा आकारांचा दर हा, निर्धारित विद्युत निर्मितीस अनुसरून बाहेर पाठविलेल्या एक kWh एक्स-बस ऊर्जेसाठी लागलेल्या प्राथमिक व दुय्यम इंधनाच्या प्रमाणकानुसारी परिमाणाचा खर्चाची बेरीज, आणि ज्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यांत येईल-

$$\text{उर्जा आकारांचा दर} = \frac{100\{P_p \times (Q_p)_n + P_s \times (Q_s)_n\}}{(100-(AUX_n))} \quad \text{(Rs/kWh)}$$

जेथे

$P_p$ = प्राथमिक इंधनाची म्हणजे/लिग्नाइट/गॅस/द्रव इंधनाची रु./किलो, रु/ घन मि. ($m^3$),रु/ लिटर मधील, जसे असेल तसे, उतरणखर्चासहित (landed) किंमत

$(Q_p)_n$ = जनरेटर टर्मिनल्सच्या ठिकाणी एक kWh विजेच्या निर्मितीसाठी प्राथमिक इंधनाचे रु./किलो, रु/घन मि., ($m^3$) रु/लिटर मधील लागाणारे परिमाण, जसे असेल तसे, आणि त्याची परिगणना ही प्रमाणकानुसारी केंद्रातील एकूण उष्णतेचे प्रमाण (वजा कोळसा/लिग्नाइटवर आधारीत विद्युत निर्मिती केंद्राना लागणा-या दुय्यम इंधन तेलामुळे मिळालेली वीज) आणि कोळसा/लिग्नाइट/गॅस/द्रव इंधनाचे प्रज्वलनानंतरचे एकूण कॅलरीतील मूल्य

$P_s$ = दुय्यम इंधन तेलाची रु./ ml मधील उतरणखर्चासहित किंमत

$(Q_s)_n$ = विनियम ३३.१.४ नुसार ml./ kWh मधील, दुय्यम इंधनाचे प्रमाणकानुसारी परिमाण, जसे असेल तसे, परिमाण; आणि

$AUX_n$=विनियम ३३.१.२नुसार एकूण वीज निर्मितीच्या टक्केवारीत प्रमाणकानुसारी सहाय्यकारी ऊर्जेचा वापर, जसे असेल तसे.

(बी) किंमतीतील तफावतीमुळे किंवा इंधनाच्या उष्णातांकातील तफावतीमुळे ऊर्जा आकारांच्या दराचे समायोजन-

सुरुवातीला, कोळसा किंवा लिग्नाइट किंवा वायू किंवा द्रव इंधन यांचे मागील तीन महिन्यांतील प्रत्यक्षांत असलेले एकूण कॅलरीतील मूल्य घेण्यांत येईल. प्राप्त झालेल्या आणि प्रज्वलित केलेल्या कोळसा किंवा लिग्नाइट किंवा वायू किंवा द्रव इंधन यांचे एकूण कॅलरीतील मूल्य आणि विद्युत निर्मिती कंपनीला कोळसा किंवा लिग्नाइट किंवा वायू किंवा द्रव इंधन, जसे असेल तसे, प्राप्त करुन घेण्यासाठी द्यावी लागेलेली रु. / ml मधील उतरणखर्चासहित किंमत यांच्यात जर कांही तफावत आली तर तिचे समायोजन महिन्याच्या महिन्याला करण्यात येईल. यासंबंधी जर काही वाद उद्‌भवला तर त्याबाबत कामकाज चालवण्याच्या विनियमानुसार योग्य अर्ज आयोगापुढे करण्यांत येईल.

(सी) इंधनाची उतरणखर्चासहित किंमत

इंधनाच्या उतरणखर्चासहित किंमतीमध्ये इंधनाच्या दर्जा/गुणवत्ता, त्याची किंमत ज्यांत लागू असलेले स्वामित्वधन (रॉयल्टी), कर, शुल्क, तसेच रेल्वे, रस्त्याने किंवा पाइपलाइन किंवा अन्य कोणत्याही मार्गावरील वाहतूक खर्च आणि उर्जा आकाराच्या परिगणनेच्या प्रयोजनार्थ विनियम ३३.१.६ नुसार प्रवासांतील घट, यांचाही समावेश असेल.

३५.२ <u>जल विद्युत निर्मिती केंद्रे</u>

३५.२.१ ऊर्जा आकार

(ए) जल विद्युत निर्मिती केंद्रातून बाहेर पाठवावयाच्या निर्धारित एक्स-बस उर्जेवर पैसे प्रति kWh च्या दराच्या आधारे ऊर्जा आकारांची परिगणना करण्यांत येईल.

(बी) स्टेट लोड डिस्पॅच सेंटरच्या वीज बाहेर पाठववयाच्या अंतिम आदेशानुसार जर अशा जल विद्युत निर्मिती केंद्राची वीज बाहेर पाठवावयाची नसेल तर उपलब्ध असलेल्या अन्य कमीत-कमी खर्चाच्या पर्यायी विजेच्या स्त्रोताच्या विजेची किंमत/ अस्थिर खर्च यांच्या आधारे, आयोगने वेळोवेळी अधिसूचित केलेला दर हा, जल विद्युत निर्मिती केंद्राच्या ऊर्जेचा दर राहील.

(सी) ऊर्जा आकाराची परिगणना खालील सूत्राच्या आधारे करण्यांत येईल-

ऊर्जा आकार = विक्रीयोग्य उर्जा xऊर्जेचा दर .

## ३६ अ-निर्धारित आंतरबदलांसाठी आकार

३६.१ निर्धारित वीज निर्मितीनुसार बाहेर पाठवावयाची ऊर्जा आणि प्रत्यक्षांत बाहेर पाठविलेली ऊर्जा यांतील तफावतीसाठी असलेले आकार, स्टेट लोड डिस्पॅच सेंटरने प्रसिध्द केलेल्या आणि आयोगाने मान्यता दिलेल्या सेटलमेंट आणि बॅलन्सिंग कोड नुसार, विद्युत निर्मिती केंद्रास, जसे असेल तसे, मिळण्याचा हक्क राहील किंवा ते त्यास सहन करावे लागतील.

परंतु असे की, हे आकार निश्चित करावयाचा दर आयोग वेळोवेळी अधिसूचित करेल त्यानुसार राहील.

## ३७ प्रोत्साहन-अधिदान

३७.१ औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रे

प्लँट लोड फॅक्टर लक्ष्यानुसार एक्स-बस ऊर्जेसाठीच्या निर्धरित विद्युत निर्मितीपेक्षा अधिक असलेल्या एक्स-बस निर्मित उर्जेसाठी २५.०पैसे/ kWh या सरसकट दराने प्रोत्साहन-अधिदान देण्यांत येईल.

३७.२ जल विद्युत निर्मिती केंद्रे

(ए) सर्व विद्युत निर्मिती केंद्रासह नवीन विद्युत निर्मिती केंद्रांना त्यांच्या कामकाजाच्या प्रथम वर्षात, जेव्हा पुर्णतः नदीच्या पाण्यावरील विद्युत निर्मित केंद्रांचा क्षमता निर्देशांक ($C_I$)९०%च्या वर जाईल आणि साठवणूकीच्या किंवा जलाशयासह प्रकारच्या असलेल्या नदीच्या पाण्यावरील विद्युत निर्मिती केंद्राचा क्षमता निर्देशांक जेव्हा ८५% च्या वर जाईल तेव्हा त्यांना प्रोत्साहन-अधिदान देय राहील व प्रोत्साहन-अधिदान हे जास्तीत जास्त १००% क्षमता निर्देशांकापर्यंत मिळू शकेल.

(बी) विद्युत निर्मिती कंपनीला प्रोत्साहन-अधिदान हे खालील सूत्रानुसार देय राहील-

प्रोत्साहन-अधिदान = 0.65x Annual fixed Charge x $(CI_A-CI_N)/100$

(जर प्रोत्साहन-अधिदान ऋण (-) असेल तर ते ० दाखविण्यांत येईल.)

जेथे $CI_A$ साध्य केलेला क्षमता निर्दिशांक आहे तर $CI_N$ हा प्रमाणकानुसारी क्षमता निर्देशांक आहे ज्याचे मूल्य पुर्णतः नदीच्या पाण्यावरील विद्युत निर्मित केंद्रांसाठी ९०% आणि साठवणूकीच्या/ जलाशयासह प्रकारच्या नदीच्या पाण्यावरील विद्युत निर्मिती केंद्रासाठी ८५% आहे.

## ३८ सूट/ उशीरा अदायगीसाठी अधिभार

३८.१ पतपत्र सादर केल्यावर देयकाची रक्कम अदा करण्यांत येणार असल्यास, विद्युत निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक, आपसातील संमतीने, देयकाच्या रकमेवर जास्तीत जास्त २% सूट देऊ शकतील. जर देयक सादर केल्यावर एक आठवड्याच्या आंत रक्कम अदा करण्यात आली तर विद्युत निर्मिती कंपनी आणि वितरण परवानाधारक, आपसातील संमतीने, देयकाच्या रक्कमेवर जास्तीत जास्त १.२५% सूट देऊ शकतील.

३८.२ जर देयकाची रक्कम अदा करण्यास देयकाच्या तारखेपासून दोन (२) महिन्याहून अधिक कालावधी लागला तर विलंबाच्या अशा प्रत्येक महिन्यासाठी प्रति महिना १.२५% विलंब भरणा अधिभार लावण्यास विद्युत निर्मिती कंपनीला अनुमती देण्यांत येईल.

## ३९ देयके तयार करणे आणि आकारांची अदायगी

३९.१ देयके तयार करण्याचे काम आणि आकारांची अदायगी मासिक तत्त्वावर करण्यांत येईल.

## ४०	घोषित क्षमता सिध्द करुन दाखविणे

४०.१ स्टेट लोड डिस्पॅच सेंटरला जेव्हा पाहिजे असेल तेव्हा विद्युत निर्मिती कंपनीला तिच्या विद्युत निर्मिती केंद्राची घोषित क्षमता सिध्द करुन दाखववावी लागेल. जर विद्युत निर्मिती कंपनी घोषित क्षमता सिध करुन दाखवू शकली नाही तर विद्युत निर्मिती कंपनीला देय असलेले स्थिर आकार, दंड म्हणून, कमी करण्यांत येतील.

४०.२ दिवसाच्या कोणत्याही कालावधी/ गटाकरिता पहिल्या चुकीच्या घोषणेसाठी दंडाचे परिमाण हे दोन दिवसांच्या स्थिर आकारांइतके असेल. दुस-या चुकीच्या घोषणेसाठी दंड चार दिवसांच्या स्थिर आकारांइतका तर पुढील चुकीच्या घोषणांसाठी, आयोगाच्या आदेशाप्रमाणे, दंड याच भूमितीय प्रमाणांत वाढता राहील.

४०.३ जेव्हा विद्युत निर्मिती केंद्राची घोषित क्षमता ही कमी असेल आणि त्याची प्रत्यक्ष वीज निर्मिती ही घोषित क्षमतेपेक्षा जास्त असेल तर विद्युत निर्मिती कंपनीचे अनिर्धारित आंतर-बदलांसाठी असलेले कोणतेही आकार, या जादा वीज निर्मितिमूळे, शून्यवत करण्यांत येतील आणि ही रक्कम, अशा विद्युत निर्मिती केंद्राच्या स्थापित क्षमतेमध्ये वितरण परवानाधारकाच्या असलेल्या हिश्श्याच्या प्रमाणांत, वितरण परवानाधारकाच्या खात्यांत, जमा करण्यांत येईल.

४०.४ विद्युत निर्मिती केंद्राची कामकाजाची नोंद-वही आयोगास पूनर्विलोकनासाठी उपलब्ध राहील.

## ४१	मानीव वीज निर्मिती

४१.१ विद्युत निर्मिती केंद्राच्या नियंत्रणाबाहेरील कारणामुळे किंवा पारेषण परवानाधारकाच्या पारेषण वाहिन्या उपलब्ध न झाल्यामुळे किंवा स्टेट लोड डिस्पॅच सेंटरकडून वीज निर्मिती कमी करण्याच्या सूचना प्राप्त झाल्याने पाणी फुकट गेल्यामुळे, जर विद्युत निर्मिती केंद्रास वीज निर्मिती कमी करावी लागली तर वाया गेलेल्या पाण्यासाठीचा ऊर्जा आकार हा विद्युत निर्मिती कंपनीला प्राप्त होईल.

४१.२ जर वर्षांत निर्माण झालेली ऊर्जा ही डिझाइन उर्जे इतकी किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर वरील कारणामुळे ऊर्जा आकार अनुज्ञेय राहणार नाहीत.

**भाग- एफः पारेषण**

## ४२.	विनियम कोणास लागू असतील

४२.१ या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेच्या दिवशी किंवा त्यानंतर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याबरोबर ठोक वीज पारेषण करार किंवा इतर व्यवस्था करण्यांत आल्यानंतर पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश करण्याकरिता आणि तिचा उपयोग करण्याकरिता विजेचा दर निश्चित करण्यासाठी या भागांत असलेले विनियम लागू राहतील.

परंतु असे की, प्रकरणाची परिस्थिती लक्षांत घेऊन, योग्य वाटल्यास, या भागांत नमूद केलेल्या निकषापेक्षा वेगळे निकष आयोग स्वीकारू शकेल किंवा विशिष्ट प्रकरणाकरिता पर्यायी निकष ठरवून देईल.

परंतु असे की, असे वेगळे निकष स्वीकारल्यास त्याबाबतची कारणे लेखी नमूद करण्यांत येतील.

परंतु असे की, अस्तित्वांत असलेल्या पारेषण यंत्रणेच्या संद्र्भात, अशा पारेषण यंत्रणेची मागील कामगिरी विचारांत घेऊन व कामगिरीत सुधारणा करण्यासाठी वाजवी संधी देऊन, आयोग वीज दर निश्चित करेल.

४२.२ अधिनियमाच्या कलम ३६ च्या परंतुकानुसार परवानाधारकाने केलेल्या अर्जाच्या संदर्भात, या भागांत असलेल्या अटी व शर्तीपासून घेतलेल्या मार्गदर्शनानुसार आयोग, मधल्या पारेषण सुविधेचा वापर करण्यासाठीचे दर, आकार, अटी व शर्ती विहीत करेल.

## ४३. वीज दराचे भाग

४३.१ पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्याकरिता आणि तिचा उपयोग करण्याकरिता निश्चित करावयाच्या पारेषण आकारांत खालील बाबी समाविष्ट असतील:

(ए) पारेषण यंत्रणा प्रवेश आकार; आणि

(बी) वार्षिक पारेषण आकार.

४३.२ पारेषण यंत्रणा प्रवेश आकार

४३.२.१ पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्याकरिता पात्र असणा-या कोणत्याही व्यक्तीस पारेषण खुला प्रवेश विनियमांनुसार असा प्रवेश मिळविण्याचा हक्क राहील आणि या विनियमांत अशा प्रवेशासाठी विहीत करण्यांत आलेले आकार भरण्यास तो जबाबदार राहील.

स्पष्टीकरणः- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, अशी व्यक्ति, जिने पारेषण खुल्या प्रवेशासाठी पात्र असल्यामुळे पारेषण क्षमता हक्कांचे वाटप करण्यासाठी अर्ज केला आहे आणि जिने असा प्रवेश मिळविण्यासाठी कामे करण्याचे मान्य केले आहे, अशा व्यक्तीस येथून पुढे 'इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता' म्हणून संबोधण्यांत येईल आणि त्यांत ज्याने सध्याच्या पारेषण क्षमता हक्कांमध्ये वाढ करण्यासाठी अर्ज केला आहे अशा अस्तित्वांत असलेल्या पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचाही समावेश असू शकेल.

४३.२.२ जेव्हा इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या आंतर-राज्य प्रवेशासाठी जर उपयोगकर्त्यासाठी खास अशा पारेषण वाहिन्या किंवा इतर पारेषण मत्ता उभारण्याचे काम कारवे लागले तर, पारेषण परवानाधारकास अशा इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास प्रवेश देण्यासाठी केलेल्या सर्व वाजवी कामांवर झालेला खर्च पारेषण यंत्रणा प्रवेश आकाराद्वारे वसूल करण्याचा हक्क राहील.

४३.२.३ जेव्हा इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या प्रवेशामुळे, आंतर-राज्य पारेषण यंत्रणेशी संबंधित परंतु विनियम ४३.२.२ खाली न येणारी अशी कामे करणे आवश्यक असेल तेव्हा पारेषण परवानाधारक अशा कामांवर झालेला खर्च, खालील विनियम ४३.३ नुसार, वार्षिक पारेषण आकारांद्वारे वसूल करेल;

परंतु तथापि असे की, पारेषण परवानाधारक आणि इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता यांनी आपसांत झालेल्या कराराद्वारे, विनियम ४३.२.३ खाली अशा कामांवर झालेला खर्च हा इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून पारेषण यंत्रणा प्रवेश आकारांतून वसूल करण्यांत येईल, असे ठरविले असल्यास, अशा प्रकरणी असा खर्च वार्षिक पारेषण आकारातून वसूल करण्यांत येणार नाही.

४३.२.४ जर प्रवेश मिळविण्यासाठीची कोणतीही कामे इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने केलेली असतील तर पारेषण परवानाधारकास अशी कामे करुन घेण्यासाठी लावलेल्या कामगारांवरील खर्चाच्या १५% पर्यवेक्षण आकार वसूल करण्याचा हक्क राहील आणि इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने करुन घेतलेल्या अशा कामासंबंधात त्याला अन्य कोणताही खर्च वसूल करण्याचा हक्क राहणार नाही.

४३.२.५ पारेषण परवानाधारक आणि इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता यांच्यातील ठोक वीज पारेषण कराराच्या कालावधीत आंतर-राज्य पारेषण यंत्रणेत द्यावयाच्या प्रवेशासाठी केलेल्या कामांची देखभाल पारेषण परवानाधारकाकडून करण्यांत येईल.

४३.२.६ पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेतील प्रवेशासाठी केलेल्या कामासाठीच्या खर्चाची रक्कम जर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने अदा केली असेल तर ठोक वीज पारेषण कराराच्या समाप्तीनंतर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा त्याने खर्च केलेल्या अशा कामांच्या घटीत मूल्यावर हक्क राहील;

परंतु असे की, पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेत त्याला प्रवेश मिळावा म्हणून जर पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने कामे केली असतील तर ठोक वीज पारेषण कराराच्या समाप्तीनंतर अशी कामे ठेवून घेण्याचा त्याला हक्क राहील.

४३.२.७ठोक वीज पारेषण करारांतील अटींनुसार पारेषण यंत्रणा प्रवेश आकार खालीलपैकी कोणत्याही एका पध्दतीने वसूल करता येऊ शकेलः-

(ए) प्रवेश मिळविण्याच्या वेळी एकदाच रक्कम अदा करून; किंवा

(बी) विनियम ४७ मधील प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल : भाग भांडवल गुणोत्तरावर आधारित पारेषण परवानाधारकाच्या भांडवलावर झालेल्या खर्चाची योग्य काळजी घेऊन ठोक वीज पारेषण कराराच्या कालावधीत अनेक हप्त्यांत रक्कम अदा करुन; किंवा

(सी) वरील (ए) आणि (बी) च्या कोणत्याही संयोगाद्वारे.

४३.२.८ पारेषण परवानाधारक आणि इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता यांच्यात इच्छूक पारेषण यंत्रणा उपयोगकर्यास प्रवेश देण्यासाठी करुन घ्यावयाच्या कामांसंबंधी किंवा पारेषण यंत्रणा प्रवेश आकाराबबत जर कोणताही वाद निर्माण झाला तर तो आयोगाकडे किंवा ठरवून देण्यांत येईल येईल अशा अन्य पीठाकडे निर्णयासाठी संबोधण्यांत येईल.

४३.३ <u>वार्षिक पारेषण आकार</u>

४३.३.१ पारेषण परवानाधारकाच्या वार्षिक पारेषण आकारांतून त्या आर्थिक वर्षाच्या एकूण वार्षिक महसूलाच्या गरजेमधून आयोगाने मान्यता दिलेले त्याचे वीज दरा व्यतिरिक्तचे उतपन्न आणि इतर उद्योगांपासूनचे उत्पन्न वजा जाता राहिलेल्या रकमेची वसूली करण्यांत येईल व त्यांत खालील बाबी समाविष्ट असतीलः :

एकूण महसूलाची गरजः

(ए) भाग भांडवलावरील परतावा;

(बी) आय-कर ;

(सी) कर्ज भांडवलावरील व्याज;

(डी) घसा-यापोटी अग्रिमासह घसारा आणि अमूर्त मत्ता निवारण्यासाठी निधीची तरतूद करण्यासाठी.

(इ) कामकाज आणि देखभाल खर्च;

(एफ) खेळते भांडवलावरील आणि पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडील ठेवीवरील व्याज; आणि

(जी) आकस्मिक निधीसाठी वर्गणी;

वार्षिक पारेषण आकार = वरीलप्रमाणे वार्षिक महसूलाची गरज, वजाः

(एच) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न; आणि

(आय) या विनियमांत मान्यता दिलेल्या मर्यादेपर्यंत इतर उद्योगामधील उत्पन्न.

४३.३.२या विनियमांतील भाग-बी नुसार पारेषण परवानाधारकाने वीज दर निश्चितीसाठी केलेल्या अर्जाच्या आधारे पारेषण परवानाधारकाच्या वार्षिक पारेषण आकारांची निश्चिती आयोगाकडून करण्यांत येईल.

## ४४. बहु-वर्षीय वीज दर

४४.१ आयोगाने केलेले अपवाद वगळता, या विनियमाच्या भाग-सी मधील विनियम राज्यांतील सर्व पारेषण परवानाधारकांना दिनांक १ एप्रिल, २००६ पासून लागू होतील.

## ४५. गुंतवणूक योजना

४५.१ पारेषण परवानाधारक त्याच्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पांच्या पूर्ण तपशीलासह त्याची गुंतवणूक योजना वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत किंवा स्वतंत्रपणे, आयोग निदेश देईल तेव्हा सादर करेल;

परंतु असे की, गुंतवणूक योजना ही एक बदलती योजना राहील व तिचा कालावधी हा, अशा अर्जाचा भाग म्हणून सादर करण्यांत येत असलेले पूर्व-अनुमान आणि अंदाज ज्या कालावधीसाठी असतील त्या कालावधीशी जुळणारा असेल.

४५.२ पारेषण परवानाधारकाची आंतर-राज्य पारेषण यंत्रणा मजबूत करण्यासाठी व वाढ करण्यासाठी त्यांत करावयाच्या गुंतवणूकीसाठीची गुंतवणूक योजना कमीत कमी खर्चाची असेल.

४५.३ गुंतवणूक योजनेत रुपये दहा (१०) कोटीहून अधिक रकमेच्या सर्व भांडव्ली खर्चाच्या योजनांचा समावेश असेल आणि आयोग वेळोवेळी विहीत करेल त्या नमून्यामधे योजना तयार करण्यांत येईल.

४५.४ गुंतवणूक योजनेसोबत प्रस्तावित गुंतवणुकीची गरज, विचारांत घेतलेले इतर पर्याय, खर्च/ लाभांचे विश्लेषण, आणि पारेषण आकारांवर परिणम करु शकणा-या इतर घटकांची माहिती, तपशील व कागदपत्रे सादर करण्यांत येतील.

४५.५ पारेषण परवानाधारकाची गुंतवणूक योजना पारेषण खुला प्रवेश विनियमानुसार विकसित केलेल्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेच्या पारेषण यंत्रणा योजनेशी सुसंगत असेल.

४५.६ पारेषण परवानाधारकाने सादर केलेल्या गुंतवणूक योजनेचे आयोग पूनर्विलोकन, प्रस्तावित खर्चामागील योग्यायोग्यता ठरवून व त्याचा वीज दरावर होणारा अपेक्षित परिणाम लक्षांत घेऊन, करेल व त्यानंतर आयोग-

(ए) पारेषण परवानाधारकाने सादर केलेल्या गुंतवणूक योजनेला आयोग तत्वतः मान्यता देताना त्यांत आयोगास उचित वाटतील असे बदल करेल किंवा शर्ती घालेल; किंवा

(बी) पारेषण परवानाधारकाने सादर केलेली गुंतवणूक योजना नामंजूर करेल व आयोगास आवश्यक वाटतील अशा घटकांचा विचार करून नवीन गुंतवणूक योजना सादर करण्यास आयोग सांगेल.

४५.७ पारेषण परवानाधारक वीज दर निश्चितीकरणासाठी किंवा वार्षिक कामगिरीचे पुर्नविलोकन करण्यास्साठी अर्ज सादर करताना, जसे असेल तसे, भांडवली खर्चाच्या प्रकल्पांमध्ये झालेल्या प्रगतीची माहिती व त्यासोबत या माहितीची पडताळणी करण्यासाठी आयोगास हवी असलेली इतर माहिती, तपशील व कागदपत्रेही पाठवेल.

## ४६ भांडवली खर्च

४६.१ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या रुपये दहा (१०) कोटीपेक्षा जास्त भांडवली खर्च असलेल्या प्रकल्पाचा त्या आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च निश्चित करण्यासाठी पारेषण परवानाधारकाची मान्यताप्राप्त गुंतवणूक योजना आधार राहील.

४६.२ प्रकल्पाच्या आरंभापासून ते तो प्रकल्प सुरु होईपर्यंतच्या दिनांकापर्यंत, प्रत्येक भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, एकूण वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चाची बेरीज त्या प्रकल्पाची मूळ किंमत राहील;

परंतु असे की, प्रकल्पाची सुरुवात झाल्यानंतर, भांडवली स्वरुपाचा झालेला अतिरिक्त वाजवी खर्च प्रकल्पाच्या मूळ किंमतीत समाविष्ट करण्यास, पारेषण परवानाधारकाने तसा अर्ज केल्यास, आयोग परवानगी देईल.

४६.३ गूंतवणूक योजनेचा एक भाग म्हणून मान्यता दिलेल्या अंदाजित मूळ खर्चापेक्षा जर भांडवली खर्चाच्या प्रकल्पावर झालेला प्रत्यक्ष खर्च जास्त झाला किंवा जर पारेषण परवानधारकाची अशी खात्री असली की प्रत्यक्ष होणारा खर्च हा अंदाजापेक्षा अधिक होईल तर, पारेषण परवानधारक प्रकल्पाच्या मूळ अंदाजित खर्चाहून तफावत असलेल्या खर्चास मान्यता देण्यासाठी, वार्षिक कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून, आयोगकडे अर्ज करेल;

परंतु असे की, असा खर्च हा वाजवी असून नियंत्राणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेला आहे अशी आयोगाची खात्री पटली तर, योग्य छाननीनंतर, आयोग, वरील विनियम १८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीस अनुसरुन असा वाढीव खर्च हाताळण्यास अनुमती देईल.

४६.४ जर भांडवली खर्चाच्या प्रकल्पावरील प्रत्यक्ष खर्च हा मान्यता देण्यांत आलेल्या अंदाजित मूळ खर्चापेक्षा कमी असेल आणि खर्चातील बचत ही नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे झालेली असेल तर, आयोग , योग्य छाननीनंतर, अशा प्रकल्पाच्या बांधकामाच्या कालावधीत, परिणामस्वरुप कर्ज भांडवलावरील व्याजांत होणारी बचत, वरील विनियम १९ मध्ये नमूद केलेल्या पद्धतीस अनुसरून हाताळण्यास अनुमती देईल;

परंतु असे की, जर भांडवली खर्चातील बचत ही नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेली असेल तर ती वरील विनियम १८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार हाताळण्यांत येईल.

४६.५ या विनियम ४६ मध्ये काहीही असले तरी, रुपये दहा (१०) कोटी पेक्षा अधिक खर्च नसलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, वार्षिक अनज्ञेय भांडवली खर्च आणि प्रकल्पाचा मूळ खर्च निश्चित करण्याकरिता, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्रणास अधिन राहून, पारेषण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत नोंद झालेला प्रत्यक्ष खर्च हा आधार राहील,

४६.६ या विनियम ४६ मध्ये काहीही असले तरी, १ एप्रिल, २००५ पूर्वी मंजूर केलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च आणि प्रकल्पाचा मूळ खर्च निश्चित करण्याकरिता, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवेलेल्या नियंत्रणास अधीन राहून, पारेषण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत नोंद झालेला प्रत्यक्ष खर्च हा आधार राहील,

४६.७ भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या स्थिर मत्तेच्या लेख्यांसंबंधित असलेले लेखा मानक विवरणपत्र (एएस-१०) हे, या विनियमांशी विसंगत नसेल तितक्या मर्यादेपर्यंत, भांडवली खर्च प्रकल्पाची मूळ किंमत आणि/किंवा भांडावलीकृत केलेल्या स्थिर मत्तेची मूळ किंमत निश्चित करण्यासाठी लागू राहील.

४६.८ वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च, या विनियमाच्या प्रयोजनार्थ, अशा आर्थिक वर्षांत समानपणे झाला आहे, असे मानण्यांत येईल.

४६.९ सुरुवातीचे सुटे भाग भांडवलीकृत केल्यामुळे भांडवली खर्चाच्या प्रकल्पाच्या मूळ खर्चाच्या १.५ टक्के अतिरिक्त रक्कम मूळ किंमतीत वाढविण्यास अनुमती देण्यांत येईल.

४६.१० भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या परकीय चलनाच्या दरांतील बदलाच्या परिणामासंदर्भांत असलेले लेखा मानक विवरणपत्र (एएस-११) नुसार, भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता घेतलेल्या परकीय चलनातील कर्जावर कोणत्याही परकीय चलनांतील दरांत होणा-या बदलांचे परिणाम हाताळण्यांत येतील.

परंतु असे की, या विनियमांच्या विनियम ४७ व विनियम ४८ प्रमाणे निश्चित करण्यांत आलेल्या प्रत्यक्ष किंवा प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलाचा समावेश वरील बाबीमध्ये करण्याचा विचार करण्यांत येईल.

४६.११ पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने कामांसाठी भरलेली वर्गणीची कोणतीही रक्कम प्रकल्पाच्या अशा मूळ खर्चातून, या विनियमाखाली कर्ज भांडवल आणि भाग भांडवलाची परिगणना करण्यासाठी, वजा करण्यांत येईल;

परंतु असे की, खालील विनियम ५०.४ नुसार घसारा काढण्यासाठी, अशी कोणतीही वर्गणी वजा करण्यापूर्वी असलेली प्रकल्पाची मूळ किंमत विचारांत घेण्यांत येईल.

## ४७ कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर

४७.१ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पावर आणि/ किंवा अशा तारखेस किंवा त्यानंतर खरेदी केलेल्या स्थिर मत्तेवर आर्थिक वर्षांत केलेला कोणताही भांडवली खर्च हा, अशा आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चावर लागू करावयाच्या ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे, असे मानण्यांत येईल.

४७.२ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता भांडवलीकृत केलेली कोणतीही मत्ता आणि/ किंवा त्या दिवशी किंवा त्यानंतर खरेदी केलेली कोणतीही स्थिर मत्ता यासाठी झालेला खर्च हा, या प्रकल्पाच्या किंवा मत्तेच्या मूळ किंमतीवर लावावयाच्या, ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे, असे मानण्यांत येईल.

४७.३ सुरुवात झाल्याच्या तारखेनंतर प्रकल्पाच्या/ स्थिर मत्तेच्या मूळ किंमतीत झालेल्या मान्यताप्राप्त बदलासाठी करण्यांत आलेला खर्च हा, प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे, असे मानण्यांत येईल.

४७.४ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या व कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर ७० : ३० पेक्षा कमी असलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाची आर्थिक समाप्ती जर या

विनियमाच्या अधिसूचनेच्या तारखेपूर्वी झाली असेल तर पारेषण परवानाधारक त्यास विनियम ४७.१ मधून सूट देण्यासाठी, त्यासंबंधीच्या कारणांसह, आयोगाकडे अर्ज करेल;

परंतु असे की, आयोगाची खात्री पटली की विनियम ४७.१ लावल्यामुळे प्रकल्प सुरू होण्याच्या वेळापत्रकावर व त्यामुळे ग्राहकांना पुरवावयाच्या विजेच्या खर्चावर आणि / किंवा परिमाणावर विपरित परिणाम होऊ शकेल तर आयोग, अशा भांडवली खर्चाच्या प्रकल्पास प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल : भाग भांडवल गुणोत्तर लावण्यापासून सूट देईल.

४७.५ जर अर्जदार तो, बाजारपेठेतील अडचणी, कॉर्पोरेट /समूहास कर्ज देणा-या कर्जदाराच्या कर्जाबाबतच्या निकषांमुळे किंवा तत्सम कारणांमुळे, विहीत करण्यांत आलेल्या मर्यादेइतके कर्ज-भांडवल उभे करु शकत नसल्याचे वाजवीरित्या सिध्द करु शकला तर, आयोग या विनियम ४७ मधे विहीत करण्यांत आलेल्या कर्ज भांडवल : भाग भांडवल गुणोत्तराचा निकष त्यास लावण्यापासून सूट देऊ शकेल.

परंतु असे की, या विनियम ४७.५ खाली कर्ज भांडवल:भाग भांडवल गुणोत्तराचा निकष लावण्यापासून सूट देण्यापूर्वी आयोग कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देईल.

## ४८ कर्ज परतफेडीचे वेळापत्रक

४८.१ दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी असलेल्या पारेषण परवानाधाराकाच्या मंजूरी देण्यात आलेल्या सर्व कर्जांच्या परतफेडीचे वेळापत्रक हे कर्जाच्या करारानुसार राहील.

परंतु असे की, दिनांक १ एप्रिल, २००५ पूर्वी आरंभ झालेल्या (पण अद्याप सुरुवात न झालेल्या) मान्यताप्राप्त भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता दिनांक १ एप्रिल, २००५ नंतर नवीन कर्ज (किंवा सध्याच्या कर्जाचा अतिरिक्त हप्ता) घेतले असेल तर, प्रकल्पाची सुरुवात होईपर्यंत घेतलेले असे कोणतेही कर्ज हे, या विनियमखाली व्याजावरील खर्चाची वसूली करण्याच्या प्रयोजनार्थ, अस्तित्वांत असलेले कर्ज म्हणून गणना करण्यांत येईल.

४८.२ वरील विनियम ४७ खाली प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल:भाग भांडवल गुणोत्तरानुसार काढलेल्या कर्ज भांडवलाची परतफेड ही प्रमाणकानुसारी परतफेडीच्या वेळापत्रकानुसार दर वर्षी करावयाची असल्याचे मानण्यांत येईल.

परंतु असे की, प्रमाणकानुसारी परतफेडीची एका वर्षातील रक्कम ही ते कर्ज ज्या स्थिर मत्तेच्या संदर्भात असेल त्यावरील घसा-याच्या रकमेइतकी असेल.

परंतु आणखी असे की, प्रमाणकानुसारी कर्जाची शिल्लक रक्कम ही जर, वरीलप्रमाणे परिगणना करुन काढलेल्या, प्रमाणकानुसारी कर्जाच्या परतफेडीच्या रकमेपेक्षा कमी असेल तर, परतफेडीची रक्कम ही प्रमाणकानुसारी कर्जाच्या शिलक रकमेइतकी असल्याचे मानण्यांत येईल आणि या कर्ज खात्यावर परतफेडीची जादा रक्कम दाखविण्यास परवानगी दिली जाणार नाही.

परंतु असे की, सर्व प्रमाणकानुसारी परतफेडी या प्रत्येक आर्थिक वर्षात ३० सप्टेंबर रोजी करण्यांत येत असल्याचे मानण्यांत येईल.

४८.३ जर प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम ही त्या वर्षात विनियम ५०.४.१ खाली अनुज्ञेय घसा-याच्या रकमेपेक्षा जास्त झाली तर, पारेषण परवानाधारकाला, सदर आर्थिक वर्षाकरिता, परतफेडीची रक्कम व अनुज्ञेय घसा-याच्या रकमेतील फरकाइतक्या रकमेचा अग्रिम, त्या घसा-यापोटी अनुज्ञेय राहील;

परंतु असेही की, घसा-यापोटीच्या अग्रिमाची रक्कम ही सदर आर्थिक वर्षात परतफेड करावयाच्या कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेमधून विनियम ५०.४.१ खालील अनुज्ञेय घसारा वजा केल्यावर उरलेल्या रकमेच्या १/१० इतकी मर्यादीत राहील;

परंतु असेही की, विनियम ४८.१ आणि ४८.२ नुसार परिगणना करुन काढलेली कर्जाच्या परफेडीची रक्कम ही, पारेषण परवानाधारकास मिळालेल्या घसा-यापोटीच्या अग्रिमाने, वाढविण्यात आली असल्याचे मानण्यांत येईल;

परंतु असेही की, कर्जाच्या संपूर्ण रकमेची परतफेड झाल्यानंतर, स्थावर मत्तेची मूळ किंमत ही संचित घसा-याची एकूण रक्कम आणि पारेषण परवानाधारकास मिळालेल्या अग्रिमाची रक्कम यांच्या बेरजेने, कमी करण्यांत येईल आणि त्या मत्तेचे उर्वरित घसारायोग्य मूल्य त्या मत्तेच्या राहिलेल्या उपयोगिता कालावधीत वापरण्यांत येईल.

## 49 EòÉ ÉEòÉVÉÉSÉ ÊxÉEò¹É

४९.१ वार्षिक पारेषण आकारांच्या पूर्ण वसूलीकरिता उपलब्धतेचा लक्षांक

(ए) एसी यंत्रणेकरिता :- ९८%

(बी) एचव्हीडीसी बाय-पोल लिंक्स आणि एचव्हीडीसी बॅक-टु-बॅक स्टेशन्स :- ९५%

टिपणी १:

उपलब्धतेच्या लक्षांकाच्या पातळीच्या खाली असलेल्या वार्षिक पारेषण आकारांची वसूली यथा प्रमाणांत करण्यांत येईल. शूनय उपलब्धतेच्या पातळीवर, कोणतेही पारेषण आकार देय राहणार नाहीत.

टिपणी २ :

उपलब्धतेच्या लक्षांकाची परिगण्ना परिशिष्ट २ मध्ये नमूद करण्यांत आलेल्या पध्दतीप्रमाणे करण्यांत येईल.

## ५० एकूण महसुल गरजेची परिगणना

### ५०.१ भाग भांडवलावरील परतावा

५०.१.१पारेषण परवानाधारकास, मान्यताप्राप्त भाग भांडवलावर प्रती वर्षी १४ टक्के दराने भारतीय रुपयांत परतावा घेण्यास परवानगी देण्यांत येईल.

स्पष्टीकरण १ :- या विनियमांच्या प्रयोजनार्थ, भरणा करण्यांत आलेले भाग भांडवल, अधिमान भाग भांडवल (प्रेफरन्स शेअर कॅपिटल), पूर्ण/ सक्तीची परिवर्तनीय ऋणपत्रे (कन्व्हर्टिबल डिबेंचर्स) (किंवा समान स्वरुपाची इतर वित्तीय पत्रे (इन्स्ट्रुमेंट्स) ), परकीय चलनातील परिवर्तनीय बंधपत्रे(कन्व्हर्टिबल बाँड्स), लाभांश वाटपासाठी किंवा अधिलाभांश भाग(बोनस शेअर)च्या रुपांत भांडवलीकरणासाठी उपलब्ध असलेले भाग अधिमूल्य लेखा (शेअर प्रिमिअम अकाउंट) आणि इतर राखीव निधी, जे पारेषण उद्योगांत गुंतविले आहेत, यांच्या एकूण बेरजेइतके भाग भांडवल राहील. कोणतीही सबसिडीची रक्कम, पुनर्मूल्यन राखीव निधी, विकास राखीव निधी, आकस्मिकता राखीव निधी आणि उपयोगकर्त्यांकडून आलेली वर्गणीची रक्कम, यांचा समावेश भाग भांडवलांत करण्यांत येणार नाही. लेखा पुस्तकांत दाखविण्यांत आलेली पारेषण उद्योगाची स्थगित कर दायित्वे किंवा स्थगित कर मालमत्तेच्या रकमा या भाग भांडवलांत मिळविण्यांत किंवा कमी करण्यांत, जसे असेल तसे, येतील.

स्पष्टीकरण २ :- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, १ एप्रिल, २००५ रोजी असलेल्या भाग भांडवलाची रक्कम खालीलप्रमाणे काढण्यांत येईल-

वरील स्पष्टीकरण १ नुसार आयोगाकडून निश्चित करण्यांत आलेले १ एप्रिल, २००४ चे भाग भांडवल : अधिक

दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी संपणा-या वर्षासाठी, विनियम ४६ आणि विनियम ४७ प्रमाणे गणना केलेल्या, पारेषण उद्योगांत वापरण्यासाठी केलेल्या गुंतवणूकीवरील वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी , भाग भांडवलाचा भाग.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १३१ नुसार हस्तांतरण योजनेखाली घटीत झालेल्या पारेषण परवानाधारकाच्या प्रकरणी, १ एप्रिल, २००४ या तारखेऐवजी त्या हस्तांतरण योजनेची तारीख ही, वरील भाग भांडवल निश्चित करणायासाठी प्रभावी तारीख मानण्यांत येईल.

त्यानंतर प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला भाग भांडवलाच्या रकमेची खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत येईल-

या विनियमांप्रमाणे परिगणना केलेले मागील वर्षाच्या सुरुवातीला असलेले भाग भांडवल; अधिक

मागील आर्थिक वर्षाकरिता, वरील विनियम ४६ आणि विनियम ४७ नुसार परिगणना केलेल्या, पारेषण उद्योगांत वापरण्यासाठी केलेल्या गुंतवणूकीच्या वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी, भाग भांडवलाचा भाग.

५०.१.२ भाग भांडवलावरील परताव्याची खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत येईल-

(ए) वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या भाग भांडवलावर वरील विनियम ५०.१.१ मधील अनुज्ञेय दराने परतावा; अधिक

(बी) अशा आर्थिक वर्षाकरिता, वरील विनियम ४६ व विनियम ४७ नुसार परिगणना केलेल्या, पारेषण उद्योगात वापरण्याकरिता केलेल्या गुंतवणूकीच्या वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी भाग भांडवलाच्या ५० टक्के भागावर वरील विनियम ५०.१.१ मधील अनुज्ञेय दराने परतावा.

५०.१.३ मान्यताप्राप्त पातळीपेक्षा वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चात आलेल्या तफावतीमुळे जर भाग भांडवलावरील परताव्याची कमी किंवा जास्त वसूली झाली तर ती त्याच नियंत्रणाधीन असलेल्या किंवा नसलेल्या घटकांशी जोडण्यांत येईल ज्या घटकांमुळे भांडवली खर्चात तफावत आली असेल.

५०.२ <u>आय-कर</u>

५०.२.१पारेषण परवानाधारकाने त्याच्या पारेषण उद्योगाच्या उत्पन्नावरील आय-कराचा समावेश एकूण महसूलाच्या गरजेत करण्यास अनुमती देण्यांत येईल.

५०.२.२आय-कर अधिनियम, १९६१ वर आधारित त्याच्या पारेषण उद्योगाच्या आय-कर दायित्वा संबंधीच्या अंदाजाचा समावेश पारेषण परवानाधारक वीज दराच्या निश्चितिकरणाच्या अर्जात करेल;

परंतु असे की, आय-कर अधिनियम, १९६१ खालील निर्धारणामुळे आयकर दायित्वांत कांही बदल झाल्यास, तो नियंत्रणाधिन नसलेल्या घटकांमळे झाला असे समजून त्याप्रामाणे हाताळण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, आय-कर अधिनियम, १९६१ मधील तरतूदींमध्ये झालेल्या बदलामुळे आय-कर दायित्वांत बदल झाल्यास तो नियंत्रणाधिन नसलेल्या घटकांमळे झाला असे समजून त्याप्रामाणे हाताळण्यांत येईल.

परंतु आण्खी पुढे असे की, मान्यताप्राप्त पूर्व-अनुमानापेक्षा पारेषण परवानाधारकाच्या उत्पन्नांत बदल झाल्यामूळे जर त्याच्या आय-कर दायित्वात कोणताही बदल झाला तर अशा बदलांचा संबंध ज्या घटकांमुळे उत्पन्नांत बदल झाला त्याच नियंत्रणाधीन असलेल्या किंवा नसलेल्या घटकांशी लावण्यांत येईल व त्याप्रमाणे हाताळण्यांत येईल.

५०.२.३कर-सवलतीचे मिळणारे लाभ, आंतर-राज्य पारेषण यंत्रणेवरील किंवा तिच्या काही भागावरील सामावून न घेतले गेलेले तोटे किंवा सामावून न घेतला गेलेला घसारा यांच्याकरिता जमा रकमा, यांचा विचार पारेषण उद्योगाच्या आय-कर दायित्वाची परिगणना करताना करण्यांत येईल.

५०.३ <u>कर्ज भांडवलावरील व्याज</u>

५०.३.१ वरील विनियम ४८ नुसार कर्ज परतफेडीच्या वेळापत्रक व मान्यताप्राप्त व्याज दराच्या आधारे, ३१ मार्च, २००५ रोजी असलेल्या सर्व मान्यताप्राप्त कर्जांच्या व्याजावरील खर्च वसूल करण्यास पारेषण परवानाधारकास अनुमती असेल.

५०.३.२ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या मान्यताप्राप्त भांडवली खर्चावरील प्रकल्पांच्या कर्ज भांडवलावर, व त्या तारखेस किंवा त्यानंतर स्थिर मत्तेमध्ये घातलेली मान्यताप्राप्त भर आणि मान्यताप्राप्त स्थिर मत्तांची खरेदी, यावर खालील अटी व शर्तीवर व्याज दर वसूल करण्यास पारेषण परवानाधारकास अनुमती राहीलः-

(ए) आयोगाने गुंतवणूक योजनेत मान्यता दिल्यान्सार व्याज-दर राहील.

(बी) अशा भांडवली खर्चाच्या प्रकल्पांसात्ठी/ स्थिर मत्तांसाठी प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल हे आधार मूल्य राहील.

(सी) या विनियमांच्या विनियम ४८ नुसार प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलाची परतफेड प्रमाणकानुसारी परतफेडीच्या वेळापत्रकाप्रमाणे करावयाची आहे, असे मानण्यांत येईल.

५०.३.३भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या कर्ज घेण्यासाठीचा खर्च यासंबधीचे लेखा मानक विवरणपत्र (एएस-१६) मधील तरतूदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, कर्ज भांडवलावरील व्याज काढताना, लागू राहतील.

५०.३.४ व्याजावर कर, बांधिलकी (कमिटमेंट) आकार, वित्तीय आकार आणि परकीय चलनातील कर्जावर परकीय चलन विनिमयांतील कोणत्याही बदलामुळे होणारा फरक या बाबींना, पारेषण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत व्याजावरील खर्च म्हणून जितक्या प्रमाणांत संबोधण्यांत येत असेल त्या प्रमाणांत, आयोग या बाबींना अनुमती देईल.

५०.४ <u>घसा-यापोटीच्या अग्रिमासह घसारा</u>

५०.४.१ पारेषण उद्योगांतील स्थिर मत्तेच्या मूल्यावरील, खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत आलेला घसारा वसूल करण्यास पारेषण परवानाधारकास अनुमती देण्यांत येईलः-

(ए) प्रकल्पाचा/मत्तेचा आयोगाने मान्यता दिलेला मूळ खर्च हे घसा-याची परिगणना करण्यासाठी आधारभूत मूल्य असेल.

(बी) या विनियमासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या दराने घसा-याची परिगणना दर वर्षी स्थिर पध्दतीने (स्ट्रेट लाईन मेथड) करण्यांत येईल;

परंतु असे की, मत्तेच्या अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या १० टक्के मत्तेचा उरलेला उपयोगिता काल म्हणून मानण्यात येईल आणि मत्तेच्या अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या जास्तीत जास्त ९० टक्केपर्यंत घसारा मंजूर करण्यांत येईल;

परंतु आणखी असे की, जमिनीवर घसारा काढण्याची परवानगी देण्यांत येणार नाही व तिच्यावरील खर्च हा अनुज्ञेय भांडवली खर्चातून घसा-याची परिगणना करण्यासाठी वगळण्यांत येईल;

परंतु असेही की, भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या घसा-या लेख्याबाबतचे लेखा मानक विवरणपत्र (एएस-६) मधील तरतूदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, या विनियमांखाली घसा-याची परिगणाना करण्यासाठी लागू राहतील.

५०.४.२ घसा-याशिवाय, पारेषण परवाधारकाला वरील विनियम ४८.३ नुसार परिगणना केलेला, घसा-यापोटी अग्रिम मिळण्याचा हक्क असेल.

५०.४.३ पारेषण परवानाधारकास आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपर्यंत अमूर्त मत्ता निवारण निधी वसूल करण्यास मुभा दिली जाईल.

स्पष्टीकरण- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “अमूर्त मत्ता” म्हणजे रोखीत करण्यांत आलेला कामकाज-पूर्व आणि विकासाचा खर्च आणि जो पारेषण परवानाधारकाच्या भांडवली लेख्यांत खर्च टाकल्याची नोंद झालेली आहे व जो पारेषण उद्योग विकसित करित असताना योग्य खर्च म्हणून करावा लागला आहे व त्यांत ख्याती-मूल्य (गुड-विल) म्हणून अदा केलेल्या किंवा ताळेबंदांत दाखविल्या गेलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश असणार नाही.

५०.५ <u>कामकाज व देखभाल खर्च</u>

५०.५.१पारेषण उद्योगाशी संबंधित असलेला कामकाज व देखभालीवरील सर्व वाजवी व समर्थनीय खर्च वसुल करण्यास पारेषण परवानाधारकास परवानगी देण्यांत येईल;

परंतु असे की, पारेषण परवानाधारक वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत अशा सर्व कामकाज व देखभालीवरील खर्चाचे पूर्व-अनुमान सादर करेल.

परंतु आणखी असे की, पूर्व-अनुमान हे मागील कामगिरी आणि/ किंवा कामकाजाचे निकष यावर आधारित असतील आणि त्याचे स्पष्टीकरण देणारी व त्याच्या समर्थनार्थ सविस्तर आकडेवारी देण्यांत आलेली असेल.

परंतु आणखी असे की, पारेषण उद्योगाशी संबधित कामकाज व देखभाल खर्चांना मंजूरी देण्यासाठी आयोग यथोचित निकष स्वीकारेल.

स्पष्टीकरणः- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “कामकाज व देखभाल खर्चा”मध्ये खालील बाबींचा समावेश असेलः-

(ए) बोनस व भविष्य निर्वाह निधीस वर्गणी, व कोणत्याही सध्या प्रचलित कायद्याखाली किंवा आयोगाने मान्य केलेल्या कोणत्याही योजनेखाली द्यावयाचे निवृत्तवेतन आणि उपदान यासहीत कर्मचा-यांवरील खर्च;

(बी) दुरुस्ती व देखभाल;

(सी) भाडे, दर व आय-कराशिवायचे इतर कर;

(डी) विधी शुल्क;

(इ) बुडीत कर्जासाठी तरतूद;

(एफ) लेखापरिक्षकांची फी;

(जी) शिकाऊ उमेदवार व प्रशिक्षण योजनांवरील खर्च;

(एच) वरील बाबींमध्ये व या विनियमांत इतरत्र नसलेला परंतु पारेषण उद्योगाशी संबंधित असलेला खर्च जो आय-कर अधिनियम, १९६१ खाली उत्पन्नाची परिगणना करताना वजावट म्हणून अनुज्ञेय आहे.

५०.६ खेळते भांडवलावर व्याज

५०.६.१ आर्थिक वर्षातील, खालीलप्रमाणे परिगणना केलेल्या अंदाजित खेळते भांडवलाच्या पातळीवर, पारेषण परवानाधारकाला व्याज अनुज्ञेय राहीलः-

(ए) आर्थिक वर्षातील कामकाज व देखभालीच्या खर्चाच्या १/१२ रक्कम; अधिक

(बी) आर्थिक वर्षाच्या प्रत्येक महिन्याच्या शेवटी स्टोअर मधील सामान, साहित्य व पुरवठ्याच्या वस्तू व हातात शिल्लक असलेल्या इंधनाच्या पुस्तकांतील किंमतीच्या १/१२; अधिक

(सी) प्रचलित दराने अपेक्षित पारेषण आकारांची दीड-महिन्यांतील महसूलाइतकी रक्कम; वजा

(डी) पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून सुरक्षा अनामत म्हणून घेतलेल्या,असल्यास, अशा रकमा.

५०.६.२ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर केलेल्या तारखेस असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अल्प-कालीन मूळ व्याज दराने व्याज अनुज्ञेय राहील.

५०.६.३वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर केलेल्या तारखेस असलेल्या बँक दराने पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून घेतलेल्या सुरक्षा अनामतीवर व्याज देय राहील.

५०.७ आकस्मिकता निधीस वर्गणी

५०.७.१ जर पारेषण परवानाधारकाने आकस्मिकता निधीसाठी विनियोजन केले असेल तर,एकूण महसूलाच्या गरजेची परिगणना करताना स्थिर मत्तांच्या मूळ किंमतीच्या ०.२५ टक्क्यांपेक्षा कमी नसेल व ०.५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम अशा विनियोजनासाठी अनुज्ञेय राहील;

परंतु असे की, जेव्हा या आकस्मिकता निधीची रक्कम स्थिर मत्तांच्या मूळ किंमतीच्या पांच (५) टक्क्याहून अधिक होईल तेव्हा ही निधीची रक्कम वरील कमाल रकमेपेक्षा जास्त होणार असल्यामुळे अशा विनियोजनास परवानगी देण्यांत येणार नाही;

परंतु असे की, अशा रितीने विनियोजन केलेली रक्कम भारतीय न्यास अधिनियम, १८८२ खाली प्राधिकृत करण्यांत आलेल्या रोख्यांमध्ये आर्थिक वर्ष संपल्या नंतर सहा महिन्यांच्या आंत गुंतविण्यात येईल.

५०.७.२ परवान्याच्या कालावधीत आकस्मिकता निधीतून रक्कम काढण्यांत येणार नाही, फक्त आयोगाने परवानगी दिलेल्या खर्चाच्या बाबी वगळून जसे की-

(ए) व्यवस्थापन टाळू न शकणा-या अशा अपघात, संप किंवा परिस्थितीमुळे होणारे खर्च किंवा नफ्याची हानि;

(बी) नेहमीचा देखभाल व नवीकरणावरील खर्च वगळता, संच (प्लँट) किंवा कामे बदली करण्यावर अथवा काढून टाकण्यावर झालेला खर्च;

(सी) सध्या प्रचलित असलेल्या कोणत्याही कायद्याखाली द्यावी लागणारी नुकसानभरपाई जिच्यासाठी दुसरी कोणतीही अन्य तरतूद करण्यांत आलेली नाही.

परंतु असे की, परवानेधारकाला विमा कंपन्यांकडून मिळालेल्या अन्य कोणत्याही नुकसानभरपाईच्या रकमांचे योग्यरित्या समायोजन केल्यावरच, आकस्मिक निधीमधून काढावयाच्या अशा रकमांची परिगणना करण्यात येईल.

## ५१ वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

५१.१ पारेषण परवानाधारकाचे वार्षिक पारेषण आकार निश्चित करताना पारेषण उद्योगाशी संबंधित आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दरा व्यतिरिक्तच्या उत्पन्नाची रक्कम एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल;

परंतु असे की, आयोग वेळोवेळी विहीत करेल त्या नमुन्यामध्ये पारेषण परवानाधारक त्याच्या वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या पूर्व-अनुमानाचा संपूर्ण तपशील आयोगास सादर करेल.

## ५२. इतर उद्योगापासूनचे उत्पन्न

५२.१ जर पारेषण परवानाधारक कोणताही इतर उद्योग करीत असेल तर, अशा इतर उद्योगापासूनच्या उत्पन्नातून, अशा इतर उद्योगाशी संबंधित सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च कमी करुन राहिलेल्या उत्पन्नाच्या एक-तृतियांश उत्पन्न, पारेषण परवानाधारकाच्या वार्षिक पारेषण आकाराची परिगणना करताना एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल;

परंतु असे की, पारेषण परवानाधारक त्याचा पारेषण उद्योग व इतर उद्योग यांत संयुक्त आणि समान असलेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चाची विभागणी वाजवी आधारावर करेल आणि एक वाटप विवरणपत्र आयोगास वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सदर करताना त्यासोबत पाठवेल;

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा इतर उद्योगाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चाची एकूण बेरीज ही अशा इतर उद्योगाच्या उत्पन्नापेक्षा जास्त होईल तेव्हा किंवा इतर कोणत्याही कारणाकरिता, अशा इतर उद्योगामुळे पारेषण परवानाधारकाच्या एकूण महसूलाच्या गरजेत कोणतीही रक्कम मिळविण्यास अनुमती देण्यांत येणार नाही.

## ५३. वार्षिक पारेषण आकारांचे वाटप

५३.१ पारेषण परवानाधारकाच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेच्या एकूण महसूलाच्या गरजेत पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याचा हिस्सा राहील व या हिश्श्याचे प्रमाण हे, प्रत्येक पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या पारेषण क्षमता हक्कांचे आंतर-राज्य पारेषण यंत्रणेने वाटलेल्या एकूण पारेषाण क्षमता हक्कांशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतके, राहील;

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (३) अन्वये काढण्यांत आलेल्या आदेशांत आयोग विहीत करेल त्याप्रमाणे, पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने द्यावयाच्या आकारांमध्ये दाब, अंतर, दिशा, विजेचे परिमाण आणि विजेच्या वापराची वेळ यासारख्या घटकांचा विचार करण्यांत येईल;

परंतु असे की, आयोग निदेश देईल तो पारेषण यंत्रणा उपयोगकर्ता किंवा अशा उपयोगकर्त्यांचा वर्ग सोडून, पारेषण परवानाधारकाकडून या आकारांची परिगणना दैनिक तत्त्वांवर करण्यांत येईल आणि देयक दर महिन्यास तयार करण्यांत येईल,

५३.२ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने द्यावयाच्या वार्षिक पारेषण आकारांची परिगणना, खालील सुत्रानुसार, करण्यांत येईलः-

ATC = [ ARR – NTI – OI ] X [ CL / SCL ]

जेथे -

ATC = वार्षिक पारेषण आकार

ARR = पारेषण परवानाधारकाची एकूण महसुलाची गरज , आयोगाने मान्यता दिलेले सर्व अनुज्ञेय खर्च आणि भाग भांडवलावरील परतावा धरुन

NTI = वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाची मान्यताप्राप्त पातळी

OI = इतर उद्योगापासूनाच्या उत्पन्नाची मान्यताप्राप्त पातळी

CL = पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यास वाटप केलेले पारेषण क्षमता हक्क

SCL = सर्व पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्यांना वाटप करण्यांत आलेल्या पारेषण क्षमता हक्कांची बेरीज.

## ५४ पारेषण तोटे

५४.१ पारेषण यंत्रणा उपयोगकर्त्याने आंतर-राज्य पारेषण यंत्रणेचा वापर ज्या प्रमाणांत केला असेल त्या प्रमाणांत त्याला, राज्य भार पारेषण केंद्राने निश्चित केलेले व आयोगाने मान्यता दिलेले पारेषण परवानाधारकाच्या पारेषाण यंत्रणेतील उर्जा तोटे, सहन करावे लागतील.

परंतु असे की, पारेषण परवानाधारकाला लागू असलेल्या बहु-वर्षीय वीज दर रचनेचा एक भाग म्हणून विनियम १६ नुसार पारेषण तोट्यांसाठी एक मार्गदर्शिका आयोग ठरवून देईल.

परंतु असे की, राज्य भार पारेषण केंद्राने निश्चित केलेल्या प्रत्यक्ष पारेषण हानीची पातळी आणि मान्यताप्राप्त पातळी यांत कोणतीही तफावत उद्‌भवली तर ती, विनियम १८ किंवा विनियम १९

मध्ये, जसे असेल तसे, नमूद करण्यांत आलेल्या पध्दतीनुसार, वार्षिक कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून, हाताळण्यांत येईल;

परंतु असे की, चोरी, भूरटी चोरी, पारेषण केलेल्या विजेसाठी मीटर्स बसविण्यांत किंवा देयके तयार करण्यांत आलेल्या अपयशामुळे झालेल्या उर्जा हानीची, या विनियमाखाली, वसूली करण्यास पारेषण परवानाधारकास परवानगी देण्यांत येणार नाही.

**भाग-जी : वहन**

## ५५ लेख्यांचे विभक्तीकरण

५५.१ प्रत्येक वितरण परवानाधारक खालील वीज दराच्या निश्चितीकरणासाठी वेगवेगळे अर्ज करेलः

(ए) विजेच्या वहनासाठी;

(बी) विजेच्या किरकोळ विक्रीसाठी.

परंतु असे की, प्रत्येक वितरण परवानाधारक वितरण उद्योगासाठी वेगळे अभिलेखे ठेवेल आणि एक वाटप विवरणपत्र तयार करेल ज्यामुळे वितरण परवानाधारकाने केलेल्या प्रत्येक अर्जाच्या संदर्भात वीज दर निश्चित करणे आयोगास शक्य होईल.

## ५६. विनियम कोणास लागू असतील

५६.१ वितरण खुला प्रवेश विनियमांनुसार वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये ज्याला खुला प्रवेश मिळाला आहे अशा वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याने केलेल्या विजेच्या वहनासाठी द्यावयाच्या विजेच्या दराच्या निश्चितीकरणास या भागांत असलेले विनियम लागू होतील.

परंतु तथापि असे की, जो वितरण यंत्रणा उपयोगकर्ता पारेषण यंत्रणेशी थेट जोडलेला असेल त्याला या भागाखाली कोणताही दर द्यावा लागणार नाही.

## ५७. वीज दराचे भाग

५७.१ वितरण परवानाधारकाच्या वितरण उद्योगासाठीच्या आर्थिक वर्षाकरिता, या विनियमांच्या विनियम ६६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वितरण परवानाधारकाच्या वितरण उद्योगासाठीच्या एकूण महसूलाच्या गरजेतून वीज दरा व्यतिरिक्त मिळाणारे उत्पन्न व इतर उद्योगापासून मिळणारे उत्पन्न वजा केल्यावर राहिलेली रक्कम विजेच्या वहन आकारांतून वसूल करता येईल व त्यांत खालील बाबी असतीलः

एकूण महसूलाची गरजः

(ए) भाग भांडवलावरील परतावा;

(बी) आय-कर;

(सी) कर्ज भांडवलावरील व्याज;

(डी) घसा-या पोटीचा अग्रिम आणि आणि अमूर्त मालमत्ता निवारण निधीसह घसारा;

(इ) कामकाज व देखभाल खर्च; आणि

(एफ) खेळते भांडवलावरील व ग्राहक आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याच्या ठेवींवर व्याज; आणि

(जी) आकस्मिकता निधीसाठी वर्गणी

वहन आकार = वरील प्रमाणे, एकूण महसूलाची गरज वजाः

(एच) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न; आणि

(आय) इतर उद्योगापासूनचे उत्पन्न, या विनियमांत विहीत केलेल्या मर्यादेपर्यंत.

५७.२ या विनियमाच्या भाग-बी नुसार वितरण परवानाधारकाने वीज दराच्या निश्चितीकरणासाठी केलेल्या अर्जाच्या आधारे वितरण परवानाधारकाचे वहन आकार आयोगातर्फे निश्चित करण्यांत येतील.

## ५८ बहु-वर्षीय वीज दर

५८.१ आयोगाने केलेले अपवाद वगळून, या विनियमाच्या भाग-सी मध्ये असलेले विनियम राज्यांतील सर्व वितरण परवानाधारकांना १ एप्रिल, २००६ पासून लागू होतील.

## ५९ गुंतवणूक योजना

५९.१ वितरण परवानाधारक त्याच्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पांच्या पूर्ण तपशीलासह त्याची गुंतवणूक योजना वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत किंवा स्वतंत्रपणे, आयोग निदेश देईल तेव्हा सादर करेल;

परंतु असे की, गुंतवणूक योजना ही एक बदलती योजना राहील व तिचा कालावधी हा, अशा अर्जाचा भाग म्हणून सादर करण्यांत येत असलेले पूर्व-अनुमान/ अंदाज ज्या कालावधीसाठी असतील त्या कालावधीशी जुळणारा असेल.

५९.२ वितरण परवानाधारकाची वितरण यंत्रणा मजबूत करण्यासाठी व वाढ करण्यासाठी त्यांत करावयाच्या गुंतवणूकीसाठी गुंतवणूक योजना कमीत कमी खर्चाची असेल.

५९.३ गुंतवणूक योजनेत रुपये दहा (१०) कोटीहून अधिक रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या योजनांचा समावेश असेल आणि आयोग वेळोवेळी विहीत करेल त्या नमून्यामधे योजना तयार करण्यांत येईल.

५९.४ गुंतवणूक योजनेसोबत प्रस्तावित गुंतवणुकीची गरज, विचारांत घेतलेले इतर पर्याय, खर्च/ लाभांचे विश्लेषण, आणि वहन आकारांवर परिणम करु शकणा-या इतर घटकांची माहिती, तपशील व कागदपत्रे सादर करण्यांत येतील.

५९.५ वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या गुंतवणूक योजनेचा आयोग आढावा, प्रस्तावित खर्चामागील योग्यायोग्यता ठरवून व त्याचा वीज दरावर होणारा अपेक्षित परिणाम लक्षांत घेऊन, घेईल व त्यानंतर आयोग-

(ए) वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या गुंतवणूक योजनेला आयोग तत्वतः मान्यता देताना त्यांत आयोगास उचित वाटतील असे बदल करेल किंवा शर्ती घालेल किंवाः

(बी) वितरण परवानाधारकाने सादर केलेली गुंतवणूक योजना नामंजूर करेल व आयोगास आवश्यक वाटतील अशा घटकांचा विचार करून नवीन गुंतवणूक योजना सादर करण्यास आयोग सांगेल.

५९.६ वितरण परवानाधारक वीज दर निश्चितीकरणासाठी किंवा वार्षिक कामगिरीचे पुर्नविलोकनकरण्यासाठी अर्ज सादर करताना, जसे असेल तसे, भांडवली खर्चाच्या प्रकल्पांमध्ये झालेल्या प्रगतीची माहिती व त्यासोबत या माहितीची पडताळणी करण्यासाठी आयोगास वी असलेली

५९.७ इतर माहिती, तपशील व कागदपत्रेही पाठवेल.

## ६० भांडवली खर्च

६०.१ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या रुपये दहा (१०) कोटीपेक्षा जास्त भांडवली खर्च असलेल्या प्रकल्पाचा त्या आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च निश्चित करण्यासाठी वितरण परवानाधारकाची मान्यताप्राप्त गुंतवणूक योजना आधार राहील.

६०.२ प्रकल्पाच्या आरंभापासून ते तो प्रकल्प सुरु होईपर्यंत, प्रत्येक भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, एकूण वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चाची बेरीज त्या प्रकल्पाची मूळ किंमत राहील.

परंतु असे की, प्रकल्पाची सुरुवात झाल्यानंतर, भांडवली स्वरुपाचा झालेला अतिरिक्त वाजवी खर्च प्रकल्पाच्या मूळ किंमतीत समाविष्ट करण्यास, वितरण परवानाधारकाने तसा अर्ज केल्यास, आयोग परवानगी देईल;

६०.३ गूंतवणूक योजनेचा एक भाग म्हणून मान्यता दिलेल्या अंदाजित मूळ खर्चापेक्षा जर भांडवली खर्चाच्या प्रकल्पावर झालेला प्रत्यक्ष खर्च जास्त झाला असेल किंवा जर वितरण परवानधारकाची अशी खात्री असली की प्रत्यक्ष होणारा खर्च हा अंदाजापेक्षा अधिक होईल तर, वितरण परवानधारक प्रकल्पाच्या मूळ अंदाजित खर्चाहून तफावत असलेल्या खर्चास मान्यता देण्यासाठी, वार्षिक कामगितीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून आयोगकडे अर्ज करेल;

परंतु असे की, असा खर्च हा वाजवी असून नियंत्राणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेला आहे अशी आयोगाची खात्री पटली तर, योग्य छाननीनंतर, आयोग, वरील विनियम १८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीस अनुसरुन असा वाढीव खर्च हाताळण्यास अनुमती देईल.

६०.४ जर भांडवली खर्चाच्या प्रकल्पावरील प्रत्यक्ष खर्च हा मान्यता देण्यांत आलेल्या अंदाजित मूळ खर्चापेक्षा कमी असेल आणि खर्चातील बचत ही नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे झालेली असेल तर, आयोग, योग्य छाननीनंतर, अशा प्रकल्पाच्या बांधकामाच्या कालावधीत, परिणामस्वरुप कर्ज भांडवलावरील व्याजांत होणा-या बचतीस, वरील विनियम १९ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीस अनुसरून मान्यता देईल.

परंतु असे की, जर भांडवली खर्चातील बचत ही नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेली असेल तर ती वरील विनियम १८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार हाताळण्यांत येईल.

६०.५ या विनियम ६० मध्ये काहीही असले तरी, रुपये दहा (१०) कोटी पेक्षा अधिक खर्च नसलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च आणि प्रकल्पाचा मूळ किंमत निश्चित करण्याकरिता, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून, वितरण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत नोंद झालेला प्रत्यक्ष खर्च हा आधार राहील,

६०.६ या विनियम ६० मध्ये काहीही असले तरी, १ एप्रिल, २००५ पूर्वी मंजूर केलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च आणि प्रकल्पाचा मूळ किंमत निश्चित करण्याकरिता, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून, वितरण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत नोंद झालेला प्रत्यक्ष खर्च हा आधार राहील,

६०.७ भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या स्थिर मत्तेच्या लेख्यांसंबंधित असलेले लेखा मानक विवरणपत्र (एएस-१०) हे, या विनियमांशी विसंगत नसेल तितक्या मर्यादिपर्यंत, भांडवली खर्च प्रकल्पाची मूळ किंमत आणि/किंवा भांडावलीकृत केलेल्या स्थिर मत्तेची मूळ किंमत निश्चित करण्यासाठी लागू राहील.

६०.८ वार्षिक अनुज्ञेय भाडवली खर्च, या विनियमाच्या प्रयोजनार्थ, अशा आर्थिक वर्षांत समानपणे झाला आहे, असे मानण्यांत येईल.

६०.९ सुरुवातीचे सुटे भाग भांडवलीकृत केल्यामुळे भांडवली खर्चाच्या प्रकल्पाच्या मूळ खर्चाच्या १.५ टक्के अतिरिक्त रक्कम मूळ किंमतीत वाढविण्यास परवानगी देण्यात येईल.

६०.१० भारतीय सनदी लेखपाल संस्थेच्या परकीय चलनाच्या दरांतील बदलाच्या परिणामासंदर्भात असलेले लेखा मानक विवरणपत्र (एएस-११) नुसार, भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता घेतलेलया परकीय चलनातील कर्जावर कोणत्याही परकीय चलनांतील दरांत होणा-या बदलांचे परिणाम हाताळण्यांत येतील.

परंतु असे की, या विनियमांच्या विनियम ६१ व विनियम ६२ प्रमाणे निश्चित करण्यांत आलेल्या प्रत्यक्ष किंवा प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलाचा समावेश वरील बाबीमध्ये करण्याचा विचार करण्यांत येईल.

६०.११ वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी ग्राहकांनी आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याने कामांसाठी भरलेली वर्गणीची कोणतीही रक्कम प्रकल्पाच्या अशा मूळ खर्चातून , या विनियमाखाली कर्ज भांडवल आणि भाग भांडवलाची परिगणना करण्यासाठी, वजा करण्यांत येईल.

परंतु असे की, पुढील विनियम खालील ६३.४ नुसार घसारा काढण्यासाठी, अशी कोणतीही वर्गणी वजा करण्यापूर्वी असलेली प्रकल्पाच्या मूळ खर्चाची रक्कम विचारांत घेण्यांत येईल.

## ६१ कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर

६१.१ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पावर आणि/ किंवा अशा तारखेस किंवा त्यानंतर खरेदी केलेल्या स्थिर मत्तेवर आर्थिक वर्षांत केलेला कोणताही भांडवली खर्च हा, अशा आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चावर लागू करावयाच्या ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल : भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे , असे मानण्यांत येईल.

६१.२ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता भांडवलीकृत केलेली कोणतीही मत्ता आणि/ किंवा त्या दिवशी किंवा त्यानंतर खरेदी केलेली कोणतीही स्थिर मत्ता यासाठी झालेला खर्च हा, या प्रकल्पाची किंवा मत्तेची मूळ किंमतीवर लावावयाच्या, ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल : भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे, असे मानण्यांत येईल.

६१.३ सुरुवात झाल्याच्या तारखेनंतर प्रकल्पाच्या / स्थिर मत्तेच्या मूळ किंमतीत झालेल्या मान्यताप्राप्त बदलासाठी करण्यांत आलेला खर्च हा, प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे , असे मानण्यांत येईल.

६१.४ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या व कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर ७०: ३० पेक्षा कमी असलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाची आर्थिक समाप्ती जर या विनियमाच्या अधिसूचनेच्या तारखेपूर्वी झालेली असेल तर वितरण परवानाधारक त्यास विनियम ६१.१ मधून सूट देण्यासाठी, त्यासंबंधीच्या कारणांसह, आयोगाकडे अर्ज करेल;

परंतु असे की, जर आयोगाची खात्री पटली की विनियम ६१.१ लावल्यामुळे प्रकल्प सुरू होण्याच्या वेळापत्रकावर व त्यामुळे ग्राहकांना पुरवावयाच्या विजेच्या खर्चावर आणि/ किंवा परिमाणावर विपरित परिणाम होऊ शकेल तर, आयोग, अशा भांडवली खर्चाच्या प्रकल्पास प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर लावण्यापासून सूट देईल.

६१.५ जर अर्जदार तो, बाजारपेठेतील अडचणी, कॉर्पोरेट/समूहास कर्ज देणा-या कर्जदारांच्या कर्जाबाबतच्या निकषामुळे किंवा तत्सम कारणांमुळे, विहीत करण्यांत आलेल्या मर्यादेइतके कर्ज-भांडवल उभे करु शकत नसल्याचे वाजवीरित्या सिध्द करु शकला तर, आयोग या विनियम ६१ मधे विहीत करण्यांत आलेल्या कर्ज भांडवलःभाग भांडवल गुणोत्तराचा निकष त्यास लावण्यापासून सूट देऊ शकेल;

परंतु असे की, या विनियम ६१.५ खाली कर्ज भांडवलःभाग भांडवल गुणोत्तराचा निकष लावण्यापासून सूट देण्यापूर्वी आयोग कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देईल.

## ६२. कर्ज परतफेडीचे वेळापत्रक

६२.१ दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी असलेल्या वितरण परवानाधाराकाच्या मंजूरी देण्यात आलेल्या सर्व कर्जांच्या परतफेडीचे वेळापत्रक हे कर्जाच्या करारानुसार राहील;

परंतु असे की, दिनांक १ एप्रिल, २००५ पूर्वी आरंभ झालेल्या (पण अद्याप सुरुवात न झालेल्या) मान्यताप्राप्त भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता दिनांक १ एप्रिल, २००५ नंतर नवीन कर्ज (किंवा सध्याच्या कर्जाचा अतिरिक्त हप्ता) घेतले असेल तर, प्रकल्पाची सुरुवात होईपर्यंत घेतलेले असे कोणतेही कर्ज हे, या विनियमखाली व्याजावरील खर्चाची वसूली करण्याच्या प्रयोजनार्थ, अस्तित्वांत असलेले कर्ज म्हणून गणना करण्यांत येईल.

६२.२ वरील विनियम ६१ खाली प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल:भाग भांडवल गुणोत्तरानुसार काढलेल्या कर्ज भांडवलाची परतफेड ही प्रमाणकानुसारी परतफेडीच्या वेळापत्रकानुसार दर वर्षी करावयाची असल्याचे मानण्यांत येईल;

परंतु असे की, प्रमाणकानुसारी परतफेडीची एका वर्षातील रक्कम ही ते कर्ज ज्या स्थिर मत्तेच्या संदर्भात असेल त्यावरील घसा-याच्या रकमेइतकी असेल;

परंतु आणखी असे की, प्रमाणकानुसारी कर्जाची शिल्लक रक्कम ही जर, वरीलप्रमाणे परिगणना करुन काढलेल्या, प्रमाणकानुसारी कर्जाच्या परतफेडीच्या रकमेपेक्षा कमी असेल तर, परतफेडीची रक्कम ही प्रमाणकानुसारी कर्जाच्या शिलक रकमेइतकी असल्याचे मानण्यांत येईल आणि या कर्ज खात्यावर परतफेडीची जादा रक्कम दाखविण्यास परवानगी दिली जाणार नाही;

परंतु असे की, सर्व प्रमाणकानुसारी परतफेडी या प्रत्येक आर्थिक वर्षात ३० सप्टेंबर रोजी करण्यांत येत असल्याचे मानण्यांत येईल.

६२.३ प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम ही त्या वर्षात विनियम ६३.४.१ खाली अनुज्ञेय घसा-याच्या रकमेपेक्षा जास्त झाली तर, वितरण परवानाधारकला, सदर आर्थिक वर्षाकरिता, परतफेडीची रक्कम व अनुज्ञेय घसा-याच्या रकमेतील फरकाइतक्या रकमेचा अग्रिम, त्या घसा-यापोटी अनुज्ञेय राहील.

परंतु असेही की, घसा-यापोटीच्या अग्रिमाची रक्कम ही सदर आर्थिक वर्षात परतफेड करावयाच्या कर्जाच्या मूळ रकमेतून विनियम ६३.४.१ खालील अनुज्ञेय घसारा वजा केल्यावर उरलेल्या रकमेच्या १/१० इतकी मर्यादीत राहील.

परंतु असेही की, विनियम ६२.१ आणि ६२.२ नुसार परिगणना करुन काढलेली कर्जाच्या परफेडीची रक्कम ही, वितरण परवानाधारकास मिळालेल्या घसा-यापोटीच्या अग्रिमाने, वाढविण्यात आली असल्याचे मानण्यांत येईल.

परंतु असेही की, कर्जाच्या संपूर्ण रकमेची परतफेड झाल्यानंतर, स्थावर मत्तेची मूळ किंमत ही संचित घसा-याची एकूण रक्कम आणि वितरण परवानाधारकास मिळालेल्या अग्रिमाची रक्कम यांच्या बेरजेने, कमी करण्यांत येईल आणि त्या मत्तेचे उर्वरित घसा-यायोग्य मूल्य त्या मत्तेच्या राहिलेल्या उपयोगिता कालावधीत वापरण्यांत येईल.

## ६३. एकूण महसुल गरजेची परिगणना

### ६३.१ भाग भांडवलावरील परतावा

६३.१.१ वितरण परवानाधारकास, मान्यताप्राप्त भाग भांडवलावर प्रती वर्षी १६ टक्के दराने परतावा घेण्यास परवानगी देण्यांत येईलः

स्पष्टीकरण १ :- या विनियमांच्या प्रयोजनार्थ, भरणा करण्यांत आलेले भाग भांडवल, अधिमान भाग भांडवल (प्रेफरन्स शेअर कॅपिटल), पूर्ण / सक्तीची परिवर्तनीय ऋणपत्रे (कन्व्हर्टिबल डिबेंचर्स) (किंवा समान स्वरुपाची इतर वित्तीय पत्रे (इन्स्ट्रुमेंट्स) ), परकीय चलनातील परिवर्तनीय बंधपत्रे (कन्व्हर्टिबल बाँड्स), लाभांश वाटपासाठी किंवा अधिलाभांश भाग(बोनस शेअर)च्या रुपांत भांडवलीकरणासाठी उपलब्ध असलेले भाग अधिमूल्य लेखा (शेअर प्रिमिअम अकाउंट) आणि इतर राखीव निधी, जे वितरण उद्योगांत गुंतविले आहेत, यांच्या एकूण बेरजेइतके भाग भांडवल राहील. कोणतीही सबसिडीची रक्कम, पुर्नमूल्यन राखीव निधी, विकास राखीव निधी, आकस्मिकता राखीव निधी आणि उपयोगकर्त्यांकडून आलेली वर्गणीची रक्कम, यांचा समावेश भाग भांडवलांत करण्यांत येणार नाही. लेखा पुस्तकांत दाखविण्यांत आलेली वितरण उद्योगाची स्थगित कर दायित्वे किंवा स्थगित कर मालमत्तेच्या रकमा या भाग भांडवलांत मिळविण्यांत किंवा कमी करण्यांत, जसे असेल तसे येतील.

स्पष्टीकरण २ :- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, १ एप्रिल, २००५ रोजी असलेल्या भाग भांडवलाची रक्कम खालीलप्रमाणे काढण्यांत येईल-

> स्पष्टीकरण १ नुसार आयोगाकडून निश्चित करण्यांत आलेले १ एप्रिल, २००४ चे भाग भांडवल : अधिक
>
> दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी संपणा-या वर्षासाठी, विनियम ६० व विनियम ६१ प्रमाणे गणना केलेल्या, वितरण उद्योगासाठी वापरण्याकरिता केलेल्या गूंतवणूकीच्या वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी , भाग भांडवलाचा भाग.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १३१ नुसार हस्तांतरण योजनेखाली घटीत झालेल्या वितरण परवानाधारकाच्या प्रकरणी, १ एप्रिल, २००४ या तारखेऐवजी त्या हस्तांतरण योजनेची तारीख ही, वरील भाग भांडवल निश्चित करणायासाठी प्रभावी तारीख मानण्यांत येईल.

त्यानंतर प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला भाग भांडवलाच्या रकमेची खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत येईल-

> या विनियमांप्रमाणे परिगणना केलेले मागील वर्षाच्या सुरुवातीला असलेले भाग भांडवल; अधिक

मागील आर्थिक वर्षाकरिता, वरील विनियम ६० व विनियम ६१ नुसार परिगणना केलेल्या, वितरण उद्योगांत वापण्यासाठी केलेल्या गुंतवणूकीच्या वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी भाग भांडवलाचा भाग.

६३.१.२भाग भांडवलावरील परताव्याची खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत येईल-

(ए) आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या भाग भांडवलावर वरील विनियम ६३.१.१ मधील अनुज्ञेय दराने परतावा; अधिक

(बी) अशा आर्थिक वर्षाकरिता, वरील विनियम ६० व विनियम ६१ नुसार परिगणना केलेल्या, वितरण उद्योगात वापरण्यासाठी केलेल्या गुंतवणूकीच्या वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी भाग भांडवलाच्या ५० टक्के भागावर वरील विनियम ६३.१.१ मधील अनुज्ञेय दराने परतावा.

६३.१.३ मान्यातापाप्त पातळीपेक्षा वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चात आलेल्या तफावतीमुळे जर भाग भांडवलावरील परताव्याची कमी किंवा जास्त वसूली झाली तर ती त्याच नियंत्रणाधीन असलेल्या किंवा नसलेल्या घटकांशी जोडण्यांत येईल ज्या घटकांमुळे वार्षिक भांडवली खर्चात तफावत आली असेल.१

६३.२ आय-कर

६३.२.१ वितरण परवानाधारकाला त्याच्या वितरण उद्योगाच्या उत्पन्नावरील आय-कराचा समावेश एकूण महसूलाच्या गरजेत करण्यास अनुमती देण्यांत येईल.

६३.२.२आय-कर अधिनियम, १९६१ मधील तरतूदींवर आधारित त्याच्या वितरण उद्योगाच्या आय-कर दायित्वा संबंधीच्या अंदाजाचा समावेश वीज दराच्या निश्चितिकरणाच्या अर्जात वितरण परवानाधारक करेल;

परंतु असे की, आय-कर अधिनियम, १९६१ खालील निर्धारणामुळे आयकर दायित्वांत कांही बदल झाल्यास, तो नियंत्रणाधिन नसलेल्या घटकांमळे झाला असे समजून त्याप्रामाणे हाताळण्यांत येईल;

परंतु आणखी असे की, आय-कर अधिनियम, १९६१ मधील तरतूदींमध्ये झालेल्या बदलामुळे आय-कर दाय्तिवांत बदल झाल्यास तो नियंत्रणाधिन नसलेल्या घटकांमळे झाला असे समजून त्याप्रामाणे हाताळण्यांत येईल;

परंतु आण्खी पुढे असे की, मान्यताप्राप्त पूर्वानुमानापेक्षा वितरण परवानाधारकाच्या उत्पन्नांत बदल झाल्यामूळे जर त्याच्या आय-कर दायित्वात बदल झाला तर अशा बदलांचा संबंध ज्या घटकांमुळे उत्पन्नांत बदल झाला त्याच नियंत्रणाधीन असलेल्या किंवा नसलेल्या घटकांशी लावण्यांत येईल व त्याप्रमाणे हाताळण्यांत येईल.

६३.२.३कर-सूटीचा मिळणारा लाभ, वितरण यंत्रणेवरील किंवा तिच्या काही भागावरील सामावून न घेतले गेलेले तोटे किंवा सामावून न घेतला गेलेला घसारा यांच्याकरिता जमा रकमा, यांचा विचार वितरण उद्योगाच्या आय-कर दायित्वाची परिगणना करताना करण्यांत येईल.

६३.३ कर्ज भांडवलावरील व्याज

६३.३.१ वरील विनियम ६२ नुसार कर्ज परतफेडीच्या वेळापत्रक व मान्यताप्राप्त व्याज दराच्या आधारे, ३१ मार्च, २००५ रोजी असलेल्या सर्व मान्यताप्राप्त कर्जांच्या व्याजावरील खर्च वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अनुमती असेल.

६३.३.२ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या मान्यताप्राप्त भांडवली खर्चाच्या प्रकल्पांच्या सर्व कर्जांवर, व त्या तारखेस किंवा त्यानंतर स्थिर मत्तेमध्ये घातलेली मान्यताप्राप्त भर आणि मान्यताप्राप्त स्थिर मत्तांची खरेदी, यावर खालील अटी व शर्तींवर व्याज दर वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अनुमती राहीलः-

(ए) आयोगाने गुंतवणूक योजनेत मान्यता दिल्यानुसार व्याज दर राहील.

(बी) अशा भांडवली खर्चाच्या प्रकल्पांसात्ठी/ स्थिर मत्तांसाठी प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल हे आधार मूल्य राहील.

(सी) या विनियमांच्या विनियम ६२ नुसार प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलाची परतफेड प्रमाणकानुसारी परतफेडीच्या वेळापत्रकाप्रमाणे करावयाची आहे, असे मानण्यांत येईल.

६३.३.३कर्जावरील व्याज काढताना, भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या कर्ज घेण्यासाठीचा खर्च यासंबधीचे लेखा मानक विवरणपत्र (एएस-१६) मधील तरतूदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, लागू राहतील.

६३.३.४ व्याजावर कर, बांधिलकी (कमिटमेंट) आकार, वित्तीय आकार आणि परकीय चलनातील कर्जावर परकीय चलन विनिमयांतील कोणत्याही बदलामुळे होणारा फरक या बाबींना, वितरण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत व्याजावरील खर्च म्हणून जितक्या प्रमाणांत संबोधण्यांत येत असेल त्या प्रमाणांत, आयोग या बाबींना अनुमती देईल.

६३.४ घसा-यापोटीच्या अग्रिमासह घसारा

६३.४.१ वितरण उद्योगांतील स्थिर मत्तेच्या मूल्यावरील, खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत आलेला, घसारा वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अनुमती देण्यांत येईलः-

(ए) प्रकल्पाचा /मत्तेची आयोगाने मान्यता दिलेला मूळ खर्च हे घसा-याची परिगणना करण्यासाठी आधारभूत मूल्य असेल.

(बी) या विनियमासोबतच्या **परिशिष्ट-१** मध्ये दिलेल्या दराने घसा-याची परिगणना दर वर्षी स्थिर पध्दतीने (स्ट्रेट लाईन मेथड) करण्यांत येईल;

परंतु असे की, मत्तेच्या अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या १० टक्के मत्तेचा उरलेला उपयोगिता काल म्हणून मानण्यात येईल आणि मत्तेच्या अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या जास्तीत जास्त ९० टक्केपर्यंत घसारा अनुज्ञेय राहील;

परंतु आणखी असे की, जमिनीवर घसारा काढण्याची परवानगी देण्यांत येणार नाही व तिच्यावरील खर्च हा अनुज्ञेय भांडवली खर्चातून घसा-याची परिगणना करण्यासाठी वगळण्यांत येईल;

परंतु असेही की, भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या घसा-या लेख्याबाबतचे लेखा मानक विवरणपत्र (एएस-६) मधील तरतूदी, या विनियमांशी त्या विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, या विनियमांखाली घसा-याची परिगणाना कराण्यासाठी लागू राहतील.

६३.४.२ घसा-याशिवाय, वितरण परवाधारकाला वरील विनियम ६२.३ुसार परिगणना केलेला, घसा-यापोटी अग्रिम मिळण्याचा हक्क असेल.

६३.४.३ वितरण परवानाधारकास आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपर्यंत अमूर्त मत्ता वसूल करण्यास मुभा दिली जाईल.

स्पष्टीकरण- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “अमूर्त मत्ता” म्हणजे रोखीत करण्यांत आलेला कामकाज-पूर्व आणि विकासाचा खर्च आणि जो वितरण परवानाधारकाच्या भांडवली लेख्यांत खर्च टाकल्याची नोंद झालेली आहे व जो वितरण उद्योग विकसित करित असताना योग्य खर्च म्हणून करावा लागला आहे व त्यांत ख्याती-मूल्य (गुड-विल) म्हणून दिलेल्या किंवा ताळेबंदांत दाखविल्या गेलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश असणार नाही.

६३.५ <u>कामकाज व देखभाल खर्च</u>

६३.५.१ वितरण उद्योगाशी संबंधित असलेला कामकाज व देखभालीवरील सर्व वाजवी व समर्थनीय खर्च वसुल करण्यास वितरण परवानाधारकास परवानगी देण्यांत येईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत अशा सर्व कामकाज व देखभालीवरील खर्चाचे पूर्व-अनुमान सादर करेल.

परंतु आणखी असे की, पूर्व-अनुमान हे मागील कामगिरी आणि/ किंवा कामकाजाचे निकष यावर आधारित असेल आणि त्याचे स्पष्टीकरण देणारी व त्याच्या समर्थनार्थ सविस्तर आकडेवारी देण्यांत आलेली असेल.

स्पष्टीकरणः- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “कामकाज व देखभाल खर्चा”मध्ये खालील बाबींचा समावेश असेलः-

(ए) बोनस व भविष्य निर्वाह निधीस वर्गणी, व कोणत्याही सध्या प्रचलित असलेल्या कायद्याखाली किंवा आयोगाने मान्य केलेल्या योजनेखाली द्यावयाचे निवृत्तवेतन आणि उपदान यासहीत कर्मचा-यांवरील खर्च;

(बी) दुरुस्ती व देखभाल;

(सी) भाडे, दर, व आय-कराशिवायचे इतर कर

(डी) विधी शुल्क

(इ) बुडीत कर्जासाठी तरतूद;

(एफ) लेखापरिक्षकांची फी

(जी) शिकाऊ उमेदवार व प्रशिक्षण योजनांवरील खर्च;

(एच) वरील बाबींमध्ये व या विनियमांत इतरत्र नसलेला परंतु वितरण उद्योगाशी संबंधित असलेला खर्च जो आय-कर अधिनियम, १९६१ खाली उत्पन्नाची परिगणना करताना वजावट म्हणून अनुज्ञेय आहे .

## ६३.६ खेळते भांडवलावर व्याज

६३.६.१ आर्थिक वर्षातील, खालीलप्रमाणे परिगणना केलेल्या अंदाजित खेळते भांडवलाच्या पातळीवर, वितरण परवानाधारकाला व्याज अनुज्ञेय राहीलः-

(ए) आर्थिक वर्षातील कामकाज व देखभालीच्या खर्चाच्या १/१२ रक्कम; अधिक

(बी) आर्थिक वर्षाच्या प्रत्येक महिन्याच्या शेवटी स्टोअर मधील सामान, साहित्य व पुरवठ्याच्या वस्तू व हातात शिल्लक असलेल्या इंधनाच्या पुस्तकांतील किंमतीच्या १/१२; अधिक

(सी) प्रचलित दराने वहन आकारांपासून दोन-महिन्यांतील अपेक्षित महसलाइतकी रक्कम; वजा

(डी) अधिनियमाच्या कलम ४७च्या उप-कलम (१) च्या खंड (बी)नुसार ग्राहक आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून सुरक्षा अनामत म्हणून घेतलेल्या, असल्यास, अशा रकमा.

६३.६.२ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर केलेल्या तारखेस असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अल्प-कालीन मूळ व्याज दराने व्याज अनुज्ञेय राहील.

६३.६.३ वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर केलेल्या तारखेस असलेल्या बँक दराने वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून घेतलेल्या सुरक्षा अनामतीवर व्याज अनुज्ञेय राहील.

## ६३.७ आकस्मिकता निधीस वर्गणी

६३.७.१ जर वितरण परवानाधारकाने आकस्मिकता निधीसाठी विनियोजन केले असेल तर, वहन आकारांची परिगणना करताना स्थिर मत्तांच्या मूळ किंमतीच्या ०.२५ टक्क्यांपेक्षा कमी नसेल व ०.५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम अशा विनियोजनासाठी अनुज्ञेय राहील;

परंतु असे की, जेव्हा या आकस्मिकता निधीची रक्कम स्थिर मत्तांच्या मूळ किंमतीच्या पांच (५) टक्क्याहून अधिक होईल तेव्हा ही निधीची रक्कम वरील कमाल रकमेपेक्षा जास्त होणार असल्यामुळे अशा विनियोजनास परवानगी देण्यांत येणार नाही;

परंतु असे की, अशा रितीने विनियोजन केलेली रक्कम भारतीय न्यास अधिनियम, १८८२ खाली प्राधिकृत करण्यांत आलेल्या रोख्यांमध्ये आर्थिक वर्ष संपल्या नंतर सहा महिन्यांच्या आंत गुंतविण्यात येईल.

६३.७.२परवान्याच्या कालावधीत आकस्मिकता निधीतून रक्कम काढण्यांत येणार नाही, फक्त आयोगाने परवानगी दिलेल्या खर्चाच्या बाबीखेरीज वगळून जसे की-

(ए) व्यवस्थापन टाळू न शकणा-या अशा अपघात, संप किंवा परिस्थितीमुळे होणारे खर्च किंवा नफ्याची हानि;

(बी) नेहमीचा देखभाल व नवीकरणावरील खर्च वगळता, संच (प्लँट) किंवा कामे बदली करण्यावर अथवा काढून टाकण्यावर झालेला खर्च;

(सी) सध्या प्रचलित असलेल्या कोणत्याही कायद्याखाली द्यावी लागणारी नुकसान भरपाई जिच्यासाठी दुसरी कोणतीही अन्य तरतूद करण्यांत आलेली नाही.

परंतु असे की, परवानेधारकाला विमा कंपन्यांकडून मिळालेल्या अन्य कोणत्याही नुकसानभरपाईच्या रकमांचे योग्यरित्या समायोजन केल्यावरच, आकस्मिक निधीमधून काढावयाच्या अशा रकमांची परिगणना करण्यात येईल.

## ६४. वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न

६४.१ वितरण परवानाधारकाचे वहन आकार निश्चित करताना वितरण उद्योगाशी संबंधित आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाची रक्कम एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक त्याच्या वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या पूर्व-अनुमानाचा संपूर्ण तपशील वीज दर निश्चितीकरणाच्या अर्जाबरोबर आयोगास सादर करेल.

## ६५ इतर उद्योगापासूनचे उत्पन्न

६५.१ जर वितरण परवानाधारक कोणताही इतर उद्योग करीत असेल तर, अशा इतर उद्योगापासूनच्या उत्पन्नातून अशा इतर उद्योगाशी संबंधित सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च कमी करुन राहिलेल्या उत्पन्नाच्या एक-तृतियांश उत्पन्न, वितरण परवानाधारकाचे वहन आकार निश्चित करताना एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक त्याचा वितरण उद्योग व इतर उद्योग यांत संयुक्त आणि समान असलेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चाची विभागणी वाजवी आधारावर करेल आणि एक वाटप विवरणपत्र आयोगास वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सदर करताना त्यासोबत पाठवेल;

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा इतर उद्योगाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चाची एकूण बेरीज ही अशा इतर उद्योगाच्या उत्पन्नापेक्षा जास्त होईल तेव्हा किंवा इतर कोणत्याही कारणाकरिता, अशा

इतर उद्योगामुळे वितरण परवानाधारकाच्या एकूण महसूलाच्या गरजेत कोणतीही रक्कम मिळविण्यास अनुमती देण्यांत येणार नाही.

## ६६ वहन आकारांचे वाटप

६६.१ परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ६४ च्या उप-कलम (३) अन्वये काढण्यांत आलेल्या आदेशांत आयोग वितरण परवानाधारकाचे वहन आकार विहीत करेल.

परंतु असे की, वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याने भाग-जी खाली अदा करावयाच्या आकारांमध्ये, आयोगाच्या आदेशांत विहित केल्याप्रमाणे, स्थिर व अस्थिर आकारांच्या कोणत्त्तेही संयोग, असेल.

## ६७ वितरण तोटे

६७.१ वितरण यंत्रणा चालविल्यामूळे होणा-या मान्यताप्राप्त ऊर्जा हानीच्या पातळीची वसूली, इतर लाभांच्या रुपांत स्वीकारण्यास, वितरण परवानाधारकास अनुमती देण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकाला लागू असलेल्या बहु-वर्षीय वीज दर रचनेचा एक भाग म्हणून विनियम १६ नुसार वितरण तोट्यांसाठी एक यथोचित मार्गदर्शिका आयोग ठरवून देईल.

परंतु असे की, प्रत्यक्ष वितरण हानीची पातळी आणि मान्यताप्राप्त पातळी यांत कोणतीही तफावत उद्‌भवली तर ती, विनियम १८ किंवा विनियम १९ मध्ये, जसे असेल तसे, नमूद करण्यांत आलेल्या पध्दतीने, कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून, हाताळण्यांत येईल;

परंतु असे की, चोरी, भूरटी चोरी, पारेषण केलेल्या विजेसाठी मीटर्स बसविण्यांत किंवा देयके तयार करण्यांत आलेल्या अपयशामुळे झालेल्या उर्जा हानीची, या विनियमाखाली, आयोग ठरवून देईल त्या कालावधीनंतर, वसूली करण्यास वितरण परवानाधारकास परवानगी देण्यांत येणार नाही.

# भाग-एच : विजेची किरकोळ विक्री

## ६८ विनियम कोणास लागू असतील

६८.१ वितरण परवानाधारकाने त्याच्या ग्राहकांना करावयाच्या विजेच्या किरकोळ विक्रीसाठी वीजेचा दर निश्चित करण्यासाठी हे विनियम लागू असतील.

परंतु असे की, एकाच क्षेत्रांत दोन किंवा अधिक वितरण परवानाधारक विजेचे वितरण करणार असतील तर आयोग विजेच्या किरकोळ विक्रीच्या दराची कमाल मर्यादा निश्चित करेल आणि अशी दर निश्चिती या विनियमांतील तरतूदींपासून घेतलेल्या मार्गदर्शनानुसार आयोग करेल.

## ६९ वीज दराचे भाग

६९.१ वितरण परवानाधारकच्या आर्थिक वर्षाच्या एकूण महसूल गरजेतून वीज दरा व्यतिरिक्त इतर उत्पन्न, वहनापासूनचे उत्पन्न, इतर उद्योगापासूनचे उत्पन्न व क्रॉस-सबसिडीवरील अधिभार व अतिरिक्त अधिभारामुळे प्राप्त रकमा वगळता उरलेल्या रकमेची वसूली वितरण परवानाधारकाच्या, आयोगाने मान्यता दिलेल्या, विजेच्या किरकोळ विक्रीच्या दरांतून होईल आणि या वीज दरांत खालील बाबींचा समावेश असेल:

एकूण महसूलाची गरज
(ए) भाग भांडवलावरील परतावा;
(बी) आय-कर;
(सी) कर्ज भांडवलावरील व्याज;
(डी) घसा-या पोटीचा अग्रिम आणि अमूर्त मालमत्ता निवारण निधीसह घसारा;
(इ) वीज निर्मिती/वीज खरेदीचा खर्च
(एफ) पारेषण आकार
(जी) कामकाज व देखभाल खर्च;
(एच) खेळते भांडवलावरील व ग्राहक ठेवींवर व्याज; आणि
(आय) आकस्मिकता निधीसाठी वर्गणी

वीज विक्रीपासून महसूलाची गरज = वरील प्रमाणे, एकूण महसूलाची गरज, वजाः
(जे) वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न; आणि
(के) विजेच्या वहनापासूनचे उत्पन्न;
(एल) इतर उद्योगापासूनचे उत्पन्न, या विनियमांत विहीत केलेल्या मर्यादेपर्यंत.
(एम) क्रॉस-सबसिडीवरील अधिभारामुळे प्राप्त उत्पन्न; आणि
(एन) वहन आकारावरील अतिरिक्त अधिभारामुळे प्राप्त उत्पन्न.

६९.२ या विनियमाच्या भाग-बी नुसार वीज दराच्या निश्चितीकरणासाठी वितरण परवानाधारकाने केलेल्या अर्जाच्या आधारावर विजेच्या किरकोळ विक्रीचा दर आयोगातर्फे निश्चित करण्यांत येईल.

## ७० बहु-वर्षीय वीज दर

७०.१ आयोगाने केलेले अपवाद वगळून, या विनियमाच्या भाग-सी मध्ये असलेले विनियम राज्यांतील सर्व वितरण परवानाधारकांना १ एप्रिल, २००६ पासून लागू होतील.

## ७१ गुंतवणूक योजना

७१.१ वितरण परवानाधारक त्याच्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पांच्या पूर्ण तपशीलासह त्याची गुंतवणूक योजना वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत किंवा स्वतंत्रपणे, आयोग निदेश देईल तेव्हा सादर करेल.

परंतु असे की, गुंतवणूक योजना ही एक बदलती योजना राहील व तिचा कालावधी हा, अशा अर्जाचा भाग म्हणून सादर करण्यांत येत असलेले पूर्व-अनुमान आणि अंदाज ज्या कालावधीसाठी असतील त्या कालावधीशी जुळणारा असेल.

७१.२ वितरण परवानाधारकाची वितरण यंत्रणा मजबूत करण्यासाठी व वाढ करण्यासाठी त्यांत करावयाची गुंतवणूक व वितरण परवानाधारकाच्या किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायांत करावयाच्या गूंतवणूकीसाठी, गुंतवणूक योजना कमीत कमी खर्चाची असेल.

७१.३ गुंतवणूक योजनेत रुपये दहा (१०) कोटीहून अधिक रकमेच्या सर्व भांडवली खर्चाच्या योजनांचा समावेश असेल आणि आयोग वेळोवेळी विहीत करेल त्या नमून्यामधे योजना तयार करण्यांत येईल.

७१.४ गुंतवणूक योजनेसोबत प्रस्तावित गुंतवणुकीची गरज, विचारांत घेतलेले इतर पर्याय, खर्च/ लाभांचे विश्लेषण, आणि विजेच्या किरकोळ विक्रीच्या दरावर परिणम करु शकणा-या इतर घटकांची माहिती, तपशील व कागदपत्रे सादर करण्यांत येतील.

७१.५ वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या गुंतवणूक योजनेचे पुर्नविलोकन आयोग, प्रस्तावित खर्चामागील योग्या-योग्यता ठरवून व त्याचे वीज दरावर होणारे अपेक्षित परिणाम लक्षांत घेऊन, करेल व त्यानंतर आयोग -

(ए) वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या गुंतवणूक योजनेला तत्वतः मान्यता देताना त्यांत आयोगास उचित वाटतील असे बदल करेल किंवा शर्ती घालेल किंवाः

(बी) वितरण परवानाधारकाने सादर केलेली गुंतवणूक योजना नामंजूर करेल व आयोगास आवश्यक वाटतील अशा घटकांचा विचार करून नवीन गुंतवणूक योजना सादर करण्यास आयोग सांगेल.

७१.६ वितरण परवानाधारक वीज दर निश्चितीकरणासाठी किंवा वार्षिक कामगिरीचे पुर्नविलोकन करण्यासाठी अर्ज सादर करताना, जसे असेल तसे, भांडवली खर्चाच्या प्रक्ल्पांमध्ये झालेल्या प्रगतीची माहिती तसेच या महितीची पडताळणी करण्यासाठी त्यासोबत आयोगास हवी असलेली इतर माहिती, तपशील व कागदपत्रेही पाठवेल.

## ७२ भांडवली खर्च

७२.१ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या रुपये दहा (१०) कोटीपेक्षा जास्त भांडवली खर्च असलेल्या प्रकल्पाचा त्या आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च निश्चित करण्यासाठी वितरण परवानाधारकाची मान्यताप्राप्त गुंतवणूक योजना आधार राहील.

७२.२ प्रकल्पाच्या आरंभापासून ते तो प्रकल्प सुरु होईपर्यंत, प्रत्येक भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, एकूण वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चाची बेरीज ही त्या प्रकल्पाची मूळ किंमत राहील;

परंतु असे की, प्रकल्पाची सुरुवात झाल्यानंतर, भांडवली स्वरुपाचा झालेला अतिरिक्त वाजवी खर्च प्रकल्पाच्या मूळ किंमतीत समाविष्ट करण्यास, वितरण परवानाधारकाने तसा अर्ज केल्यास, आयोग परवानगी देईल.

७२.३ गूंतवणूक योजनेचा एक भाग म्हणून मान्यता दिलेल्या अंदाजित मूळ खर्चापेक्षा जर भांडवली खर्चाच्या प्रकल्पावर झालेला प्रत्यक्ष खर्च जास्त झाला किंवा जर वितरण परवानधारकाची अशी खात्री असली की प्रत्यक्ष होणारा खर्च हा अंदाजापेक्षा अधिक होईल तर , वितरण परवानधारक प्रकल्पाच्या मूळ अंदाजित खर्चाहून तफावत असलेल्या खर्चास मान्यता देण्यासठी, वार्षिक कामगितीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून आयोगकडे अर्ज करेल;

परंतु असे की, असा खर्च हा वाजवी असून नियंत्राणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेला आहे अशी आयोगाची खात्री पटली तर, योग्य छाननीनंतर, आयोग, वरील विनियम १८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीस अनुसरुन असा वाढीव खर्च हाताळण्यास अनुमती देईल.

७२.४ जर भांडवली खर्चाच्या प्रकल्पावरील प्रत्यक्ष खर्च हा मान्यता देण्यांत आलेल्या अंदाजित मूळ खर्चापेक्षा कमी असेल आणि खर्चातील बचत ही नियंत्रणाधीन असलेल्या घटकांमुळे झालेली असेल तर, आयोग , योग्य छाननीनंतर, अशा प्रकल्पाच्या बांधकामाच्या कालावधीत, परिणामस्वरुप कर्ज भांडवलावरील व्याजांत होणारी बचत, वरील विनियम १९ मध्ये नमूद केलेल्या पद्धतीस अनुसरून हाताळण्यास अनुमती देईल;

परंतु असे की, जर भांडवली खर्चातील बचत ही नियंत्रणाधीन नसलेल्या घटकांमुळे झालेली असेल तर ती वरील विनियम १८ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार हाताळण्यांत येईल.

७२.५ या विनियम ७२ मध्ये काहीही असले तरी, रुपये दहा (१०) कोटी पेक्षा अधिक खर्च नसलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, वार्षिक अनुज्ञेय भांडव्ली खर्च आणि प्रकल्पाचा मूळ खर्च निश्चित करण्याकरिता, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून,, वितरण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत नोंद झालेला प्रत्यक्ष खर्च हा आधार राहील,

७२.६ या विनियम ७२ मध्ये काहीही असले तरी, १ एप्रिल, २००५ पूर्वी मंजूर केलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता, वार्षिक अनुज्ञेय भांडव्ली खर्च आणि प्रकल्पाचा मूळ खर्च निश्चित करण्याकरिता, आयोगाने वस्तुस्थिती लक्षांत घेऊन ठेवलेल्या नियंत्राणास अधीन राहून,, वितरण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत नोंद झालेला प्रत्यक्ष खर्च हा आधार राहील,

७२.७ भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या स्थिर मत्तेच्या लेख्यांसंबंधित असलेले लेखा मानक विवरणपत्र (एएस-१०) हे, या विनियमांशी विसंगत नसेल तितक्या मर्यादेपर्यंत, भांडवली खर्च प्रकल्पाची मूळ किंमत आणि/किंवा भांडावलीकृत केलेल्या स्थिर मत्तेची मूळ किंमत निश्चित करण्यासाठी, लागू राहील.

७२.८ वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्च, या विनियमाच्या प्रयोजनार्थ, अशा आर्थिक वर्षांत समानपणे झाला आहे, असे मानण्यांत येईल.

७२.९ सुरुवातीचे सुटे भाग भांडवलीकृत केल्यामुळे भांडवली खर्चाच्या प्रकल्पाच्या मूळ खर्चाच्या १.५ टक्के अतिरिक्त रक्कम मूळ किंमतीत वाढविण्यास परवानगी देण्यात येईल.

७२.१० भारतीय सनदी लेखपाल संस्थेच्या परकीय चलनाच्या दरांतील बदलाच्या परिणामासंदर्भात असलेले लेखा मानक विवरणपत्र (एएस-११) नुसार, भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता घेतलेलया परकीय चलनातील कर्जावर कोणत्याही परकीय चलनांतील दरांत होणा-या बदलांचे परिणाम हाताळण्यांत येतील.

परंतु असे की, या विनियमांच्या खालील विनियम ७३ व विनियम ७४ प्रमाणे निश्चित करण्यांत आलेल्या प्रत्यक्ष किंवा प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलाचा समावेश वरील बाबीमध्ये करण्याचा विचार करण्यांत येईल.

७२.११ वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी ग्राहकांनी आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याने कामांसाठी भरलेली वर्गणीची कोणतीही रक्कम अशा प्रकल्पाच्या मूळ खर्चातून, या विनियमाखाली कर्ज भांडवल आणि भाग भांडवलाच्या रकमांची परिगणना करण्यासाठी कमी करण्यांत येईल;

परंतु असे की, पुढील विनियम ७६४ खाली घसारा काढण्यासाठी, अशी कोणतीही वर्गणी वजा करण्यापूर्वी प्रकल्पाची असलेली मूळ खर्चाची रक्कम विचारांत घेण्यांत येईल.

## ७३. कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर

७३.१ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पावर आणि/ किंवा अशा तारखेस किंवा त्यानंतर खरेदी केलेल्या स्थिर मत्तेवर आर्थिक वर्षांत केलेला कोणताही भांडवली खर्च हा, अशा आर्थिक वर्षाकरिता वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चावर लागू करावयाच्या ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल : भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे , असे मानण्यांत येईल.

७३.२ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता भांडवलीकृत केलेली कोणतीही मत्ता आणि/ किंवा त्या दिवशी किंवा त्यानंतर खरेदी केलेली कोणतीही स्थिर मत्ता यासाठी झालेला खर्च हा, या प्रकल्पाच्या किंवा मत्तेच्या मूळ किंमतीवर लावावयाच्या, ७०:३० या प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल : भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे, असे मानण्यांत येईल.

७३.३ सुरुवात झाल्याच्या तारखेनंतर प्रकल्पाच्या / स्थिर मत्तेच्या मूळ किंमतीत झालेल्या मान्यताप्राप्त बदलासाठी करण्यांत आलेला खर्च हा, प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तरानुसार झाला आहे , असे मानण्यांत येईल.

७३.४ दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या व कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर ७०: ३० पेक्षा कमी असलेल्या भांडवली खर्चाच्या प्रकल्पाची आर्थिक समाप्ती जर या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेपूर्वी झाली असेल तर वितरण परवानाधारक त्यास विनियम ७३.१ मधून सूट देण्यासाठी, त्यासंबंधीच्या कारणांसह, आयोगाकडे अर्ज करेल;

परंतु असे की, आयोग, जर आयोगाची खात्री पटली की विनियम ७३.१ लावल्यामुळे प्रकल्प सुरू होण्याच्या वेळापत्रकावर व त्यामुळे ग्राहकांना पुरवावयाच्या विजेच्या खर्चावर आणि/ किंवा परिमाणावर विपरित परिणाम होऊ शकेल तर, अशा भांडवली खर्चाच्या प्रकल्पास प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर लावण्यापासून सूट देईल.

७३.५ जर अर्जदाराने तो, बाजारपेठेतील अडचणी, कॉर्पोरेट/समूहास कर्ज देणा-या कर्जदारांच्या कर्जाबाबतच्या निकषांमुळे किंवा तत्सम कारणांमुळे, विहीत करण्यांत आलेल्या मर्यादेइतके कर्ज-भांडवल उभे करु शकत नसल्याचे वाजवीरित्या सिध्द करु शकला तर, आयोग या विनियम ७३ मधे विहीत करण्यांत आलेल्या कर्ज भांडवलःभाग भांडवल गुणोत्तराचा निकष त्यास लावण्यापासून सूट देऊ शकेल;

परंतु असे की, या विनियम ७३.५ खाली कर्ज भांडवलःभाग भांडवल गुणोत्तराचा निकष लावण्यापासून सूट देण्यापूर्वी आयोग कोणत्याही स्वारस्य असलेल्या किंवा बाधित व्यक्तीस त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देईल.

## ७४. कर्ज परतफेडीचे वेळापत्रक

७४.१ दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी असलेल्या वितरण परवानाधाराकाच्या मंजूरी देण्यात आलेल्या सर्व कर्जांच्या परतफेडीचे वेळापत्रक हे कर्जाच्या करारानुसार राहील;

परंतु असे की, दिनांक १ एप्रिल, २००५ पूर्वी आरंभ झालेल्या (पण अद्याप सुरुवात न झालेल्या) मान्यताप्राप्त भांडवली खर्चाच्या प्रकल्पाकरिता दिनांक १ एप्रिल, २००५ नंतर नवीन कर्ज (किंवा सध्याच्या कर्जाचा अतिरिक्त हप्ता) घेतले असेल तर, प्रकल्पाची सुरुवात होईपर्यंत घेतलेले असे कर्ज हे, या विनियमखाली व्याजावरील खर्चाची वसूली करण्याच्या प्रयोजनार्थ, अस्तित्वांत असलेले कर्ज म्हणून गणना करण्यांत येईल.

७४.२ वरील विनियम ७३ खाली प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलःभाग भांडवल गुणोत्तरानुसार काढलेल्या कर्ज भांडवलाची परतफेड ही प्रमाणकानुसारी परतफेडीच्या वेळापत्रकानुसार दर वर्षी करावयाची असल्याचे मानण्यांत येईल;

परंतु असे की, प्रमाणकानुसारी परतफेडीची एका वर्षातील रक्कम ही ते कर्ज ज्या स्थिर मत्तेच्या संदर्भात असेल त्यावरील घसा-याच्या रकमेइतकी असेल;

परंतु आणखी असे की, प्रमाणकानुसारी कर्जाची शिल्लक रक्कम ही जर, वरीलप्रमाणे परिगणना करुन काढलेल्या, प्रमाणकानुसारी कर्जाच्या परतफेडीच्या रकमेपेक्षा कमी असेल तर, परतफेडीची

रक्कम ही प्रमाणकानुसारी कर्जाच्या शिलक रकमेइतकी असल्याचे मानण्यांत येईल आणि या कर्ज खात्यावर परतफेडीची जादा रक्कम दाखविण्यास परवानगी दिली जाणार नाही;

परंतु असे की, सर्व प्रमाणकानुसारी परतफेडी या प्रत्येक आर्थिक वर्षात ३० सप्टेंबर रोजी करण्यांत येत असल्याचे मानण्यांत येईल.

७४.३ जर विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, प्रत्यक्ष परतफेड केलेली रक्कम ही त्या वर्षात विनियम ७६.४.१ खाली अनुज्ञेय घसा-याच्या रकमेपेक्षा जास्त झाली तर, वितरण परवानाधारकला, सदर आर्थिक वर्षाकरिता, परतफेडीची रक्कम व अनुज्ञेय घसा-याच्या रकमेतील फरकाइतक्या रकमेचा अग्रिम, त्या घसा-यापोटी अनुज्ञेय राहील;

परंतु असेही की, घसा-यापोटीच्या अग्रिमाची रक्कम ही सदर आर्थिक वर्षांत परतफेड करावयाच्या कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेतून विनियम ७६.४.१ खालील अनुज्ञेय घसारा वजा केल्यावर उरलेल्या रकमेच्या १/१० इतकी मर्यादीत राहील;

परंतु असेही की, विनियम ७४.१ आणि ७४.२ नुसार परिगणना करुन काढलेली कर्जाच्या परफेडीची रक्कम ही, वितरण परवानाधारकास मिळालेल्या घसा-यापोटीच्या अग्रिमाने, वाढविण्यात आली असल्याचे मानण्यांत येईल;

परंतु असेही की, कर्जाच्या संपूर्ण रकमेची परतफेड झाल्यानंतर, स्थावर मत्तेची मूळ किंमत ही संचित घसा-याची एकूण रक्कम आणि वितरण परवानाधारकास मिळालेल्या अग्रिमाची रक्कम यांच्या बेरजेने, कमी करण्यांत येईल आणि त्या मत्तेचे उर्वरित घसारायोग्य मूल्य त्या मत्तेच्या राहिलेल्या उपयोगिता कालावधीत वापरण्यांत येईल.

## ७५ विक्रीबाबत पूर्व-अनुमान

७५.१ वितरण परवानाधारक प्रत्येक वीज दर वर्गवारीस व अशा वर्गवारीतील प्रत्येक वीज दराच्या टप्प्यावर करावयाच्या विजेच्या अपेक्षित विक्रीचे मासिक पूर्व-अनुमान वीज दर निश्चितीच्या अर्जासोबत आयोगाकडे मान्यतेसाठी पाठवेल;

परंतु असे की, वरीलप्रमाणे अर्जाचा एक भाग म्हणून सादर करण्यांत येत असलेल्या या पूर्व-अनुमान / अंदाजांचा कालावधी व अशा विक्रीबाबतच्या पूर्व- अनुमानांचा कालावधी सारखाच असेल;

७५.२ या विनियमांच्या भाग-डी खाली तयार करण्यांत आलेला दीर्घ-कालावधीच्या वीज प्राप्त करुन घेण्याबाबतच्या आराखड्याचा एक भाग म्हणून तयार केलेल्या विद्युत भारासंबंधाच्या पूर्व-अनुमानांशी विक्रीबाबतचे पूर्व-अनुमान सुसंगत असतील व ते मागील माहिती व भविष्याबद्दलच्या वास्तववादी गृहितांवर आधारित असतील;

परंतु असे की, जर एखाद्या विशिष्ट वीज दर वर्गवारीबाबतचे विक्रीचे पूर्व-अनुमान वर्तविण्यासाठी एखादी पध्दत आयोगाने विहीत केली असेल तर वितरण परवानाधारक अशा पध्दतीचा अवलंब करुन अशा वीज दर वर्गवारीला होणा-या विक्रीबबतचे पूर्व-अनुमान विकसीत करेल.

७५.३ वीज विक्री बाबतचे असे पूर्व-अनुमान कितपत वास्तववादी आहेत हे अजमावण्यासाठी आयोग त्यांचा आढावा घेईल आणि असा आढावा पूर्ण झाल्यानंतर आयोग-

(ए) आदेश काढून त्यांत विहित केल्याप्रमाणे काही बदल किंवा शर्ती घालून त्या पूर्व-अनुमानास मान्यता देईल; किंवा

(बी) असे पूर्व-अनुमान नामंजूर करुन, आयोग विहीत करेल ते घटक विचारांत घेऊन, सुधारित पूर्व-अनुमान सादर करण्यास आयोग, वितरण परवानाधारकास सांगेल.

## ७६ एकूण महसुल गरजेची परिगणना

७६.१ भाग भांडवलावरील परतावा

७६.१.१ वितरण परवानाधारकास, मान्यताप्राप्त भाग भांडवलावर प्रती वर्षी १६ टक्के दराने परतावा घेण्यास परवानगी देण्यांत येईलः

स्पष्टीकरण १ :- या विनियमांच्या प्रयोजनार्थ, भरणा करण्यांत आलेले भाग भांडवल, अधिमान भाग भांडवल (प्रेफरन्स शेअर कॅपिटल), पूर्ण/ सक्तीची परिवर्तनीय ऋणपत्रे (कन्व्हर्टिबल डिबेंचर्स) ( किंवा समान स्वरुपाची इतर वित्तीय पत्रे (इन्स्ट्रुमेंट्स) ), परकीय चलनातील परिवर्तनीय बंधपत्रे (कन्व्हर्टिबल बॉंड्स), लाभांश वाटपासाठी किंवा अधिलाभांश भाग(बोनस शेअर)च्या रुपांत भांडवलीकरणासाठी उपलब्ध असलेले भाग अधिमूल्य लेखा (शेअर प्रिमिअम अकाउंट) आणि इतर राखीव निधी, जे वितरण उद्योगांत आणि किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायांत गुंतविले आहेत, यांच्या एकूण बेरजेइतके भाग भांडवल राहील. कोणतीही अनुदानाची रक्कम, पुनर्मूल्यन राखीव निधी, विकास राखीव निधी, आकस्मिकता राखीव निधी आणि ग्राहक व उपयोगकर्त्यांकडून आलेली वर्गणीची रक्कम, यांचा समावेश भाग भांडवलांत करण्यांत येणार नाही. लेखा पुस्तकांत दाखविण्यांत आलेल्या वितरण आणि किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायाच्या ा स्थगित कर दायित्वे किंवा स्थगित कर मत्तेच्या रकमा या भाग भांडवलांत मिळविण्यांत किंवा कमी करण्यांत, जसे असेल तसे, येतील.

स्पष्टीकरण २ :- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, १ एप्रिल, २००५ रोजी असलेल्या भाग भांडवलाची रक्कम खालीलप्रमाणे काढण्यांत येईल-

स्पष्टीकरण १ नुसार आयोगाकडून निश्चित करण्यांत आलेले १ एप्रिल, २००४ चे भाग भांडवल : अधिक
दिनांक ३१ मार्च, २००५ रोजी संपणा-या वर्षासाठी, वरील विनियम ७३ प्रमाणे परिगणना केलेल्या, वितरण उद्योगांत वापरण्यासाठी गूंतवणूक केलेल्या वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी, भाग भांडवलाचा भाग.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १३१ नुसार हस्तांतरण योजनेखाली घटीत झालेल्या वितरण परवानाधारकाच्या प्रकरणी, १ एप्रिल, २००४ या तारखेऐवजी त्या हस्तांतरण योजनेची तारीख ही, वरील भाग भांडवल निश्चित करणायासाठी प्रभावी तारीख मानण्यांत येईल.

परंतु असे की, वीज वितरणाचा उद्योग जर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणातर्फे, अधिनियमाची सुरुवात होण्यापूर्वी, करण्यांत येत असेल तर, भाग भांडव्लाची सुरुवातीची शिल्लक, अधिनियमाच्या कलम ६४च्या उप-कलम (३) खाली आयोग त्याच्या आदेशांत योग्यरित्या नमूद करेल.

त्यानंतर प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला भाग भांडवलाच्या रकमेची खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत येईल-

या विनियमांप्रमाणे परिगणना केलेले मागील वर्षाच्या सुरुवातीला असलेले भाग भांडवल; अधिक

मागील आर्थिक वर्षाकरिता, वरील विनियम ७२ आणि विनियम ७३नुसार परिगणना केलेल्या, वितरण उद्योगांत वापरण्यासाठी गुंतवणूक केलेल्या वार्षिक भांडवली खर्चापैकी अनुज्ञेय रकमेतील भाग भांडवलाचा भाग.

७६.१.२ भाग भांडवलावरील परताव्याची परिगणना खालीलप्रमाणे करण्यांत येईल-

(ए) वर्षाच्या सुरुवातीला असलेल्या भाग भांडवलावर वरील विनियम ७६.१.१ मधील अनुज्ञेय दराने परतावा; अधिक

(बी) अशा आर्थिक वर्षाकरिता, वरील विनियम ७२ आणि विनियम ७३नुसार परिगणना केलेल्या, वितरण उद्योगांत वापरण्यासाठी गुंतवणूक केलेल्या वार्षिक अनुज्ञेय भांडवली खर्चापैकी भाग भांडवलाच्या ५० टक्के भागावर विनियम ७६१.१ नुसार अनुज्ञेय दराने परतावा.

७६.१.३ मान्याताप्राप्त पातळीपेक्षा वार्षिक भांडवली खर्चापैकी अनुज्ञेय रकमेत आलेल्या तफावतीमुळे जर भाग भांडवलावरील परताव्याची कमी किंवा जास्त वसूली झाली तर ती त्याच नियंत्रणाधीन असलेल्या किंवा नसलेल्या घटकांशी जोडण्यांत येईल ज्या घटकांमुळे वार्षिक भांडवली खर्चात तफावत आली असेल.

७६.२ <u>आय-कर</u>

७६.२.१वितरण परवानाधारकाला त्याच्या उत्पन्नावरील आय-कराचा समावेश एकूण महसूलाच्या गरजेत करण्यास अनुमती देण्यांत येईल.

७६.२.२आय-कर अधिनियम, १९६१ मधील तरतूदींवर आधारित त्याच्या आय-कर दायित्वा संबंधीच्या अंदाजाचा समावेश वीज दराच्या निश्चितिकरणाच्या अर्जात वितरण परवानाधारक करेल;

परंतु असे की, आय-कर अधिनियम, १९६१ खालील निर्धारणामुळे आयकर दायित्वांत कांही बदल झाल्यास, तो नियंत्रणाधिन नसलेल्या घटकांमळे झाला असे समजून त्याप्रामाणे हाताळण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, आय-कर अधिनियम, १९६१ मधील तरतूदींमध्ये झालेल्या बदलामुळे आय-कर दायित्वांत बदल झाल्यास तो नियंत्रणाधिन नसलेल्या घटकांमळे झाला असे समजून त्याप्रामाणे हाताळण्यांत येईल.

परंतु आण्खी पुढे असे की, मान्यताप्राप्त पूर्वानुमानापेक्षा वितरण परवानाधारकाच्या उत्पन्नांत बदल झाल्यामूळे जर त्याच्या आय-कर दायित्वात बदल झाला तर अशा बदलांचा संबंध ज्या घटकांमुळे उत्पन्नांत बदल झाला त्याच नियंत्रणाधीन असलेल्या किंवा नसलेल्या घटकांशी लावण्यांत येईल व त्याप्रमाणे हाताळण्यांत येईल.

७६.२.३कर-सवलतींचे लाभ, वितरण यंत्रणेवरील किंवा तिच्या काही भागावरील सामावून न घेतले गेलेले तोटे किंवा सामावून न घेतला गेलेला घसारा, यांच्याकरिता जमा रकमा, यांचा विचार वितरण परवानाधारकाच्या आय-कर दायित्वाची परिगणना करताना करण्यांत येईल.

७६.३ <u>कर्ज भांडवलावरील व्याज</u>

७६.३.१वरील विनियम ७४ नुसार कर्ज परतफेडीच्या वेळापत्रक व मान्यताप्राप्त व्याज दराच्या आधारे, ३१ मार्च, २००५ रोजी असलेल्या सर्व मान्यताप्राप्त कर्जांच्या व्याजावरील खर्च वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अनुमती असेल.

७६.३.२दिनांक १ एप्रिल, २००५ रोजी किंवा त्यानंतर सुरु झालेल्या मान्यताप्राप्त भांडवली खर्चावरील प्रकल्पांच्या सर्व कर्जांवर, व त्या तारखेस किंवा त्यानंतर स्थिर मत्तेमध्ये घातलेली मान्यताप्राप्त भर आणि मान्यताप्राप्त स्थिर मत्तांची खरेदी, यावर खालील अटी व शर्तींवर व्याज दर वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अनुमती राहीलः-

(ए) आयोगाने गुंतवणूक योजनेत मान्यता दिल्यानुसार व्याज-दर राहील.

(बी) अशा भांडवली खर्चाच्या प्रकल्पांसात्ठी/ स्थिर मत्तांसाठी प्रमाणकानुसारी कर्ज भांडवल हे आधार मूल्य राहील.

(सी) या विनियमांच्या विनियम ७४ नुसार, प्रमाणकानुसारी कर्ज भांडवलाची परतफेड प्रमाणकानुसारी परतफेडीच्या वेळापत्रकाप्रमाणे होईल, असे मानण्यांत येईल.

७६.३.३कर्ज भांडवलावरील व्याज काढताना, भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या कर्जावरील खर्च यासंबधीचे लेखा मानक विवरणपत्र (एएस-१६) मधील तरतूदी, या विनियमांशी विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, लागू राहतील.

७६.३.४व्याजावर कर, बांधिलकी (कमिटमेंट) आकार, वित्तीय आकार आणि परकीय चलनातील कर्जावर परकीय चलन विनिमयांतील कोणत्याही बदलामुळे होणारा फरक या बाबींना, वितरण परवानाधारकाच्या लेखा पुस्तकांत व्याजावरील खर्च म्हणून जितक्या प्रमाणांत संबोधण्यांत येत असेल त्या प्रमाणांत, आयोग या बाबींना अनुमती देईल.

७६.४ घसा-यापोटीच्या अग्रिमासह घसारा

७६.४.१ खालीलप्रमाणे परिगणना करण्यांत आलेल्या वितरण उद्योगांतील स्थिर मत्तेच्या मूल्यावरील घसारा वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अनुमती देण्यांत येईल;

(ए) प्रकल्पाचा/स्थिर मत्तेचा आयोगाने मान्यता दिलेला मूळ खर्च हे घसा-याची परिगणना करण्यासाठी आधारभूत मूल्य असेल.

(बी) या विनियमासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या दराने घसा-याची परिगणना दर वर्षी स्थिर पध्दतीने (स्ट्रेट लाईन मेथड) करण्यांत येईल;

परंतु असे की, मत्तेच्या अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या १० टक्के मत्तेचा उरलेला उपयोगिता काल म्हणून मानण्यात येईल आणि मत्तेच्या अनुज्ञेय भांडवली खर्चाच्या जास्तीत जास्त ९० टक्केपर्यंत घसारा अनुज्ञेय राहील;

परंतु आणखी असे की, जमिनीवर घसारा काढण्याची परवानगी देण्यांत येणार नाही व तिच्यावरील खर्च हा अनुज्ञेय भांडवली खर्चातून घसा-याची परिगणना करण्यासाठी वगळण्यांत येईल;

परंतु असेही की, भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या घसा-या लेख्याबाबतचे लेखा मानक विवरणपत्र (एएस-६) मधील तरतूदी, या विनियमांशी त्या विसंगत नसतील त्या मर्यादेपर्यंत, या विनियमांखाली घसा-याची परिगणाना कराण्यासाठी लागू राहतील.

७६.४.२ घसा-याशिवाय, वितरण परवाधारकाला वरील विनियम ७४.३ नुसार परिगणना केलेला, घसा-यापोटी अग्रिम मिळण्याचा हक्क असेल.

७६.४.३ वितरण परवानाधारकास आयोगने मान्यता दिलेल्या पातळीपर्यंत अमूर्त मत्ता निवारण निधी वसूल करण्यास मुभा दिली जाईल.

स्पष्टीकरण- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “अमूर्त मत्ता” म्हणजे रोखीत करण्यांत आलेला कामकाज-पूर्व आणि विकासाचा खर्च आणि जो वितरण परवानाधारकाच्या भांडवली लेख्यांत खर्च टाकल्याची नोंद करण्यांत झालेली आहे व जो वितरण उद्योग / किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसाय विकसित करीत असताना योग्य खर्च म्हणून करावा लागला आहे व त्यांत ख्याती-मूल्य (गुड-विल) म्हणून दिलेल्या किंवा ताळेबंदांत दाखविल्या गेलेल्या कोणत्याही रकमेचा समावेश असणार नाही.

७६.५ वीज निर्मिती/ वीज खरेदीचा खर्च

७६.५.१ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी, वितरण परवानाधारकाच्या वीज प्राप्त करुन घ्यावयाच्या योजनेनुसार त्याच्या विद्युत निर्मिती उद्योगाने निर्माण केलेली वीज किंवा त्याने बाह्य स्त्रोतांकडून खरेदी केलेल्या विजेचा खर्च वसूल करण्यास वितरण परवानाधारकाला परवानगी देण्यांत येईल.

७६.५.२विक्रीच्या पूर्व-अनुमानाच्या आधारावर आणि विनियम ५४ नुसार पारेषण तोट्यांची मान्यताप्राप्त पातळी आणि खालील विनियम ८१ नुसार वितरण तोट्यांची मान्यताप्राप्त पातळी, लक्षांत घेऊन, वीज प्राप्त करुन घ्यावयाची योजना तयार करण्यांत येईल.

७६.५.३विद्युत निर्मिती व दीर्घ कालीन पुरवठ्याच्या स्त्रोतांकडून विजेच्या खरेदीच्या आधारावर वितरण परवानाधारकाची जी दीर्घ-कालीन वीज प्राप्त करुन घ्यावयाची योजना असेल तिच्याशी, वीज प्राप्त करुन घ्यावयाची योजना सुसंगत असेल.

७६.५.४जर अल्प-कालावधीसाठी वीज प्राप्त करुन घ्यावयाचा उद्देश असेल तर अशी वीज खरेदी या विनियमांतील भाग-डी येथील विनियमांनुसार होईल.

७६.५.५ विद्युत पुरवठ्याच्या विविध स्त्रोतांकडून, वितरण परवानाधारकाच्या विद्युत निर्मिती उद्योगासह,कोणाकडून विजेचे किती परिमाण प्राप्त करुन घ्यावयाचे ते आयोग, विजेच्या किंमतीच्या आधारे वीज खरेदीच्या तत्त्वानुसर सर्व मान्यताप्राप्त स्त्रोतांची त्यांच्या अस्थिर खर्चाच्या किंवा किंमतीच्या आधारे क्रमवारी निश्चित करून, ठरवेल.

७६.५.६राज्य भार प्रेषण केंद्रातर्फे प्रसिध करण्यांत येईल व आयोगाकडून मान्यता देण्यांत येईल अशा बॅलन्सिंग अँड सेटलमेंट कोड नुसार, निर्धारित उर्जा वापर आणि प्रत्यक्ष उर्जा वापर यामधील तफावतीचे आकार, वितरण परवानाधारकाला प्राप्त करुन घेण्याचा हक्क राहील किंवा त्याला ते सहन करावे लागतील;

परंतु असे की, वितरण परवानाधारकाच्या वार्षिक महसूलाच्या गरजेची परिगणना करताना यापैकी किती आकारांचा समावेश त्यांत करावयाचा, हे आयोगातर्फे ठरवून देण्यांत येईल.

७६.६ <u>पारेषण आकार</u>

७६.६.१ पारेषण परवानाधारकाला त्याच्या आंतर-राज्य पारेषण यंत्रणेमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी व तिच्या वापरासाठी देय असलेल्या आकारांची वसूली, आयोगाने भाग-एफ मधील विनियमांखाली निश्चित केलेल्या वीज दराने करण्यास, वितरण परवानाधारकाला परवानगी देण्यांत येईल.

७६.६.२वितरण परवानाधारकाला, खालील खर्चांची मान्यतापाप्त पातळीपर्यंत वसूली करण्यास परवानगी देण्यांत येईल :-

(ए) मधली पारेषण सुविधा वापरण्यासाठीचे आकार;

(बी) इतर वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा वापर केल्याबद्दलचे वहन आकार;.

(सी) केंद्रिय आयोगाने विहीत केलेल्या दराने आंतर-राज्य पारेषण यंत्रणेत प्रवेश मिळविण्यासाठीचे व तिच्या वापरासाठीचे आकार; आणि

(डी) विहीत करण्यांत येतील त्याप्रमाणे प्रादेशिक लोड डिस्पॅच सेंटर व राज्य लोड डिस्पॅच सेंटरचे शुल्क व आकार.

७६.७ <u>कामकाज व देखभाल खर्च</u>

७६.७.१ वितरण उद्योगाशी व किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायाशी संबंधित असलेला कामकाज व देखभालीवरील सर्व वाजवी व समर्थनीय खर्च वसुल करण्यास वितरण परवानाधारकास परवानगी देण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक वीज दराच्या निश्चितीकरणाच्या अर्जासोबत अशा सर्व कामकाज व देखभालीवरील खर्चाचे पूर्व-अनुमान सादर करेल;

परंतु आणखी असे की, पूर्व-अनुमान हे मागील कामगिरी आणि/ किंवा कामकाजाचे निकष यावर आधारित असेल आणि त्याचे स्पष्टीकरण देणारी व त्याच्या समर्थनार्थ सविस्तर आकडेवारी देण्यांत आलेली असेल.

स्पष्टीकरणः- या विनियमाच्या प्रयोजनार्थ, "कामकाज व देखभाल खर्चा"मध्ये खालील बाबींचा समावेश असेलः-

(ए) बोनस व भविष्य निर्वाह निधीस वर्गणी, व कोणत्याही सध्या प्रचलित कायद्याखाली किंवा आयोगाने मान्य केलेल्या योजनेखाली द्यावयाचे निवृत्त-वेतन आणि उप-दान यासहीत कर्मचा-यांवरील खर्च;

(बी) दुरुस्ती व देखभाल;

(सी) भाडे, दर व आय-कराशिवायचे इतर कर;

(डी) विधी शुल्क;

(ई) बुडीत कर्जासाठी तरतूद;

(एफ) लेखापरिक्षकांची फी;

(जी) शिकाऊ उमेदवार व प्रशिक्षण योजनांवरील खर्च;

(एच) वरील बाबींमध्ये व या विनियमांत इतरत्र नसलेला परंतु वितरण उद्योगाशी/ किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायाशी संबंधित असलेला खर्च जो आय-कर अधिनियम, १९६१ खाली उत्पन्नाची परिगणना करताना वजावट म्हणून अनुज्ञेय आहे .

७६.८ खेळते भांडवलावर व्याज

७६.८.१ आर्थिक वर्षातील, खालीलप्रमाणे परिगणना केलेल्या अंदाजित खेळते भांडवलाच्या पातळीवर, वितरण परानाधारकाला, व्याज अनुज्ञेय राहीलः-

(ए) आर्थिक वर्षातील कामकाज व देखभालीच्या खर्चाच्या १/१२ रक्कम; अधिक

(बी) आर्थिक वर्षाच्या प्रत्येक महिन्याच्या शेवटी स्टोअर मधील सामान, साहित्य व पुरवठ्याच्या वस्तू व हातात शिल्लक असलेल्या इंधनाच्या पुस्तकांतील किंमतीच्या १/१२; अधिक

(सी) प्रचलित दराने विजेच्या विक्रीपासून दोन महिन्यांतील अपेक्षित महसूलाइतकी रक्कम; वजा

(डी) अधिनियमाच्या कलम ४७च्या उप-कलम (१) च्या खंड (ए) आणि खंड (बी) नुसार ग्राहक आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून सुरक्षा अनामत म्हणून घेतलेल्या, असल्यास, अशा रकमा; वजा

(इ) वीज प्राप्त करून घ्यावयाच्या वार्षिक योजनेवर आधारित, एक महिन्यात खरेदी केलेल्या विजेवरील खर्चाशी सममूल्य रक्कम.

७६.८.२वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर केलेल्या तारखेस असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या अल्प-कालीन मूळ व्याज दराने व्याज अनुज्ञेय राहील.

७६.८.३वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सादर केलेल्या तारखेस असलेल्या बँक दराने ग्राहक आणि वितरण यंत्रणा उपयोगकर्त्याकडून घेतलेल्या सुरक्षा अनामतीवर व्याज अनुज्ञेय राहील.

७६.९ आकस्मिकता निधीस वर्गणी

७६.९.१ जर वितरण परवानाधारकाने आकस्मिकता निधीसाठी विनियोजन केले असेल तर, एकूण महसूलाच्या गरजेची परिगणना करताना स्थिर मत्तांच्या मूळ किंमतीच्या ०.२५ टक्क्यांपेक्षा कमी नसेल व ०.५ टक्क्यांपेक्षा जास्त नसेल इतकी रक्कम अशा विनियोजनासाठी अनुज्ञेय राहील;

परंतु असे की, जेव्हा या आकस्मिकता निधीची रक्कम स्थिर मत्तांच्या मूळ किंमतीच्या पांच (५) टक्क्याहून अधिक होईल तेव्हा ही निधीची रक्कम वरील कमाल रकमेपेक्षा जास्त होणार असल्यामुळे अशा विनियोजनास परवानगी देण्यांत येणार नाही;

परंतु आणखी असे की, अशा रितीने विनियोजन केलेली रक्कम भारतीय न्यास अधिनियम, १८८२ खाली प्राधिकृत करण्यांत आलेल्या रोख्यांमध्ये आर्थिक वर्ष संपल्या नंतर सहा महिन्यांच्या आंत गुंतविण्यात येईल.

७६.९.२ परवान्याच्या कालावधीत आकस्मिकता निधीतून रक्कम काढण्यांत येणार नाही, फक्त आयोगाने परवानगी दिलेल्या खर्चाच्या बाबी वगळून जसे की-

(ए) व्यवस्थापन टाळू न शकणा-या अशा अपघात, संप किंवा परिस्थितीमुळे होणारे खर्च किंवा नफ्याची हानि;

(बी) नेहमीचा देखभाल व नवीकरणावरील खर्च वगळता, संच (प्लँट) किंवा कामे बदली करण्यावर अथवा काढून टाकण्यावर झालेला खर्च;

(सी) सध्या प्रचलित असलेल्या कोणत्याही कायद्याखाली द्यावी लागणारी नुकसानभरपाई जिच्यासाठी दुसरी कोणतीही तरतूद करण्यांत आलेली नाही.

परंतु असे की, परवानेधारकाला विमा कंपन्यांकडून मिळालेल्या अन्य कोणत्याही नुकसानभरपाईच्या रकमांचे योग्यरित्या समायोजन केल्यावर, आकस्मिक निधीमधून काढावयाच्या अशा रकमांची परिगणना करण्यात येईल.

## ७७ **वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न**

७७.१ वितरण परवानाधारकाच्या विजेच्या किरकोळ विक्रीपासूनच्या महसूलाच्या गरजेची परिगणना करताना वितरण उद्योगाशी आणि/ किंवा किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायाशी संबंधित आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाची रक्कम एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक त्याच्या वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्नाच्या पूर्व-अनुमानाचा संपूर्ण तपशील वीज दर निश्चितीकरणाच्या अर्जाबरोबर आयोगास सादर करेल.

## ७८ वहन आकारांपासूनचे उत्पन्न

७८.१ वितरण परवानाधारकाच्या विजेच्या किरकोळ विक्रीपासूनची महसूलाच्या गरजेची परिगणना करताना, या विनियमांच्या भाग-जी नुसार परिगणना केलेले आणि आयोगाने मान्यता दिलेले वहन आकारांपासूनचे कोणतेही उत्पन्न एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल.

## ७९ इतर उद्योगापासूनचे उत्पन्न

७९.१ जर वितरण परवानाधारक कोणताही इतर उद्योग करीत असेल तर, अशा इतर उद्योगापासूनच्या उत्पन्नातून, अशा इतर उद्योगांशी संबंधित सर्व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्च कमी करुन राहिलेल्या उत्पन्नाच्या एक-तृतियांश उत्पन्न, वितरण परवानाधारकाची विजेच्या किरकोळ विक्रीपासूनच्या महसूलाच्या गरजेची परिगणना करताना, एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक त्याचा वितरण उद्योग व इतर उद्योग यांत संयुक्त आणि समान असलेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चाची विभागणी वाजवी आधारावर करेल आणि एक वाटप विवरणपत्र आयोगास वीज दराच्या निश्चितीकरणासाठी अर्ज सदर करताना त्यासोबत पाठवेल;

परंतु आणखी असे की, जेव्हा अशा इतर उद्योगाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चाची एकूण बेरीज ही अशा इतर उद्योगाच्या उत्पन्नापेक्षा जास्त होईल तेव्हा किंवा इतर कोणत्याही कारणाकरिता, अशा इतर उद्योगामुळे वितरण परवानाधारकाच्या एकूण महसूलाच्या गरजेत कोणतीही रक्कम मिळविण्यास अनुमती देण्यांत येणार नाही.

परंतु असे की, या अधिनियमाची सुरुवात होण्यापूर्वी विजेच्या वितरणाच्या उद्योगांत गुंतलेल्या स्थानिक प्राधिकरणास या विनियमांत कांहिही असले तरी ते लागू होणार नाही.

## ८० वहन आकारासाठीच्या क्रॉस-सबसिडीवरील अधिभार व अतिरिक्त अधिभारापासूनची प्राप्ती

८०.१ वितरण खुला प्रवेश विनियमानुसार आयोगाने मान्यता दिलेल्या क्रॉस-सबसिडी अधिभारापोटीची रक्कम जी वितरण परवानाधारकास विद्युत निर्मिती कंपनीकडून किंवा वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रांत वीज पुरवठा करणा-या वितरण परवानाधारकाकडून प्राप्त झाली असेल ती, वितरण परवानाधारकाची विजेच्या किरकोळ विक्रीपासूनच्या महसूलाच्या गरजेची परिगणना करताना, एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल.

८०.२ वितरण खुला प्रवेश विनियमानुसार आयोगाने मान्यता दिलेल्या वहन आकारांवरील अतिरिक्त अधिभारापोटीची रक्कम जी, वितरण परवानाधारकाच्या अशा ग्राहकांकडून त्यास मिळाली आहे ज्यांनी सदर वितरण परवानाधारक सोडून अन्य विद्युत निर्मिती कंपनीकडून किंवा परवानाधारकाकडून वीज पुरवठा घ्यावयाचा निर्णय घेतला आहे, अशा वितरण परवानाधारकाची विजेच्या किरकोळ विक्रीपासूनच्या महसूलाच्या गरजेची परिगणना करताना, एकूण महसूलाच्या गरजेतून कमी करण्यांत येईल.

## ८१ वितरण तोटे

८१.१ किरकोळ विद्युत पुरवठा व्यवसायांत होणा-या मान्यताप्राप्त ऊर्जा हानीच्या पातळीची वसूली करण्यास, वितरण परवानाधारकास अनुमती देण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारकास लागू असलेल्या बहु-वर्षीय वीज दर रचनेचा एक भाग म्हणून आयोग विनियम १६ खाली वितरण तोट्याकरिता एक मार्गदर्शिका ठरवून करेल.

परंतु असे की, प्रत्यक्ष वितरण हानीची पातळी आणि मान्यताप्राप्त पातळी यांत कोणतीही तफावत उद्‌भवली तर ती, विनियम १८ किंवा विनियम १९ मध्ये, जसे असेल तसे, नमूद करण्यांत आलेल्या पध्दतीनुसार, कामगिरीच्या आढाव्याचा एक भाग म्हणून, हाताळण्यांत येईल;

परंतु असे की, चोरी, भूरटी चोरी, पारेषण केलेल्या विजेसाठी मीटर्स बसविण्यांत किंवा देयके तयार करण्यांत आलेल्या अपयशामुळे झालेल्या उर्जा हानीची, या विनियमाखाली,आयोग ठरवून देईल त्या कालावधीनंतर, वसूली करण्यास वितरण परवानाधारकास परवानगी देण्यांत येणार नाही.

## ८२ इंधन अधिभार समायोजन

८२.१ सप्टेंबर, २००५ च्या पहिल्या दिवसापासून, इंधन खर्चात होण-या बदलांमुळे वीज निर्मितीच्या खर्चात आणि वीज प्राप्तीच्या खर्चात होणा-या बदलांवर आधारित समायोजनानुसार, खाली विनिर्दिष्ट केलेला इंधन-समायोजन-खर्च (फ्युअल ॲडजस्टमेंट कॉस्ट- एफएसी) सूत्राद्वारे, वितरण परवानधारक ग्राहकांकडून वसूल करेल.

८२.२ एफएसी आकार वितरण परवानाधारकाच्या संपूर्ण विक्रीवर, कोणत्याही ग्राहकास कोणतीही सूट न देता, लागू असेल.

८२.३ स्वतःच्या विद्युत निर्मिती केंद्रात निर्मिती झालेल्या वीजेवर केलेल्या खर्चात आणि वीज प्राप्तीवर केलेल्या खर्चांत, इंधनाच्या किंमतीत झालेल्या बदलामुळे जी प्रत्यक्ष तफावत येईल त्यावर आधरित, त्यानंतरच्या कोणत्याही महिन्यांत या विनियमांना अनुसरून, एफएसी आकाराची परिगणना करण्यांत व आकारण्यांत येईल व ही परिगणना अंदाजित किंवा अपेक्षित बदलावर आधारित नसेल.

८२.४ वितरण परवानाधारक, लावण्यांत आलेल्या एफएसी आकाराचा तपशील आयोगास तिमाही तत्त्वावर देईल व त्यांत एफएसी संबंधांत झालेला खर्च, त्या तिमाहीतील प्रत्येक महिन्यांत ग्राहकांना लावण्यांत आलेला एफएसी आकार, यासह, आयोग मागेल ती, याबाबतची सविस्तर आंकडेवारी व पडताळणीसाठी समर्थनार्थ कागदपत्रे , सादर करेल;

परंतु असे की, या विनियमांच्या अधिसूचनेनंतर जेव्हा एफएसी आकार प्रथमच लावण्यांत येणार असेल तेव्हा एफएसी आकार लावण्यापूर्वी, वितरण परवानाधारक आयोगाची मान्यता घेईल;

परंतु आणखी असे की, वीज दराच्या प्रत्येक वर्गवारीतील ग्राहकांना लागू असणारा एफएसी आकार ठळकपणे रोख भरणा केंद्रांवर व वितरण परवानाधारकाच्या इंटरनेट वरील वेब-साइटवर प्रदर्शीत करण्यांत येईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक प्रत्येक महिन्यास एफएसीचा झालेला खर्च व सर्व ग्राहकांना आकारण्यांत आलेला एफएसी याबाबतचा तप्शील त्याच्या इंतरनेटवरील वेब-साईटवर प्रदर्शीत करेल.

८२.५ एफएसी आकाराची परिगणना करण्यासाठी सूत्र खालीलप्रमाणे असेलः

FAC ( Rs. Crores) = **C** + **I** + **B**

जेथे

| | | |
|---|---|---|
| FAC | = | इंधन समायोजन खर्च |
| **C** | = | इंधन किंमतीतील तफावतीमूळे स्वतःच्या वीज निर्मिती व वीज प्राप्तीच्या खर्चात झालेला बदल |
| **I** | = | खेळते भांडवलावरील व्याज |
| **B** | = | जादा वसूली/ कमी वसूली करिता समायोजक घटक |

स्पष्टीकरण-१ : या विनियम ८२.५ च्या प्रयोजनार्थ, "C" ची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यांत येईलः

C ( Rs. Crores) = $A_{FC,Gen} + A_{FC,pp}$

जेथे

$A_{FC,Gen}$ : स्वतःच्या वीज निर्मितीच्या इंधन खर्चांतील बदल. उष्णतेचा दर, सहाय्यकारी वापर, वीज निर्मिती व वीज खरेदी यांचे मिश्रण, इ. सह, आयोग देईल त्या निकष व निदेशांच्या आधारे या बदलाची परिगणना करण्यांत येईल.

$A_{FC,pp}$ : इतर स्त्रोतांकडून खरेदी केलेल्या विजेच्या ऊर्जा आकारांतील बदल. जोपर्यंत हा बदल या विनियमांत विहीत करण्यांत आलेली मानके आणि प्रचलित वीज दराचा आदेश यांना अनुसरुन असेल तो पर्यंत त्यास, लागू असणा-या निकषांना अधीन राहून. अनुमती राहील,

स्पष्टीकरण-२ : या विनियम ८२.५ च्या प्रयोजनार्थ, "I" म्हणजे इंधनाच्या किंमतीतील बदलामुळे खेळते भांडवलाच्या व्याजांत होणारा बदल.

स्पष्टीकरण-३ : या विनियम ८२.५ च्या प्रयोजनार्थ, "B" ची परिगणना खालील सूत्रानुसार करण्यांत येईलः

$$B_{J-2} \text{ ( Rs. Crores)} = A_{J-4} + R_{J-2}$$

जेथे

$A_{J-4}$ = J-4 महिन्यांतील खर्चातील वाढ

$R_{J-2}$ = J-4 महिन्यांतील खर्चातील वाढ जी प्रत्यक्षांत J-2 महिन्यांत वसूल झाली

८२.६ मासिक एफएसी आकार, वीज दरातील अस्थिर भागाच्या १०% पेक्षा किंवा आयोग वेळोवळी विहीत करेल अशा वेगळ्या मर्यादांपेक्षा जास्त असणार नाही.

परंतु असे की, एफएसी आकार, वरील मर्यादेपेक्षा जेवढा जास्त असेल तो जादा फरक पुढे ओढण्यांत येईल आणि वितरण परवानाधारक भविष्यांत, आयोग निदेशीत करेल तितक्या कालावधीत, वसूल करण्यांत येईल.

८२.७ "J " महिन्यासाठी लावावयाच्या एफएसी आकाराची परिगणना खालील सूत्राने करण्यांत येईलः

$FAC\,(Rs.\,Crores) = C_{J-2} + I_{J-2} + B_{J-2}$

ज्या महिन्यांत अतिरिक्त खर्चाची परिगणना करण्यांत आली त्या महिन्याच्या पुढील महिन्यांपासून एफएसी आकार लागू करण्यांत येईल.

८२.८ वितरण परवानाधारकाच्या फक्त मान्यताप्राप्त वीज खरेदीस आणि जेथे या विनियमांखाली आयोगाच्या मान्यतेची गरज नसते अशा विनियम २५ नुसार केलेल्या वीज खरेदीसच एफएसी आकार लागू करण्यांस अनुमती राहील.

८२.९ वर नमूद केलेल्या सूत्रानुसार एकूण वसूलीयोग्य एफएसी आकार हा प्रत्यक्ष विक्रीतून "रुपये प्रति किलोवॅट- तास" नुसार वसूल करण्यांत येईल;

परंतु असे की, मीटर न बसविलेल्या ग्राहकांच्या बाबतीत, अशा ग्राहकांना करण्यांत आलेल्या अंदाजित विक्रीच्या आधारे, जिची परिगणना आयोग विहीत करेल त्या पध्दतीनुसार करण्यांत येईल, एफएसी आकार वसूल करण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, जेथे आयोगाने मान्यता दिलेल्या पातळीपेक्षा वितरण परवानाधारकाचे प्रत्यक्ष वितरण तोटे जास्त असतील तेथे अशा जादा वितरण तोट्याशी तत्सम असलेली एफएसी आकाराची रक्कम (kWh मध्ये)एकूण वसलीयोग्य एफएसी आकारांतून कमी करण्यांत येईल.

८२.१० एफएसी प्रती kWh ची परिगणना खालील सूत्राने करण्यांत येईलः

FAC Rs/ kWh = (FAC / Metered Sales + Unmetered consumption estimates + Excess distribution losses) * 10

एफएसी रु./kWh = (एफएसी /मीटर असलेली विक्री + मीटर नसलेला अंदाजित वापर + जादा वितरण तोटे ) * १०

**भाग-आयः  राज्य शासनाने सबसिडी देणेबाबत**

## ८३ राज्य शासनाने सबसिडीसाठी तरतूद करण्याची पध्दत

८३.१ सप्टेंबर, २००५ च्या पहिल्या दिवसापासून, जर राज्य शासनास कोणत्याही ग्राहकास किंवा ग्राहकांच्या वर्गास आयोगाने निशित केलेल्या वीज दरांत कोणतीही सबसिडी द्यावयाची असेल तर राज्य शासन, आयोगाच्या पूर्व संमतीने, सबसिडीच्या मंजूरीने बाधित होणा-या परवानाधारकास / व्यक्तीस भरपाईची रक्कम, या विनियमांत विहीत केलेल्या पध्दतीनुसार, आगाऊ अदा करेल.

८३.२ राज्य शासनाने सबसिडी द्यावयाची ठरविलेली रक्कम राज्य शासनाकडून मदतीच्या स्वरुपांत देण्यांत येईल.

८३.३ राज्य शासनाने परवानाधारकाची एकूण गरज असलेली रक्कम ज्या प्रमाणांत अदा केलेली असेल त्या प्रमाणांत सबसिडीची रक्कम पात्र ग्राहकांना देण्यांत येईल;

परंतु असे की, चुकीच्या अंदाजामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे, सबसिडी प्रत्यक्ष देण्यांत जर काही तूट आली तर  ही तूट ग्राहकांच्या देयकांत स्पष्टपणे दाखविण्यांत येईल आणि ती, जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत किंवा संपेपर्यंत, संबधित पात्र ग्राहकामंध्ये यथा प्रमाणांत विभागण्यांत येईल.

८३.४ परवानाधारक ग्राहकांच्या देयकांत (अ) आयोगाने निश्चित केलेला वीज दर; (ब) राज्य शासनाच्या सबसिडीची रक्कम, दर, व कालावधी; (क) निव्वळ देय रक्क्म, या बाबी स्पष्टपणे दाखवेल.

**भाग-जेः संकीर्ण**

## ८४. दुरुस्ती करण्याचे अधिकार

८४१ आायोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरबदल किंवा सुधारणा करु शकेल.

## ८५. अडचणी दूर करण्याचे अधिकार

८५.१ या विनियमांतील कोणत्याही तरतूदींची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर आयोग, साधारण किंवा विशेष आदेशाने, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असेल अशा, अधिनियमांतील तरतुदींशी विसंगत नसणा-या, तरतदी करु शकेल.

**परिशिष्ट-१**

## घसा-याची अनुसूची

| मालमतेचा तपशील | उपयोगिता कालावधि (वर्षे) | घसारा (थेट पध्दतीने) |
|---|---|---|
| | | |
| ए) पूर्ण मालकीची जागा | कायमसाठी | - |
| बी)भाडेपट्ट्यावर (लीजवर) घेतलेली जागा | | |
| ए) जागेतील गुंतवणूकीसाठी | भाडेपट्ट्याचा कालाावधी किंवा भाडेपट्ट्यावर घेतल्यावर अध्याप शिल्लक असलेला भाडेपट्ट्याचा कालावधी | - |
| बी) जागा साफ करण्या- साठीचा खर्च<br><br>सी) नवीन खरेदी केलेली मालमत्ता | जागा साफ केल्याच्या तारखेच्या दिवशी अध्याप शिल्लक असलेला भाडेपट्ट्याचा कालावधी | - |
| ए. विद्युत निर्मिती केंद्रातील प्लँटच्या पायासह प्लँट व मशिनरी | | |
| १) जल विद्युत | ३५ | २.५७ |
| २) बाष्प विद्युत | २५ | ३.६० |
| एन एच आर एस आणि वाया जाणारी उष्णता परत मिळविणारे बॉयलर्स /प्लँट्स | | |
| ३) डिझेल-विद्युत आणि गॅस प्लँट्स | १५ | ६.०० |
| बी. कुलिंग टॉवर्स आणि सर्कुलेटिंग पाण्याची यंत्रणा | २५ | ३.६० |
| सी. जल-विद्युत यंत्रणेचा भाग असलेली खालील कामांसह जलसंबधित कामेः- | | |
| १) धरणे, कालवे, spillways, weirs, re-inforced concrete flumes and syphons | ५० | १.८० |
| २) re-inforced concrete pipelines and surge tanks, steel pipelines , sluice gates, steel surge (tanks) hydraulic control valves and other hydraulic works | ३५ | २.५७ |
| डी. कायम स्वरुपाची स्थापत्त्य व बांधकाम अभियांत्रिकी कामे | | |

| | | |
|---|---|---|
| १)कार्यालये आणि शो-रुम्स<br>२)औष्णिक-विद्युत निर्मिती प्लँट्स करिता | ५०<br>२५ | १.८०<br>३.६० |
| ३) जल-विद्युत निर्मिती प्लँट्स करिता<br>४) लाकडी बांधकामांसारखी तात्पुरती कामे | ३५<br>५ | २.५७<br>१८.०० |
| ५) कच्चे रस्ते सोडून इतर रस्ते<br>६) इतर | ५०<br>५० | १.८०<br>१.८० |
| इ.ट्रान्सफॉर्मर्स, ट्रान्सफॉर्मर्स (किसॉक्स) उप-केंद्रांतील साहित्य व इतर स्थिर साधने (प्लँट्च्या पायासह) | | |
| १) १०० किलो व्होल्ट अँपिअर्स आणि वरील क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर्स (पायासह) | २५ | ३.६० |
| २) इतर | २५ | ३.६० |
| एफ. केबल जोडण्यांसह स्विच-गिअर्स | २५ | ३.६० |
| जी. वीज निरोधक | | |
| १) स्टेशन टाइप | २५ | ३.६० |
| २) पोल टाइप | १५ | ६.०० |
| ३) Synchronous Condensor | ३५ | २.५७ |
| एच. बॅटरीज | ५ | १८.०० |
| १) Underground cables including joint boxes and disconnected boxes | २५ | ३.६० |
| २) Cable duct system | ५० | १.८० |
| आय. overhead lines including supports | - | - |
| १) Lines on fabricated steel operating at nominal voltages hingher than 66 KV | ३५ | २.५७ |
| २) Lines on steel support operating at nominal voltages hinger than 13.2 kilovolts but not exceeding 66 kilovolts | २५ | ३.६० |
| ३) Lines on steel or re-inforced concrete supports | २५ | ३.६० |
| ४) Lines on treated wood supports | २५ | ३.६० |
| जे. मीटर्स | १५ | ६.०० |
| के. स्वयं-चलित वाहने | ५ | १८.०० |
| एल. वातानुकुलिन प्लँट्स | | |
| १) स्थिर | १५ | ६.०० |
| २) हातवाही (पोर्टेबल) | ५ | १८.०० |
| एम. | | |

| | | |
|---|---|---|
| १) कार्यालतीन फर्निचर आणि फिटिंग्स<br>२) कार्यालयीन इक्विपमेंट्स | १५<br>१५ | ६.००<br>६.०० |
| ३) फिटिंग्स आणि साधनांसह अंतर्गत वायरिंग<br>४) रस्त्यांवरील दिव्यांची फिटिंग्स | १५<br>१५ | ६.००<br>६.०० |
| एन. भाड्यावर दिलेली साधने | | |
| १) मोटर्स सोडून इतर | ५ | १८.०० |
| २) मोटर्स | १५ | ६.०० |
| ओ. संपर्क-साधने | | |
| १)रेडिओ आणि उच्च कंप्रता वाहक यंत्रणा | १५ | ६.०० |
| २) दूरध्वनी वाहिन्या व दूरध्वनी | १५ | ६.०० |
| पी. खरेदी केलेल्या जुन्या मत्ता आणि ज्यांच्यासाठी अन्यथा या परिशिष्टांत तरतूद करण्यांत आलेली नाही अशा मत्ता | विद्युत निर्मिती कंपनीने/परवानाधारकाने ताब्यांत घेताना प्रत्येक प्रकरणी मत्तेचे स्वरुप, ती किती जुनी आहे व तिची स्थिती लक्षांत घेऊन आयोग निश्चित करेल तितका वाजवी कालावधी | |

# परिशिष्ट-२

## पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची परिगणना करण्याची कार्यपध्दती

१. प्रत्येक पारेषण यंत्रणेकरिता पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची परिगणना स्वतंत्रपणे करण्यांत येईल. पारेषण यंत्रणांच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठी पारेषण भागांची खालीलप्रमाणे वर्गवारी करण्यांत येईल.

i) एसी पारेषण वाहिन्या: एसी पारेषण वाहिन्याचे प्रत्येक सर्किट हे एक भाग समजण्यांत येईल.

ii) इंटर-कनेक्टींग ट्रान्सफॉर्मर्स (आयसिटीज): प्रत्येक आयसिटी बँक हा (तीन सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर्स एकत्र) एक भाग असेल.

iii) स्टॅटिक व्हीएआर कॉम्पेन्सेटर (एसव्हीसी): एसव्हीसी ट्रान्सफॉर्मर्ससह एसव्हीसी हा एक भाग असेल. तथापि, त्यापैकी इंडक्टिव्ह ५० टक्के आणि ५० टक्के कॅपॅसिटेटिव्ह याप्रमाणे रेटिंग्स असेल.

iv) स्विच्ड बस रिॲक्टर: प्रत्येक स्विच्ड बस रिॲक्टर हा एक भाग मानण्यांत येईल.

v) एचडीव्हीसी बाय-पोल लिंक्स: एचडीव्हीसीचा दोन्ही बाजूला संलग्न साहित्य असलेला प्रत्येक खांब हा एक भाग मानण्यांत येईल.

vi) एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशन: एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशनचा प्रत्येक ब्लॉक हा एक भाग मानण्यांत येईल. जर संलग्न एसी वाहिनी (एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशनमधून आंतर-प्रांतिय विजेच्या हस्तांतरणासाठी आवश्यक असलेली) उपलब्ध नसेल तर एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशन ब्लॉक सुध्दा उपलब्ध नाही, असे मानण्यांत येईल.

२. पारेषण यंत्रणेच्या एसी आणि एचडीव्हीसी भागांच्या उपलब्धतेची परिगणना खालीलप्रमाणे करण्यांत येईलः-

एसी यंत्रणेसाठी % यंत्रणा उपलब्धता

$$= \frac{o \times AV_o + p \times AV_p + q \times AV_q + r \times AV_r}{o + p + q + r} \times 100$$

एचडीव्हीसी यंत्रणेसाठी % यंत्रणा उपलब्धता

$$= \frac{s \times AV_s + t \times AV_t}{s + t} \times 100$$

जेथे

$o$ म्हणजे एकूण एसी वाहिन्यांची संख्या

$AV_o$ म्हणजे $o$ इतक्या संख्येतील एसी वाहिन्यांची उपलब्धता

$p$ म्हणजे एकूण स्विच्ड बस रिॲक्टर्सची संख्या.

$AV_p$ म्हणजे $p$ इतक्या संख्येतील स्विच्ड बस रिॲक्टर्सची उप्लब्धता

$q$ म्हणजे एकूण आयसिटीजची संख्या

$AV_q$ म्हणजे $q$ इतक्या संख्येतील आयसिटीजची उपलब्धता

$r$ म्हणजे एकूण एसव्हीसीची संख्या

$AV_r$ म्हणजे $r$ इतक्या संख्येतील एसव्हीसीची उपलब्धता

$s$ म्हणजे एकूण एचडीव्हीसी खांबांची संख्या

$AV_s$ म्हणजे $s$ इतक्या संख्येतील एचडीव्हीसी खांबांची उपलब्धता

$t$ म्हणजे एकूण एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशन्स ब्लॉक्सची संख्या

$AV_t$ म्हणजे $t$ इतक्या संख्येतील एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशन ब्लॉक्सची उपलब्धता

३. पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीसाठी व्हेटेज फॅक्टर खालीलप्रमाणे राहीलः-

- i) एसी वाहिनीच्या प्रत्येक सर्किटसाठी- सर्ज इम्पिडन्स लोडींग फॉर अनकॉम्पॅन्सेटेड लाइन ( एसआयएल) x सर्किट किलो मी.
- ii) या परिशिष्टाच्या जोडपत्र-२ मध्ये विविध व्होल्टेज लेव्हल्स आणि कंडक्टर कॉन्फिगुरेशनकरिता एसआयएल रेटिंग्स देण्यांत आली आहेत. तथापि, जी व्होल्टेज लेव्हल्स आणि* किंवा कंडक्टर कॉन्फिगुरेशस या जोडपत्र-२ मध्ये देण्यांत आलेली नाहीत अशा प्रकरणी यंत्रणा उपयोगकर्त्यांना कल्पना देऊन, तांत्रिक बाबींचा विचार करून उचित एसआयएलचा उपयोग करावा.
- iii) प्रत्येक एचडीव्हीसी खांबाकरिता- दि रेटेड MW कपॅसिटी x सर्किट किलो मी.
- iv) प्रत्येक आयसीटी बँककरिता- ती रेटेड MVA कपॅसिटी
- v) एसव्हीसीकरिता- रेटेड एमव्हीएआर कपॅसिटी (इंडक्टिव्ह आणि कॅपॅसिटेटिव्ह)
- vi) स्विच्ड बस रिॲक्टरकरिता- रेटेड एमव्हीएआर कपॅसिटी
- vii) दोन पारेषण यंत्रणा जोडणा-या एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशन्सकरिता-प्रत्येक ब्लॉकची रेटेड MW कपॅसिटी

४) पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना, व्हेटेज फॅक्टर, विचारांत घेतलेले एकूण तास व त्या वर्गवारीतील प्रत्येक भाग उपलब्ध नसलेले तास, यांच्या आधारे करण्यांत येईल. पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठीची सूत्रे जोडपत्र-१ मध्ये देण्यांत आली आहेत.

५) पारेषण परवानाधारकाशी संबंध जोडता येणार नाही अशा खालील कारणांमुळे बंद असलेले पारेषण भाग हे उपलब्ध आहेत असे मानण्यांत येईलः-

- i) देखभाल करण्यासाठी किंवा त्यांची पारेषण यंत्रणा उभारण्यासाठी इतर अभिकरणाने*अभिकरणांनी पारेषण भाग बंद ठेवणे.
- ii) भार जास्त वाढल्यामुळे वाहिनी स्वतः खंडीत करणे किंवा राज्य भार प्रेषण केंद्राच्या निदेशांप्रमाणे स्विच्ड बस रिॲक्टर्स स्वतः खंडीत करणे.

६. विचाराधीन कालावधीकरिता भागाच्या असलेल्या एकूण वेळेतून, पारेषण भाग बंद असण्याचा काल खालील परिस्थितीत, वगळण्यांत येईल-

i) दैवी प्रकोप किंवा दैवी आपत्तीच्या घटनांमुळे पारेषण परवानाधारकाच्या नियंत्रणा बाहेर असलेला भाग बंद असल्याचा काल. तथापि, भागांचा हा बंद असण्याचा काल हा डिझाईनच्या अपयशामुळे नसून तो वरील घटनांमुळे होता, याबाबत आयोगाची किंवा आयोग विहीत करेल अशा इतर कोणत्याही मंचाची*अभिकरणाची खात्री पटविण्याची जबाबदारी ही पारेषण परवानाधारकाची राहील. भाग पुनः पूर्ववत सुरु करण्यासाठी आयोगाकडून किंवा आयोग विहीत करेल अशा मंचा*अभिकरणाकडून वाजवी कालावधी देण्यांत येईल आणि पारेषाण परवानाधारकाने भाग पुर्ववत सुरु करण्यासाठी वाजवी कालावधीपेक्षा घेतलेला कोणताही जादा वेळ हा पारेषाण परवानाधारकाशी संबंध जोडता येईल असा बंद असण्याचा काल म्हणून मानण्यांत येईल. आयोग अथवा आयोग विहीत करेल असा मंच*अभिकरण भाग पुर्ववत सुरु करण्यासठी लागणा-या वेळेचा अंदाज घेण्यासाठी पारेषण परवानाधारकाशी किंवा तज्ञाशी सल्ला-मसलत करेल. ईआरएस (इमर्जन्सी रिस्टोरेशन सिस्टीम) द्वारा पुर्ववत केलेले सर्किट्स हे उपलब्ध म्हणून विचारांत घेतले जातील.

ii) पारेषण परवानाधारकाशी संबंध जोडता येणार नाही अशा ग्रीडमधील घटनेमुळे*अडथळ्यांमुळे उद्‌भवलेला बंदचा कालावधी, उदा. अन्य अभिकरणाच्या मालकीच्या असलेल्या उप-केंद्रांतील किंवा मार्गातील दोष, ग्रीडमधील अडथळ्यांमुळे वाहिन्या, आयसीटीज, एचडीव्हीसी बॅक-टु-बॅक स्टेशन्स इ. खंडीत होणे. तथापि, ग्रीडमधील अडथळ्यांनंतर यंत्रणा वाजवी वेळेत नेहमीच्या स्थितीत आणत असताना जर, एसएलडीसीकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर भाग पूर्वस्थितीत आले नाही तर, तो भाग बंद असण्याच्या संपुर्ण कालावधीत उपलब्ध नाही असे मानण्यांत येईल व बंद असण्याचा कालावधी हा पारेषण परवानाधरकाशी जोडण्यायोग्य राहील.

७. कोणताही भाग बंद असल्यामुळे जर राज्यांतील वीज निर्मिती केंद्रातील वीज निर्मितीची हानी होईल तर ज्या दिवशी किंवा ज्या दिवसांत वीज निर्मितीची हानी झाली असेल त्या दिवशी भाग प्रत्यक्ष बंद असण्याचा जो काल असेल त्याच्या दुप्पट काल तो बंद असल्याचे, मानण्यांत येईल.

जोडपत्र-१

## पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठीची सूत्रे

$$AV_o\text{(Availability of } o \text{ no. of AC lines)} = \sum_{i=1}^{o} \frac{Wi(Ti - T_{NA}i)}{Ti} \Bigg/ \sum_{i=1}^{o} Wi$$

$$AV_p\text{(Availability of } p \text{ no. of HVDC pole)} = \sum_{j=1}^{p} \frac{Wj(Tj - T_{NA}j)}{Tj} \Bigg/ \sum_{j=1}^{p} Wj$$

$$AV_q\text{(Availability of } q \text{ no. of ICTs)} = \sum_{K=1}^{q} \frac{Wk(Tk - T_{NA}k)}{Tk} \Bigg/ \sum_{k=1}^{q} Wk$$

$$AV_r\text{(Availability of r no. of SVCs)} = \left[ \sum_{l=1}^{r} 0.5\frac{W_I l\,(T_I l - T_{NA}l)}{T_I l} + \sum_{l=1}^{r} 0.5\, W_C l\,\frac{(T_C l - T_{NAC} l)}{T_C l} \right] \Bigg/ \left[ \sum_{l=1}^{r} 0.5\, W_I l + \sum_{l=1}^{r} 0.5\, W_C l \right]$$

$$AV_s\text{(Availability of } s \text{ no. of Switched Bus reactors)} = \sum_{m=1}^{s} \frac{Wm(Tm - T_{NA}m)}{Tm} \Bigg/ \sum_{m=1}^{s} Wm$$

$$AV_t\text{(Availability of } t \text{ no. of HVDC Back-to-back Blocks)} = \sum_{n=1}^{t} \frac{Wn(Tn - T_{NA}n)}{Tn} \Bigg/ \sum_{n=1}^{t} Wn$$

| Where | | | |
|---|---|---|---|
| | $Wi$ | = | Weightage factor for $i^{th}$ transmission line |
| | $Wj$ | = | Weightage factor for $j^{th}$ HVDC pole |
| | $Wk$ | = | Weightage factor for $k^{th}$ ICT |
| | $W_I l$ & $W_C l$ | = | Weightage factors for inductive & capacitive operation of $l^{th}$ SVC |
| | $Wm$ | = | Weightage factor for $m^{th}$ bus reactor |
| | $Wn$ | = | Weightage factor for $n^{th}$ HVDC back to back block. |

| | |
|---|---|
| $Ti$, $Tj$, $Tk$, $T_I l$, $T_C l$, $Tm$ & $Tn$ | The total hours of $i^{th}$ AC line, $j^{th}$ HVDC pole, $k^{th}$ ICT, $l^{th}$ SVC (Inductive Operation), $l^{th}$ SVC (Capacitive Operation), $m^{th}$ Switched Bus Reactor & $n^{th}$ HVDC back-to-back block during the period under consideration (excluding time period for outages not attributable to transmission licensee for reasons given in Para 6 of the procedure) |
| $T_{NA}i$ , $T_{NA}j$ , $T_{NA}k$, $T_{NA}l$, $T_{NAC}l$, $T_{NA}m$, | The non-availability hours (excluding the time period for outages not attributable to transmission licensee taken as deemed availability as per Para 5 of the procedure) for $i^{th}$ AC line, $j^{th}$ HVDC pole, $k^{th}$ ICT , $l^{th}$ SVC (Inductive Operation), $l^{th}$ SVC (Capacitive Operation), $m^{th}$ Switched Bus Reactor & $n^{th}$ HVDC back-to-back block. |

## BºÉÉ ´ÉÉÊ½xÉªÉÉSÉÉ ºÉÉVÉÉ <Î¨{ÉbxºÉ ±ÉÉbÉMÉ (BºÉ+ÉªÉB±É)

| +xÉÖGò¨É ÉEò | ´ÉÉÊ½xÉÒSÉÉ ¦ÉÉ® (kv) | EòbC]® EòÉÎx¡òMÉ®¶ÉxºÉ | (BºÉ+ÉªÉB±É) (MW) |
|---|---|---|---|
| १ | ७६५ | क्वॅड बर्सिमिस | २२५० |
| २ | ४०० | क्वॅड बर्सिमिस | ६९१ |
| ३ | ४०० | ट्विन मूस | ५१५ |
| ४ | ४०० | ट्विन एएएसी | ४२५ |
| ५ | ४०० | क्वॅड झेब्रा | ६४७ |
| ६ | ४०० | क्वॅड एएएसी | ६४६ |
| ७ | ४०० | ट्रिपल स्नो बाईंड | ६०५ |
| ८ | ४०० | एसीकेसी (५००/२६) | ५५६ |
| ९ | ४०० | ट्विन एसीएआर | ५५७ |
| १० | २२० | ट्विन झेब्रा | १७५ |
| ११ | २२० | सिंगल झेब्रा | १३२ |
| १२ | १३२ | सिंगल पॅंथर | ५० |
| १३ | ६६ | सिंगल डॉग | १० |

(ए. एम. खान )

मुंबई, सचिव,

दिनांक - २३ ऑगस्ट, २००५ महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५


| अनुक्रमांक | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २ | व्याख्या | १ |
| | **भाग ए : सर्वसाधारण** | |
| ३ | विनियमांची व्याप्ती व लागू असण्याची मर्यादा | १० |
| ४ | मार्गदर्शक तत्त्वे | ११ |
| ५ | पर्यायी अटी व शर्ती | ११ |
| | **भाग- बीः वीज दर निश्चित करण्याची कार्यपध्दती** | |
| ६ | वीज दर निश्चित करण्यासाठी करावयाच्या अर्जासाठीची कार्यपध्दती | १२ |
| ७ | विद्युत निर्मितीवरील विजेचा दर | १२ |
| ८ | पारेषण, वहन आणि विजेच्या किरकोळ विक्रीसाठी विजेचे दर निश्चित करणे | १४ |
| ९ | वीज दराच्या निश्चितीकरणासाठी करावयाच्या अर्जासाठीची काल-मर्यादा | १६ |
| १० | वीज दराचा आदेश | १६ |
| ११ | वीज दराचे पालन | १७ |
| | **भाग-सीः बहु-वर्षीय वीज दर** | |
| १२ | बहु-वर्षीय वीज दराची रचना | १७ |
| १३ | विनियम कोणाला लागू असतील | १८ |
| १४ | नियंत्रण कालावधी | १९ |
| १५<br>१६ | पूर्व-अनुमान<br>काही घटकांसाठी विशिष्ट मार्गदर्शिका | १९<br>२१ |
| १७<br>१८ | कामगिरीचा वार्षिक आढावा<br>नियंत्राणाखाली नसलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा ग्राहकांना लागू करण्याचे सूत्र | २२<br>२५ |
| १९ | नियंत्रणाखाली असलेल्या घटकांमुळे झालेला फायदा किंवा तोटा हिस्से करुन वाटून घेण्याबाबत | २५ |
| २० | वीज दराचे वार्षिक निश्चितीकरण | २६ |
| | **भाग- डीः वीज खरेदी आणि प्राप्त करुन घेणे** | |
| २१ | विनियम कोणाला लागू असतील | २६ |
| २२ | वीज प्राप्त करुन घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना | २७ |
| २३ | दीर्घ-मुदतीच्या वीज प्राप्तीची योजना | २७ |
| २४ | वीज खरेदी करारास/ व्यवस्थेस मान्यता | २९ |
| २५ | अल्प-कालीन वीज प्राप्ती | ३० |

| | | |
|---|---|---|
| | **भाग-ई: विद्युत निर्मिती** | |
| २६ | विनियम कोणास लागू असतील | ३२ |
| २७ | वीज दराचे निश्चितीकरण | ३३ |
| २८ | वीज दराचे भाग | ३३ |
| २९ | बहु-वर्षीय वीज दर | ३४ |
| ३० | भांडवली खर्च | ३४ |
| ३१ | कर्ज भांडवल- भाग भांडवल गुणोत्तर | ३७ |
| ३२ | कर्ज परतफेडीचे वेळापत्रक | ३८ |
| ३३ | कामकाजाचे निकष | ३९ |
| ३४ | वार्षिक स्थिर आकारांची परिगणना | ४३ |
| ३५ | ऊर्जा आकार | ४८ |
| ३६ | अ-निर्धारित आंतरबदलांसाठी आकार | ४९ |
| ३७ | प्रोत्साहन-अधिदान | ५० |
| ३८ | सूट/ उशीरा अदायगीसाठी अधिभार | ५० |
| ३९ | देयके तयार करणे आणि आकारांची अदायगी | ५० |
| ४० | घोषित क्षमता सिध्द करुन दाखविणे | ५१ |
| ४१ | मानीव वीज निर्मिती | ५१ |
| | **भाग- एफः पारेषण** | |
| ४२ | विनियम कोणास लागू असतील | ५१ |
| ४३ | वीज दराचे भाग | ५२ |
| ४४ | बहु-वर्षीय वीज दर | ५४ |
| ४५ | गुंतवणूक योजना | ५४ |
| ४६ | भांडवली खर्च | ५५ |
| ४७ | कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर | ५७ |
| ४८ | कर्ज परतफेडीचे वेळापत्रक | ५८ |
| ४९ | कामकाजाचे निकष | ५९ |
| ५० | एकूण महसुल गरजेची परिगणना | ६० |
| ५१ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न | ६५ |
| ५२ | इतर उद्योगापासूनचे उत्पन्न | ६५ |
| ५३ | वार्षिक पारेषण आकारांचे वाटप | ६६ |
| ५४ | पारेषण तोटे | ६६ |
| | **भाग-जीः वहन** | |
| ५५ | लेख्यांचे विभक्तीकरण | ६७ |
| ५६ | विनियम कोणास लागू असतील | ६७ |
| ५७ | वीज दराचे भाग | ६७ |

| | | |
|---|---|---|
| ५८<br>५९ | बहु-वर्षीय वीज दर<br>गुंतवणूक योजना | ६८<br>६८ |
| ६०<br>६१ | भांडवली खर्च<br>कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर | ६९<br>७१ |
| ६२<br>६३ | कर्ज परतफेडीचे वेळापत्रक<br>एकूण महसुल गरजेची परिगणना | ७१<br>७३ |
| ६४<br>६५ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न<br>इतर उद्योगापासूनचे उत्पन्न | ७८<br>७८ |
| ६६<br>६७ | वहन आकारांचे वाटप<br>वितरण तोटे | ७९<br>७९ |
| <br>६८ | **भाग-एच : विजेची किरकोळ विक्री**<br>विनियम कोणास लागू असतील | <br>७९ |
| ६९<br>७० | वीज दराचे भाग<br>बहु-वर्षीय वीज दर | ८०<br>८० |
| ७१<br>७२ | गुंतवणूक योजना<br>भांडवली खर्च | ८१<br>८१ |
| ७३<br>७४ | कर्ज भांडवलः भाग भांडवल गुणोत्तर<br>कर्ज परतफेडीचे वेळापत्रक | ८३<br>८४ |
| ७५<br>७६ | विक्रीबाबत पूर्व-अनुमान<br>एकूण महसुल गरजेची परिगणना | ८५<br>८६ |
| ७७<br>७८ | वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न<br>वहन आकारांपासूनचे उत्पन्न | ९२<br>९२ |
| ७९<br>८०<br><br>८१ | इतर उद्योगापासूनचे उत्पन्न<br>वहन आकारासाठीच्या क्रॉस-सबसिडीवरील अधिभार व अतिरिक्त<br>अधिभारापासूनची प्राप्ती<br>वितरण तोटे | ९२<br>९३<br><br>९४ |
| ८२ | इंधन अधिभार समायोजन<br>**भाग-आयः राज्य शासनाने सबसिडी देणेबाबत** | ९४ |
| ८३ | राज्य शासनाने सबसिडीसाठी तरतूद करण्याची पध्दत | ९७ |
| | **भाग-जेः संकीर्ण** | |
| ८४ | दुरुस्ती करण्याचे अधिकार | ९७ |
| ८५ | अडचणी दूर करण्याचे अधिकार | ९७ |
| | **परिशिष्ट-१** | |
| | घसारा अनुसूची | ९८ |
| | **परिशिष्ट-२** | |

| | | |
|---|---|---|
| | पारेषण यंत्रणेच्या उपलब्धतेची परिगणना करण्याची कार्यपध्दती<br>**जोडपत्र-१** | १०१ |
| | पारेषण भागांच्या प्रत्येक वर्गवारीच्या उपलब्धतेची परिगणना करण्यासाठीची सूत्रे | १०४ |
| | **जोडपत्र-२** | |
| | एसी वाहिन्यांचे सर्ज इम्पिडन्स लोडींग (एसायएल) | १०५ |